म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक 21

सन

लेखक विनायक कोंडदेव ओक

पुस्तकाचें नांव आलफ्रेद धी ग्रेट चरित्र

चरित्र

# THE LIFE OF

# ALFRED THE GREAT,

Compiled from English works,

BY

VINAYAK KONDADEO OKE.

( *Registered under Act XXV. of* 1867. )

PUBLISHED BY JAVAJI DADAJI

PROPRIETOR, "NIRNAYA-SAGAR" PRESS.

BOMBAY.

1882.

(All Rights reserved by the publisher.)

# आलफ्रेद धि ग्रेत ह्याचें चरित्र.

हें पुस्तक,

इंग्लिश ग्रंथांच्या आधारानें,

## विनायक कोंडदेव ओक

ह्यांनीं लिहिलें.

तें

जावजी दादाजी ह्यांनीं आपल्या " निर्णय-सागर " छाप-
खान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

मुंबई.

( सन १८६७ च्या २५ व्या अक्टाप्रमाणें नोंदून प्रसिद्धकर्त्यानें
सर्व हक्क आपले स्वाधीन ठेविले आहेत. )

इ० सन १८८२.

# प्रस्तावना.

इंग्लंद देशास आज जें एवढें श्रेष्ठत्व प्राप्त झालें
ाहे, त्यास आलफ्रेद धि ग्रेत ह्याचे परिश्रम पुष्कळ
पयोगीं पडले आहेत. हा पुरुष खरोखरच फार थोर
ता. ह्याचें चरित्र फार बोधप्रद आहे. त्याच्या काळीं
तिहास लिहून ठेवण्याचा प्रघात नव्हता; ह्यामुळें,
ाच्या जितक्या गोष्टी कळाव्या तितक्या कळत ना-
त; तरी, इंग्लिश ग्रंथांतरीं ज्या कांहीं मिळाल्या, त्या
कत्र करून येथें सादर केल्या आहेत. ह्याचा काल-
र्देश मूळ ग्रंथांतच अगदीं स्थूलमानानें केला आहे.
तसाच ह्या पुस्तकांत करावा लागला आहे. ह्या
पुस्तकाच्या अवलोकनानें वाचणाऱ्यांचें मनोरंजन होऊन
यांस सुबोध होवो, अशी आमची इच्छा आहे. ती
परमेश्वर सफल करो.

# अनुक्रमणिका.


| भाग. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| पहिला– | विषयप्रवेश– आलफ्रेदाच्या पूर्वजांची हकीकत– जन्म– धर्मविद्याभ्यास– रोम येथें जाणें–देन्स लोकांच्या स्वाऱ्या–एदलउल्फ–त्याचें रोम येथें जाणें–परत येणें–जूदिथ हिशीं लग्न–पुस्तकें–आलफ्रेदाचे इतर व्यवसाय. इ०... ... ... ... ... | १–१० |
| दुसरा– | इंग्लंदाची स्थिति–देन्स लोकांचा दंगा–त्यांचें क्रौर्य आणि दुराचरण–त्यांशीं लढण्याची आंग्लोसाक्सनांची तयारी–कत्तल–थिओदोर ह्याची युक्ति–तुर्गार–त्याचें रक्षण–कांहीं चमत्कारिक गोष्टी. इ०... ... | १०–२३ |
| तिसरा– | आलफ्रेद सिंहासनारूढ झाला–गादीवर त्याचा हक्क–त्याची इच्छा–राज्याभिषेक–भावाची प्रेतक्रिया–देन्स लोकांचें प्राबल्य–आलफ्रेदाची हिंमत–बश्नेद–देन्स लोकांशीं तह–हालफदन–त्याशीं लढाया–बोध–देन्स लोकांचा पराभव–जय... ... ... | २३–३९ |
| चवथा– | आलफ्रेदाची निराशा–धैर्य–देन्स लोकांची स्वारी–आलफ्रेदाचें पश्चिमेकडे जाणें–आथेल्ने–धनगर–त्याचें घर–त्याची बायको आलफ्रेदाला लावून बोलली–त्याचा सोशीकपणा–त्याच्या मनाची स्थिति–त्याची मंडळी त्या- | |

| भाग. | विषय. | पृष्ठ |
|---|---|---|
| | ला भेटली–तिची तयारी–त्या संकटावस्थें-तही त्याचें औदार्य–स्वप्न–इ०... ... | ३९–५ |
| पांचवा– | आलफ्रेदाचे उद्योग–त्याला लोकसाह्य–अथेल्नी येथें भिंत बांधिली–सैन्याची सिद्धता–हब्बा–केनविथ किल्ला–हब्बाचें निशाण–आलफ्रेदाचा जय–ओदन ह्याचें शौर्य–देन्स लोकांची दुर्दशा–पुनः आलफ्रेदावर संकटें–तो किनऱ्याचें रूप घेऊन शत्रूच्या छावणींत गेला–गथ्रम–त्याशीं आलफ्रेदाचा स्नेह–आलफ्रेदाची तयारी–स्वप्न... ... ... | ५७–६ |
| साहावा– | युद्धाची सिद्धता,–गथ्रम ह्याची छावणी–आलफ्रेदाचें भाषण–गथ्रम ह्यास वेढा–तो शरण आला–सावसन लोकांचा देन्स लोकांवर क्रोध–त्याविषयीं आलफ्रेदाचे विचार–गथ्रम खिस्ती झाला–त्याला राज्य दिलें–आलफ्रेदाच्या राज्यांत स्वस्थता–लोकहिताचीं कामें इत्यादि ... ... ... ... | ६५–७७ |
| सातवा– | स्वस्थपणाचे दिवस–त्याचे लोकहिताचे उद्योग–आंग्लोसावसन लोकांचा मूळ स्वभाव–आलफ्रेदाला एका रोगाची पीडा–लोकांच्या विद्याभ्यासाविषयीं उत्सुकता–असर मठाधिपति–लातिन भाषेचा अभ्यास–आक्सफोर्ड येथील पाठशाळा–नवे किल्ले–वेळाची वांटणी–मेणबत्त्या–राज्यकारभारांतला चोखपणा... ... ... ... ...... | ७७–९२ |

| भाग. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| ...उवा. | हेस्तिंग–त्यापासून त्यास त्रास–त्याचा पराभव झाला–त्याची लबाडी–त्याचीं मुलें माणसें आल्फ्रेदाच्या हातीं लागलीं–त्यांवर उपकार–शेवटीं देन्स लोकांचा पराभव–आल्फ्रेदाचें आचरण–लोकप्रियता–शेवटचें दुखणें–पुत्रास बोध–अंतकाळ–स्वभावाचें वर्णन–उपसंहार... ... ... ... | ९२–१०८ |



आल्फ्रेद धि ग्रेत.

स. च.
१३४

# आलफ्रेद धि ग्रेत ह्याचें चरित्र.

## भाग पहिला.

ज्या राजांनीं स्वपराक्रमानें आपलीं राष्ट्रें उत्तम स्थितीस चढविलीं आहेत, आणि त्या कारणावरून ज्यांचीं नांवें इतिहासांत गर्जत आहेत, ते खरोखर धन्य होत. हिंदुस्थानाच्या इतिहासांत शिवाजीचें नांव, रूस देशाच्या इतिहासांत पीतर धि ग्रेत ह्याचें नांव, आणि आस्त्रिआच्या इतिहासांत फ्रेदरिक धि ग्रेत ह्याचें नांव जसें अत्यंत वर्णनीय झालें आहे, तसें इंग्लंदाच्या इतिहासांत आलफ्रेद धि ग्रेत ह्याचें यश अत्यंत वर्णनीय आहे. त्याचें चरित्र फार चित्तवेधक आहे. त्याचें आह्मी थोडक्यांत कथन करितों.

आलफ्रेद धि ग्रेत ह्याचा वृत्तांत लिहायास आरंभ करण्यापूर्वीं त्याच्या पूर्वजांविषयीं थोडीशी माहिती सांगणें हें योग्य वाटतें. ह्याच्या आजाचें नांव एग्बर्त होतें. तो इ० स० ८३६ ह्या वर्षीं मरण पावला. नंतर त्याचा वडील मुलगा एदलउल्फ हा त्याचे गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दींत देन्स ह्या नांवाचे रानटी आणि क्रूर लोक इंग्लंदास पहिल्यापेक्षां अधिक त्रास देऊं लागले. हे लोक मूळचे नार्वे व स्वीदन देशांतले राहाणारे होते; परंतु पुढें ते देन्मार्क देशांत येऊन राहिले. ह्मणून त्यांस देन्स असें नांव पडलें. ते साक्सन लोकांचेच जातभाऊ होते. राजाचा वडील मुलगा एदलस्तन ह्यानें त्या लोकांस देशांतून हांकून लावण्याचे पुष्कळ प्रयत्न केले; परंतु ते पूर्णपणें सफल झाले नाहींत.

ह्या चरित्राचा विषय आल्फ्रेद हा एदलउल्फ ह्याच्या सर्व मुलांत लहान होता. तो इ० स० ८४९ ह्या वर्षी बर्कशायर प्रांतांत वांतेज येथें जन्मला. सर्वांत लहान मुलावर आईबापांची ममता फार असते. त्याप्रमाणें एदलउल्फ आणि त्याची बायको हीं आल्फ्रेद ह्यास अगदीं जीवकाप्राण करीत असत. त्यास क्षणभर देखील आपणांपासून दूर राहूं देत नसत. परंतु, तो मुलगा तीन चार वर्षांचा असतां त्याची आई मरण पावली. तेव्हां त्याच्या व्यवस्थेंत तितकें थोडें अंतर पडलें. तरी, त्याचें सर्व प्रकारीं बरें करण्याविषयीं एदलउल्फ निरंतर जपत असे. त्यानें त्याचें लाडकें नांव बेंजामिन असें ठेविलें होतें. आणि तो जरी सर्वांत लहान मुलगा होता, तरी आपलेमागें त्यानें गादीवर बसावें, अशी त्याची फार इच्छा होती.

त्या वेळीं बहुतेक सर्व युरोपभर रोमन क्यायलिक धर्म चालू होता. त्या धर्माचा मुख्य अधिकारी पोप हा, हल्लींप्रमाणें, रोम शहरीं राहात असे. तें शहर जसें धर्माचें मुख्य ठिकाण होतें, तसें विद्येचेंही मुख्य ठिकाण होतें. तेथें प्रत्येक राष्ट्राच्या लोकांनीं बांधिलेले पुष्कळ मठ होते. त्यांत जोगी राहात; ते आपला सगळा वेळ ईश्वरध्यान, ग्रंथावलोकन, मनन आणि विद्यापठण ह्यांत घालवीत असत. त्यांच्या खर्चावेचाची तजवीज त्यांचीं राष्ट्रें ठेवीत असत. त्यांजपाशीं नानाप्रकारच्या विषयांवर सहस्रावधि ग्रंथ होते. आणि ज्या कोणा लोकांच्या मनांत आपल्या मुलांस विद्या शिकविण्याचें येई, ते त्यांस त्या कामाकरितां तेथें पाठवीत असत. त्या चालीप्रमाणें, आल्फ्रेद हा पांच वर्षांचा असतां,

त्यास त्याच्या बापानें रोम शहरास पाठविण्याची तयारी केली. त्याजबरोबर आपल्या योग्यतेस शोभण्यासारखा त्यानें लवाजमा दिला. कितीएक मोठमोठे सरदार आणि कांहीं धर्मोपदेशक त्याजबरोबर होते. ती राजपुत्राची स्वारी मोठ्या थाटमाटानें फ्रान्स देशांतून गेली. त्याला मार्गांत जेथें जेथें मोठीं शहरें लागलीं, तेथें तेथें त्याचें आगतस्वागत उत्तम प्रकारें झालें. तो सुरक्षितपणें रोम शहरीं पोहोंचला. तेथें त्याजकडून पोपाचें दर्शन करविलें; आणि त्यास दुसऱ्या कितीएक थोर आणि नामांकित गृहस्थांस भेटविलें. त्या ठिकाणीं कांहीं दिवस स्वस्थपणें घालविल्यावर, आपल्या बरोबरच्या मंडळीसहवर्तमान आलफ्रेद परत इंग्लंदास आला.

ह्या प्रवासाच्या संबंधानें एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, एदलउल्फ ह्यानें आलफ्रेदास जें ह्या वेळीं रोम शहरीं पाठविलें, तें विद्याभ्यासाकरितां किंवा यात्रेकरितां पाठविलें नव्हतें; तर, त्या मुलाची प्रसिद्धि व्हावी, आणि तो केव्हां तरी इंग्लंदाचा राजा होणार आहे हें सर्वांस कळावें, हा त्याचा मुख्य हेतु होता.

इकडे इंग्लंदावर स्वाऱ्या करकरून देन्स लोकांनीं एदलउल्फ ह्यास अगदीं त्रासवून सोडिलें; आणि, वय झाल्यामुळें, तो राज्यकारभाराला फार कंटाळला. आणखी त्याचे मुलगे बरेच प्रौढ झाले होते. ह्मणून त्यानें स्वतः रोम शहराच्या यात्रेस जाण्याचा विचार केला. त्याप्रमाणें सगळी सिद्धता झाली. एदलउल्फ ह्यानें आपला वडील मुलगा एदलस्तन ह्याचे हातीं सगळा राज्यकारभार दिला; कामेंकाजें कोणत्या रीतीनें चालवावीं, हें त्यास चांगलें समजावून सांगितलें; आपल्या योग्यतेनुरूप मोठा लवाजमा

आपणाबरोबर घेतला; आणि आपला आवडता धाकटा मुलगा आलफ्रेद ह्यासहवर्तमान रोम शहरीं जाण्याची तयारी केली. तेव्हां तो मुलगा सात वर्षांचा होता.

त्या काळीं ऐषआरामाचे आणि नक्षीचे पदार्थ तयार करण्यांत फारशी सुधारणा झाली नव्हती. तरी, घोड्यांवर घालण्याचें सामान, योद्ध्यांचे पोषाक, शस्त्रास्त्रें, इत्यादिकांची तयारी कांहीं कमी नव्हती. एदलउल्फ ह्याजबरोबर सरदार, स्वार, शिबंदी, आणि चाकरमाणसें ह्यांचा भरणा चांगला होता. त्या सर्वांचे पोषाक मोलवान होते. आणि त्यांनीं आपणांबरोबर द्रव्य पुष्कळ घेतलें होतें. तेणेंकरून, त्यांच्या स्वारीकडे पाहून फ्रान्स देशांतले लोक थक्क होऊन गेले. त्यांचा राजा चार्लस हा एदलउल्फ ह्यास मोठ्या समारंभानें भेटला. तेव्हां उभयतांचीं भाषणें बरींच झालीं. एदलउल्फ हा कांहीं दिवस फ्रान्स देशाच्या राजाचे येथें पाहुणचार घेत राहिला. तितक्या मुदतींत एक चमत्कारिक गोष्ट घडली. ती अशी कीं, चार्लस राजास जूदिथ ह्या नांवाची अत्यंत रूपवती बारातेरा वर्षांची एक कन्या होती, तिजवर एदलउल्फ ह्याचें मन गेलें; आणि तिशीं आपलें लग्न करण्याचा विचार त्यानें केला. तो राजा ह्या वेळीं वृद्ध झाला होता; आणि त्याचे ठायीं शक्ति मुळींच राहिली नव्हती. तरी, कामानें त्याची उचल केली. आपण वृद्ध आहों, हें तो विसरला व विषयाच्या नादीं लागला. विषयाच्या संबंधानें वृद्धपणावर कधींही विश्वास ठेवूं नये.

कांहीं दिवस फ्रान्सांत राहिल्यावर एदलउल्फ रोम शहरीं गेला. तेथच्या लोकांनीं त्याचा फार आदरसत्कार केला. तो पुरा रोमन क्याथोलिक होता, हें तेथील धर्मोपदेशकांस

ग्राऊक होतें. तेणेंकरून त्यांत त्याचें चांगलें वजन पडलें. पोपास नजर देण्याकरितां त्यानें अनेक मोलवान वस्तु नेल्या होत्या. त्यांत एक सुवर्णाचा मुकुट होता. तो दोन शेर वजनाचा होता. एक उत्कृष्ट तरवारही होती. तिच्या मुठीला हिरेमाणकें जडलीं होतीं. ह्यांशिवाय सोन्यारुप्याचीं भांडीं आणि भरजरीचे पोषाक होते. एदलउल्फ ह्यानें रोम येथील धर्मोपदेशकांस आणि धर्मार्थ कारखान्यांस पुष्कळ पैसा दिला. तेणेंकरून त्याचा पुष्कळ लौकिक झाला. तेथें बरेच दिवस राहाणें झाल्यामुळें आलफ्रेदलाही धर्माचें आणि इतर गोष्टींचें ज्ञान झालें. तेथली मोठी साक्सन लोकांची पाठशाळा आदले वर्षींच जळाली होती; ती त्यानें पुनः बांधविली, आणि तिची सर्व प्रकारची सोय करून दिली. आणि, त्या शहरांतील साक्सन लोकांचे कांहीं हक्क कांहीं कारणांवरून नाहींतसे झाले होते, ते, त्यानें पोपास विनंति करून, त्याजकडून त्यांस परत देवविले.

एक वर्षपर्यंत रोम येथें वास केल्यानंतर एदलउल्फ परत स्वदेशीं यावयास निघाला. तो फ्रान्सांत आला. तेथें जूदिथ पुनः त्याच्या दृष्टीस पडली. तिजवर त्याचें मन जडल्याविषयीं मागें सांगितलेंच आहे. तिशीं त्यानें आपलें लग्न लाविलें, आणि तिचें नांव लिओथिता असें ठेविलें. हें लग्न त्या मुलीच्या संमतानें झालें किंवा तिच्या बापाच्या आग्रहामुळें झालें, ह्याविषयीं इतिहासांत कोठें कांहीं लिहिलें नाहीं. परंतु, मनुष्याचा स्वभाव बहुतकरून सर्वत्र एकसारखा असतो, हें खरें समजून जर विचार केला, तर ह्या लग्नाच्या कामांत त्या मुलीचें संमत नसावें, असें वाटतें. मग खरें काय असेल तें असो.

ह्मातारा एदलउल्फ आणि त्याची नवी तरुण राणी लि-ओथिता हीं आलफ्रेदासहवर्तमान इंग्लंदास परत आलीं. तेव्हां तेथें सगळा घोंटाळा झाला होता. ह्मणजे एदलउल्फ ह्यानें आपलें राज्य ज्याचे स्वाधीन केलें होतें, तो त्याचा वडील मुलगा एदलस्तन हा मरण पावला होता, आणि त्याचा धाकटा भाऊ एदलबाल्द हा बंडाचा झेंडा उभारून सगळें राज्य बळकावयास पाहात होता. तेणेंकरून एदलउल्फ ह्यास फार वाईट वाटलें. तरी, त्यानें मोठ्या युक्तीनें आपल्या बंडखोर मुलास समजावून, त्याला कांहीं प्रांत दिले, आणि ती गडबड मोडून टाकिली.

एदलउल्फ इ० स० ८५७ त मरण पावला. नंतर ए-दलवाल्द हा सगळ्या राज्याचा धनी झाला. तोही आपले बापासारखा विषयी होता. त्यानें, जनाची आणि मनाची सगळी लज्जा सोडून, आपले बापाची विधवा स्त्री जूदिथ हीस आपणाशीं लग्न लावण्याविषयीं आग्रह केला. तो तिला मानवला. आणि मग त्यांचें लग्न लागलें. अशीं निर्ल-ज्जपणाचीं उदाहरणें इतिहासांत फार थोडीं सांपडतील.

आलफ्रेद दिवसेंदिवस मोठा होत चालला; प्रवासाच्या योगानें त्याला पुष्कळ नव्या गोष्टी कळल्या होत्या; तो मोठा विचारी असल्यामुळें त्याला दरबारांतल्या सगळ्या उलाढाली समजत होत्या; आणि त्याच्या विद्याभ्यासाकडे जूदिथ हिचें फार लक्ष होतें. ती त्याशीं नानाप्रकारच्या विषयांवर बोले, नवनव्या गोष्टी विचारून घेण्याविषयीं त्याला उत्ते-जन देई, त्याला जें समजत नसे तें सांगे, आणि जेणेंकरून त्याची बुद्धि प्रगल्भ दशेस येईल असें तिला वाटे, ते सर्व उपा-य मोठ्या उत्सुकतेनें ती करी. तो तिचा फार लाडका असे.

जी जी आळ तो घेई, ती ती ती पुरवी. अशा प्रकारें मुलास वागविलें ह्मणजे त्याचे ठायीं हट, तिरसटपणा, अमर्यादपणा, इत्यादि दुर्गुण उत्पन्न झाल्यावांचून बहुधा राहात नाहींत. परंतु ह्या मुलाची गोष्ट तशी नव्हती. तो वयानें लहान होता, तरी, त्याची बुद्धि फार मोठी होती; आणि आपण कोणत्या रीतीनें वागलों असतां आपलें हित होईल हें त्याला लहानपणापासून समजत होतें. ह्मणून त्यानें फार सावधगिरीनें राहून तशा प्रकारचे दुर्गुण आपणामध्यें शिरूं दिले नाहींत.

आलफ्रेद ह्यास आंग्लोसाक्सन भाषेतील कवितांचा नाद फार असे. त्यांत लढाया, शूरांचीं चरित्रें, प्रवासांतील संकटें इत्यादिकांचें वर्णन चित्तवेधक रीतीनें केलेलें आहे, तें त्याला फार आवडे. शिवाजी महाराजांस भारत, भागवत आणि शिकंदर बादशाहास होमरकविकृत काव्य जसें अप्रतिम वाटे, तसें तें आंग्लोसाक्सन काव्य आलफ्रेदास वाटे. त्याला तेव्हां लिहितां वाचतां येत नव्हतें. ह्मणून त्यांतील पद्यें त्याला मुखोद्गत करावीं लागत.

ह्या वेळीं आलफ्रेद सुमारें बारा वर्षांचा होता. तो एवढा मोठा झाला असतां, आणि त्याच्या विद्याभ्यासाकडे इतकें लक्ष दिलेलें असतां, त्याला लिहितां वाचितां येत नव्हतें, हें ऐकून कोणालाही आश्चर्य वाटल्यावांचून राहाणार नाहीं. परंतु तसें नवल वाटण्याचें कारण नाहीं. कांकीं, लिहिणें वाचणें जें आहे, तें, ज्यांस कांहीं कामधंदा करून पोट भरावयाचें आहे, त्यांनीं मात्र शिकावें, आणि तें राजपुत्रांसारख्यांनीं शिकणें हें त्यांचें हलकेपण आहे, असा तेव्हां सर्वांचा समज होता. ह्मणून तें आलफ्रेदास कोणीं शिकविलें नव्हतें. त्या काळीं कारकुनीचें काम करणारे लोक

आणि धर्मोपदेशक ह्यांस मात्र लिहितां वाचितां येत असे. राजे, राजपुत्र, प्रधान, सेनापति, सरदार इत्यादि थोर पुरुषांच्या नांवानें कागदपत्र होत असत. त्यांजवर ते आपल्या सहीच्या ऐवजीं आपले हातानें वेडीवांकडी + अशी चार टोंकांची फुली करीत. हें आपल्या देशांतील कुणब्यांच्या निशाणी नांगरासारखें होतें.

त्या वेळीं पुस्तकें छापण्याची कळा कोणास ठाऊक नव्हती. ह्मणून लोकांमध्यें हातानें लिहिलेलीं कायतीं पुस्तकें असत. तीं फार थोडीं असत. कारण, तीं तयार करण्यास अतिशयित वेळ लागे, व श्रमही फार पडत. श्रीमंत लोकांच्या उपयोगाकरितां जीं पुस्तकें तयार करीत, तीं बहुतकरून उत्तम प्रकारें कमावलेल्या कातड्यांचीं असत, आणि त्यांजवर सोनेरी शाईनें सुशोभित अक्षरें आणि चित्रें काढिलेलीं असत. जूदिथ ही आपल्या माहेरीं असतांच आंग्लोसाक्सन भाषा शिकली होती; आणि तिला पुस्तकें वाचण्याची बरीच हौस होती. तिजपाशीं, सोनेरी वेलबुट्टी काढलेलें असें आंग्लोसाक्सन भाषेचें एक सुंदर पुस्तक होतें. तें पाहात ती एके वेळीं आपल्या खोलींत बसली असतां, आल्फ्रेद आणि त्याचे दुसरे भाऊ सहज तेथें आले, आणि ते सगळे तिजपाशीं तें मागूं लागले. तेव्हां तिनें त्यांस सांगितलें कीं, "जो हें वाचायास शिकेल, त्याला हें मी बक्षीस देईन." हें तिचें उत्तर मनांत धरून, आल्फ्रेदानें लागलाच एक शिक्षक ठेविला, आणि अगदीं थोड्या दिवसांत तो त्याजपाशीं वाचायास शिकला. नंतर तें मनांत भरलेलें पुस्तक मोठ्या हौसेनें त्यानें जूदिथ हिजकडून मिळविलें. दरिद्र्यांच्या पोरांस सर्व गोष्टींची

वाण असते; आणि त्यांस दोन अक्षरें यावीं ह्मणून त्यांचीं आईबापें पराकाष्ठेचे श्रम करीत असतात; आणखी क्रूर गुरु त्यांस गुरांप्रमाणें झोडीत असतात, तें वेगळेंच; तरी त्यांस अभ्यास करण्याची वासना होत नाहीं. आणि प्रारब्धीं विद्या असली ह्मणजे, आलफ्रेदाप्रमाणें, सर्व सुखाची समृद्धि, कोणी कळवळ्याचें मनुष्य नाहीं, आणि शिक्षा होण्याचें भय स्वप्नींही नाहीं, अशी स्थिति असतांही विद्याभ्यासाचा उद्योग मनुष्याचे हातून होतो. असो.

आलफ्रेदास आंग्लोसाक्सन भाषेंत बरीच प्रवीणता प्राप्त झाल्यावर, त्यास लातिन भाषा शिकायाची इच्छा उत्पन्न झाली. कारण, युरोपांतल्या सर्व राष्ट्रांतील विद्वान लोक ती भाषा बोलत असत, आणि त्यांचा सगळा पत्रव्यवहार त्याच भाषेंत चालत असे; धर्मसंबंधीं पुस्तकें, शास्त्रीय विषयांचीं पुस्तकें, इतिहास, प्राचीन कथा, इत्यादि सर्व प्रकरणें केवळ त्या भाषेंत लिहिलेलीं होतीं; तीं सगळीं आपण पाहावीं, असा त्याचा फार मनोदय होता.

ह्याप्रमाणें आलफ्रेदाचें मन जरी विद्याभ्यासांत गुंतलें होतें, तरी त्यानें इतर विषयांकडे दुर्लक्ष केलें होतें, असें नाहीं. तो मोठा चपळ आणि बळकट होता. त्याची उठण्याबसण्याची रीत सभ्य आणि मनोहर होती. तो शरीरानें सुदृढ होता. त्याला तालमेंतले खेळ उत्तम प्रकारें येत होते. शिकारीच्या कामांत तर त्याची बरोबरी कोणाच्यानेंही करवेना. सारांश, राजपद मिळविण्यास आणि संभाळण्यास जे गुण मनुष्यामध्यें त्या काळीं आवश्यक होते, ते सर्व त्याचे ठायीं वसत होते, असें लोकांस दिसून आलें.

एदलउल्फ आणि जूदिथ ह्यांचा जो संबंध जडला

होता, त्याविषयीं इंग्लंदच्या सर्व लोकांस वाईट वाटलें; आणि त्यावरून ते त्याचा तिरस्कार करूं लागले. विंचेस्तरच्या धर्माधिकाऱ्यानें तर त्याचा इतका निषेध केला कीं, त्याच्या योगानें त्यास मोठा पश्चात्ताप झाला. त्यानें लागलेंच तिला सोडून दिलें; एवढेंच केवळ नव्हे; तर, त्या पापाबद्दल त्यानें जें प्रायश्चित्त सांगितलें, तें घेण्यास तो तयार झाला. अशा प्रकारें जूदिथ हिचा संबंध तुटल्यावर, तिला जो जमीनजुमला तिच्या दोघां नवऱ्यांनीं बक्षीस दिला होता, तो तिनें विकून टाकिला; आणि आपली सगळी चीजवस्त बरोबर घेऊन स्वदेशीं गमन केलें. ती इंग्लंदांतून निघाली तेव्हां तिला आलफ्रेदाविषयीं फार वाईट वाटलें. फ्रान्सांत पोहोंचल्यावर थोडक्या दिवसांनीं तिनें तिसऱ्या राजाशीं आपलें लग्न केलें. त्या राजाचें राज्य बालतिक समुद्र आणि ऱ्हैन नदी ह्यांच्यामध्यें होतें. हें तिसरें लग्न पोपाच्या परवानगीनें मोठ्या समारंभानें झालें. ह्या पुढची जूदिथ हिची गोष्ट येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. कां कीं आलफ्रेद धि ग्रेत ह्याच्या चरित्राशीं तिचा संबंध नाहीं. तरी, जी तिची थोडीशी कथा येथें लिहिली आहे, तिजवरून, त्या वेळीं लोकरीति आणि धर्मस्थिति ह्या कशा होत्या, ह्याचें सहज अनुमान करितां येतें.

---

## भाग दुसरा.

मागच्या भागांत आलफ्रेद धि ग्रेत ह्याचे वाडवडील, त्याचें जन्म, त्याचें बालपण, त्याचा विद्याभ्यास, आणि त्याच्या वडील भावाच्या कांहीं गोष्टी, ह्यांचें वर्णन झालें. आतां तो

सिंहासनारूढ झाल्याच्या काळाचें कथन कारण्याचा प्रसंग जवळ आला आहे. ह्मणून त्या सुमारास इंग्लंदाची स्थिति कशी होती, हें सांगणें आवश्यक आहे, असें वाटतें. त्याविषयीं थोडेंसें विवेचन करूं.

ज्या वेळाचें वर्णन आतां करावयाचें आहे, त्या वेळीं इंग्लंदांत मोठी धामधूम चालली होती. लोकांत स्वस्थपणा मुळींच नव्हता. जो तो अपल्या निर्वाहाच्या आणि प्राणरक्षणाच्या फिकीरींत असे. हा इतका सगळा अनर्थ देन्स लोकांच्या हल्लयांमुळें ओढवला होता. त्यांची साद्यंत हकीकत लिहिण्यास येथें अवकाश नाहीं. तरी, तेव्हांच्या स्थितीचें सरासरी अनुमान करितां यावें, ह्याकरितां कांहीं गोष्टी सांगतों.

देन्स लोक स्वभावानें दांडगे आणि फार क्रूर होते. ते इंग्लंदांतल्या लोकांचे हाडवैरी होते. इंग्लंदांतले तेव्हांचे लोक आंग्लोसाक्सन ह्या नांवानें प्रसिद्ध होते. त्यांस देन्स लोक अगदीं पाण्यांत पाहात, आणि त्यांचा धर्म जो ख्रिस्ती धर्म, त्याचा नाश करण्याविषयीं जसा त्यांनीं विडाच उचलला होता. देन्स लोक मूर्तिपूजक होते. त्यांची स्वारी गलबतांवरून इंग्लंदांत उतरली, ह्मणजे तिची पहिली उडी ख्रिस्ती धर्माचे मठ आणि भजनालयें ह्यांजवर असे. ह्याचें एक कारण धर्मद्वेष हें होतें; आणि दुसरें कारण असें होतें कीं, त्या भजनालयांत आणि मठांत, उत्तम बंदोबस्ताचीं ठिकाणें ह्मणून, मोठमोठे राजेरजवाडे आपले खजीने ठेवीत असत; ह्यांशिवाय तेथील जोग्यांस आणि जोगिणींस, धर्मकर्माकरितां सोन्यारूप्याचीं नानाप्रकारचीं भांडीं आणि बहुमूल्य वस्त्रें मिळालेलीं असत; तीं लुटून नेण्याविषयीं त्यांस फार द्रव्यलोभ होता. ह्मणून त्यांस मठांवर आणि

भजनालयांवर धाड घालण्यास जितका आवेश येत असे, तितका आवेश दुसऱ्या कोणत्याही कामाविषयीं येत नसे. ख्रिस्ती धर्माचा द्वेष आणि द्रव्यलोभ, ह्या दोहोंविषयींच ते आपली मनीषा पूर्ण करून स्वस्थ राहात नसत. तर, तेथें ज्या तरूण आणि रूपवान जोगणी असत, त्यांच्या नीतिनियमांचा भंग करून आपली दुष्ट आणि पापिष्ट कामवासना ते पुरवीत असत. ह्याविषयीं एक भयंकर गोष्ट प्राचीन पुस्तकांत लिहिली आहे. ती अशी कीं, एका मठा-वर जेव्हां देन्स लोकांचा हल्ला आला, तेव्हां, त्यांच्या क्रूर आणि पापिष्ट स्वभावांस भिऊन, तेथील तरूण जो-गिणींनीं, त्यांच्यांतल्याच एका वयोवृद्ध बाईच्या सूचने-वरून, आपल्या पवित्र नीतिनियमांच्या रक्षणाकरितां, आपलीं तोंडें, नाकें, गाल, कान आणि कपाळें, ओरबा-आणि ।णि कापून छिन्नविच्छिन्न करून घेतलीं. ती त्यांची परवा/सफल झाली. परमेश्वरानें लावून दिलेल्या नीतिमा-र्गानें चालणाऱ्या मनुष्यांस विनाकारण अशा विपत्ति भोगा-व्या लागतात, हें पाहून मनास फार वाईट वाटतें.

इंग्लंदाच्या पूर्वभागीं लिंकनशायर ह्या नांवाच्या प्रांतां-त, त्याच्या दक्षिण मर्यादेजवळ, क्रौनल्यांद ह्या नांवाचा एक मठ तेव्हां फार प्रसिद्ध होता. तेथें जोगी पुष्कळ राहत असत. त्यांत फ्रायर जोली ह्मणून एक मुख्य होता. तो एके वेळीं, आपले दोनशें अनुयायी बरोबर घेऊन देन्स लोकांशीं लढायास गेला होता. ह्यावरून तेव्हांचे मठवासी कसे होते, ह्याचें सहज अनुमान करितां येतें. तो मठ आ-तां उभा नाहीं. तरी त्याचे अवशेष अद्याप दृष्टीस पडतात.

लोकांमध्यें लढण्याची इच्छा आणि तयारी इतकी चां-

गली होती, तरी देन्स लोकांपुढें त्यांचें सगळें सैन्य कांहींच नव्हतें. त्या सैन्यांतील लोकांजवळ मोठमोठया ढाला असत; त्या पुढें करून ते शत्रूच्या बाणप्रहारापासून आपला बचाव करीत; आणि त्यांच्या हातांत भाले असत, त्यांच्या योगानें ते शत्रूच्या स्वारांस जवळ त्रिलगूं देत नसत. अशाप्रकारें ते प्रहरांचे प्रहर उभे राहात. पुष्कळ वेळपर्यंत लढाई झाल्यानंतर, जसे काय दमल्यासारखे दाखवून, देन्स लोक समरांगण सोडून जात; आणि साक्सन लोक निर्भयपणें जरा इकडे तिकडे हिंडूं लागले, ह्मणजे त्यांजवर ते एकदम चालून येऊन तुटून पडत, आणि त्यांची कत्तल उडवीत. अशी त्यांची लढाईची रीति होती.

एके प्रसंगीं अशी कत्तल उडाल्यावर, कांहीं घायाळ झालेले साक्सन लोक, तें वर्तमान मठवाशांस कळविण्यास क्रौनल्यांद मठाच्या दाराशीं गेले. तेव्हां आंतले सगळे जोगी प्रार्थना करण्यांत गुंतले होते. त्यांचा मुख्य जोगी थिओदोर ह्या नांवाचा होता. त्याला तें भयंकर वर्तमान समजतांच त्यानें स्वसंरक्षणाचा विचार केला. तो असा. त्यानें मठामध्यें कांहीं अगदीं वृद्ध जोगी आणि कांहीं मुलें एवढीं ठेवून घेऊन, बाकीच्या तीस असामींस होड्यांत बसवून, आपल्या सगळ्या मौल्यवान वस्तूंसुद्धां, जवळच्या एका बंदोबस्ताच्या ठिकाणीं पाठवून दिलें. ह्यांतला त्याचा मुख्य आशय एवढाच होता कीं, त्या क्रूर लोकांनीं जर आपल्या मठावर हल्ला केला, तर, वृद्ध साधु आणि अनाथ मुलें ह्यांची दया येऊन त्यांनीं त्यांस धका लावूं नये, आणि त्यांस द्रव्यप्राप्तिही होऊं नये. मनुष्यास स्वसंरक्षण जर शौर्यानें करवत नाहीं, तर तें त्यानें दैन्यानें करावें, हें उचित होय.

ह्या होड्या नेमिलेल्या ठिकाणीं पोहोंचल्या. तेथील वि- श्वासू जोग्यानें त्या तीस असामींस झाडींत दडविलें, आणि त्यांजबरोबर जें द्रव्य होतें, तें जमिनींत पुरून टाकिलें.

अशी तयारी केल्यावर, आणखी जीं थोडींशीं भांडीं आणि वस्त्रें मठांत राहिलीं होतीं, तींही थिओदोरानें मो- ठ्या युक्तीनें तेथल्या तेथें दृष्टीआड करून ठेविलीं, आणि त्या वांघांची धाड येणार असें त्याला खचीत वाटल्यावर, तो बाकीच्या जोग्यांसहवर्तमान, होमकुंडाशीं बसून, मोठ्या भक्तिभावानें परमेश्वराराधना करूं लागला. असें करण्याचा त्याचा हेतु एवढाच होता कीं, अशा स्थितींत जर देन्स लो- कांनीं आपणांस पाहिलें तर, देवास भिऊन तरी ते आपणां- स त्रास देणार नाहींत. परंतु,पाषाणहृदयांस कशाची परमे- श्वराराधना आणि कशाचें काय ? मठांत प्रवेश केल्याबरो- बर त्यांनीं प्रथम थिओदोर ह्यास ठार मारिलें; आणि मग बाकीच्यांवर शस्त्र धरून त्यांचीं डोकीं उडविलीं. त्या वृद्ध मठ- वाशांचें साधुत्व आणि त्या अर्भकांचें अनाथत्व हीं पाहून त्या क्रूर पशूंच्या अंतःकरणांत दयेचा वासदेखील उत्पन्न झाला नाहीं. ह्या कत्तलींतून, मठांतल्या मंडळींपैकीं, एक दाहा वर्षांचा मुलगा मोठ्या चमत्कारिक रीतीनें वचावला. त्याचें नांव तुर्गार असें होतें.

तुर्गार हा स्वरूपानें फार सुंदर होता; त्याची मुखचर्या फार मनोरम होती; आणि त्याची वोलण्याचालण्याची धाट- णी मोहक होती. मठामध्यें एकसारखी तरवार चालली हो- ती तेव्हां, कौंत सिद्रोक ह्या नांवाच्या एका देन्स सरदारा- ची दृष्टि सहज त्याजकडे गेली, आणि त्याचें रक्षण करण्या- विषयीं त्यास इच्छा उत्पन्न झाली. ह्मणून त्याला त्यानें लाग-

लेंच आंग्लोसाक्सन मंडळींतून एकीकडे काढिलें, त्यास देन्स लोकांच्या चालीचा पोषाक घातला, आणि निरंतर आपणाजवळ असण्याविषयीं सांगितलें. त्याप्रमाणें तो अगदीं देन्स होऊन त्याजबरोबर राहूं लागला.

मठांतली कत्तल आटोपल्यावर देन्स लोकांनीं, त्यांत जें कांहीं होतें नव्हतें तें सगळें लुटून घेऊन, त्यास आग लाविली. आणि त्यांतलीं प्रेतें तशींच तेथें राहूं दिलीं. नंतर ते जवळच्या दुसऱ्या एका मठावर गेले; आणि, क्रौनल्यांदाप्रमाणेंच त्याची दुर्दशा त्यांनीं करून टाकिली.

ह्या दोन मठांत त्यांस पुष्कळ लूट मिळाली. ती त्यांनीं बंदोबस्तानें पेऱ्यांत भरिली; आणि त्या सगळ्या पेऱ्या गाड्यांवर घालून, त्यांसहवर्तमान, स्वारीचा रोख दक्षिण प्रदेशाकडे वळविला. ह्यांतल्या कांहीं गाड्या कौंत सिद्रोक ह्याच्या ताब्यांत होत्या; आणि त्या सगळ्यांच्या मागें होत्या. त्या एका नदींतून पलीकडे जात असतां, त्यांचीं चाक गाळांत गुंतलीं; तीं कांहीं केल्या वर निघेनात, आणि गाड्या पुढें सरकेनात. तेव्हां कौंत सिद्रोक हा त्या काढण्याच्या खटपटीस लागला. इतक्यांत त्याची नजर चुकवून, तुर्गार हा जवळच्या एका झाडींत जाऊन लपून राहिला, आणि पुढें कांहीं वेळानें, रात्रीच्या मजला करीत करीत, क्रौनल्यांद मठांत परत आला.

इकडे क्रौनल्यांद येथून देन्सलोक निघून गेल्यावर, तेथले जे जोगी हल्ल्याच्या गडबडींत अरण्यामध्यें पळून जाऊन लपून राहिले होते, ते तेथें परत आले, आणि त्यांनीं आपणांपैकीं एकास मुख्य करून पुनः तेथचें काम पुर्ववत चालविलें. देन्स लोकांनीं तो मठ जाळून टाकिला होता,

आणि आंतलें सगळें सामान लुटून नेलें होतें; तरी त्याची पुनः नीट व्यवस्था लागण्यास फार वेळ लागला नाहीं. का कीं ते मठवासी विलक्षण उद्योगी होते, आणि त्यांजवर आसपासच्या लोकांची निष्ठा फार होती.

आणखी देन्स लोकांच्या संबंधानें आंग्लोसाक्सन लोकांच्या पुष्कळ गोष्टी पुस्तकांतून लिहिल्या आहेत. त्या इतक्या चमत्कारिक आहेत कीं, त्या खऱ्या आहेत असें देखील कोणास वाटावयाचें नाहीं. एदमंद ह्या नांवाचा एक राजा इंग्लंदाच्या पश्चिम भागावर राज्य करीत होता. त्याचें आणि देन्स लोकांचें हाडवैर एका चमत्कारिक गोष्टीवरून आलें. तिचा प्रकार असा. लोथब्राक ह्या नांवाचा एक साहसी तरुण देन्स होता. तो एका लहानशा होडींत बसून, जर्मन समुद्रांतील एका बेटाकडे शिकार करण्यास जाण्याच्या हेतूनें निघाला. त्यानें आपला बहिरीससाणा आपणाबरोबर घेतला. कुत्र्यांस जसें जमिनीवरचीं श्वापदें धरण्यास शिकवितात, तसें त्याला त्यानें पक्षी पकडून आणण्यास शिकविलें होतें. असे बहिरीससाणे जवळ बाळगून त्यांस शिकारीचे कामांत तरबेज करण्याची चाल तेव्हां लोकांत फार होती. लोथब्राक प्रथम कांहीं वेळपर्यंत आपली होडी सुरक्षितपणें हांकून बऱ्याच अंतरावर गेला. परंतु, पुढें एकाएकीं वादळ सुटलें. लाटा मोठमोठ्या उसळूं लागल्या; होडी डळमळूं लागली; आणि ती लोथब्राक ह्याच्या स्वाधीन नाहींशी झाली. ती झोंके खात खात एका अडचणीच्या जागीं जाऊन बुडाली. आणि तिचा मालक, पोंहतपोंहत मोठ्या कष्टानें इंग्लंद देशाच्या किनाऱ्यावर जाऊन पोहोंचला. तेव्हां तो बहिरीससाणा त्याबरोबर होता.

आपल्या हाडवैऱ्यांच्या देशामध्यें आपण आलों आहों, असें पाहून लोथब्राक ह्यास फार वाईट वाटलें; आणि आपण कोण आहों हें सहसा ओळखूं द्यावयाचें नाहीं, असा त्यानें निश्चय केला. तो बहुतकरून सर्व दिवसभर अरण्यांत राही; आणि कंदमुळें खाऊन उपजीविका करी. परंतु, एके दिवशीं सहज हिंडतां हिंडतां तो कांहीं आंग्लोसाक्सन लोकांस आढळला. त्यांनीं त्याला ओळखिलें, आणि लागलेंच पकडून एकदम राजाकडे नेलें. त्यां वेळीं तो बहिरीससाणा त्याच्या हातांत होता.

लोथब्राक ह्याची मुखचर्या पाहून एदमंद राजास आनंद झाला, आणि त्याचें येणें इंग्लंदास कसें झालें ह्याचें वर्तमान ऐकून त्याला मोठें नवल वाटलें. त्याला कोणत्याही प्रकारें त्रास न देण्याविषयीं त्यानें आपल्या लोकांस ताकीद देऊन त्यास सोडून दिलें; आणि शिकारीच्या कामांत तो कुशल आहे, असें कांहीं दिवसांनीं त्याला कळल्यावर, त्यानें त्याला आपणाजवळ ठेवून घेतलें, आणि शिकारीच्या वेळीं त्यास बरोबर नेण्याचा पाठ घातला. तोही त्या राजाशीं इमानें इतबारें वागूं लागला. आणखी त्याजपाशीं एक फार चांगला शिकारी कुत्रा होता, त्यामुळें त्याजवर राजाचा लोभ विशेष जडला. शिकारीच्या कामांत लोथब्राक ह्मणेल तें प्रमाण, असें झालें. राष्ट्रांच्या संबंधानें राजास जो केवळ शत्रु वाटावा, तो सद्गुणांच्या योगानें त्याचा मित्र झाला, ही गोष्ट येथें लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

राजांच्या दरबारांत लचांडें फार असतात; तेथें वागण्याचें काम फार नाजूक असतें; आणि तेथल्या लोकांची स्थिति अशी असते कीं, त्यांचा कांहींएक अपराध न केला

तरी ते एकाद्या तिऱ्हाईत माणसाचा मत्सर करितात, आणि कधीं कधीं त्याच्या समूळ नाशास कारण होतात. लोथब्राक ह्याची अवस्था तशी झाली. ती अशी. एदमंद राजाच्या दरबारच्या मंडळींत बिरोन ह्या नांवाचा एक गृहस्थ होता. तो शिकारीच्या कामांत निपुण होता; ह्मणून राजास तो फार आवडत असे, आणि पारधीस जातेवेळीं त्यावांचून एक पाऊलदेखील तो पुढें टाकीत नसे. त्याचे ठायीं लोथब्राक ह्याविषयीं मत्सर उत्पन्न झाला; तो इतका कीं, कोणत्या तरी उपायांनीं त्यास नाहींसें करून टाकावयाचें, असा त्यानें निश्चय केला. पुढें एके दिवशीं, राजाबरोबर ते रानांत शिकारीस गेले असतां, एका श्वापदामागें धांवतां धांवतां, एका किर्र झाडींत केवळ ते दोघेच प्राप्त झाले. तेथें विश्वासघात करून, बिरोन ह्यानें लोथब्राक ह्याला ठार मारिलें, आणि कोणाच्या समजण्यांत येणार नाहीं अशा रीतीनें पुरून टाकिलें. नंतर तो आपल्या घरीं गेला. त्याबरोबर त्याचे सगळे कुत्रे गेले. परंतु, लोथब्राक ह्याचा जो शिकारी कुत्रा होता, तो, त्याच्या धन्यास जेथें पुरिलें होतें, तेथें शोक करीत बसला. लोथब्राक कां आला नाहीं, असें राजानें व दरबारच्या इतर लोकांनीं बिरोन ह्यास विचारिलें; तेव्हां त्यानें असें उत्तर दिलें कीं, श्वापदांमागें धांवत तो जो जंगलांत गेला, तो परत आला नाहीं, आणि त्याचें काय झालें हें मला ठाऊक नाहीं.

लोथब्राक ह्याचा कुत्रा, त्याला पुरलें होतें त्या ठिकाणीं दुःख करीत बसला होता; त्याला फार भूक लागल्यामुळें तो घरीं आला. त्याला पोट भरण्यापुरतें खाणें मिळाल्याबरोबर तो पुनः त्या जंगलांत जाऊन त्या ठिकाणीं बसला.

असें कितीएक दिवस चाललें होतें. तें दरबारी लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येतांच, त्यांनीं कांहीं माणसें पाठवून ती जागा उकरवली, आणि अंत पाहूं लागले तों लोथब्राक ह्याचें प्रेत सांपडलें.

मग त्याविषयीं चौकशी सुरू झाली. तींत त्या खुनाचा अपराध बिरोन ह्यावर शाबीत होण्यास कांहींएक अडचण पडली नाहीं. राजास त्याचा अतिशयित राग आला, आणि त्यानें असा ठराव केला कीं, लोथब्राक ह्याची फुटकी होडी जी किनाऱ्यास येऊन लागली होती, तींत बिरोन ह्यास बसवून, ती समुद्रांत लोटून द्यावी, आणि त्या माणसास पुनः कधींही देशांत येऊं देऊं नये.

त्याप्रमाणें ती होडी सोडून दिल्यावर एकाएकीं अतिशयित तुफान सुटलें. त्यासरशी ती होडी, मोठ्या वेगानें लोटत लोटत जाऊन, बालटिक समुद्राच्या कांठीं लोथब्राक ह्याच्या वाडवडिलांची जी जहागीर होती, तिजवर लागली. लोथब्राक हा मोठ्या संपत्तिमान् कुलांतला पुरुष होता; आणि त्याला स्नेही पुष्कळ होते. शिवाय त्याला दोन मुलगे होते. ते मोठे उद्योगी आणि साहसी होते. आणि त्या वेळेस असा कांहीं चमत्कार झाला कीं, ती होडी त्यांच्या घराच्या अगदीं जवळ समुद्रकिनाऱ्यास लागली, आणि आपल्या बापाच्या होडींत बसून कोणी आंग्लोसाक्सन मनुष्य आला आहे, असें बर्तमान त्यांस समजलें. तेव्हां ते लागलेच त्याचे शोधास निघाले, आणि त्यास धरून, आपल्या बापाविषयीं चौकशी करूं लागले. त्यांस बिरोन ह्यानें, आपला अपराध लपविण्याकरितां, असें सांगितलें कीं तुमचा बाप लोथब्राक ह्यास इंग्लंदाचा राजा

एदमंद ह्यानें ठार मारिलें. तें ऐकून त्या मुलांस अतिशयित संताप आला. त्यांस समजलेली सगळी हकीकत त्यांनीं आपल्या जातीच्या लोकांस आणि आपल्या राजास कळविली, आणि त्या अघोर कृत्याचा सूड घेण्यास एकदम इंग्लंदावर हल्ला करण्याविषयीं त्यांस विनंती केली. ती त्यांनीं मान्य करून लागलींच आपलीं जाहाजें शूर शिपायांनीं भरून इंग्लंदाकडे रवाना केलीं. तीं त्या देशाच्या किनाऱ्यावर येऊन थडकलीं.

एदमंद हा राजा दयाळू आणि फार शांत स्वभावाचा होता. परोपकाराविषयीं त्याची फार आस्था असे. देशांत स्वस्थता राखून आपल्या लोकांचें कल्याण करण्याच्या कामीं त्याला जितका संतोष होत असे, तितका संतोष दुसऱ्या कोणत्याही कृत्यापासून त्याला होत नसे. लढाया आणि हल्ले हीं त्याला आवडत नसत. त्याजपाशीं लढाईची तयारी मुळींच नव्हती. अशा स्थितीमध्यें तें देन्स लोकांचें सैन्य किनाऱ्यावर आल्याचें वर्तमान त्याला समजलें. तेव्हां, पुढें काय करावें ह्याविषयीं त्याला मोठा विचार पडला. त्याची हिंमत खचली. आणि तो गुप्तपणें हेग्लिसदून ह्या नांवाच्या अगदीं अप्रसिद्ध आणि एकीकडच्या जागेंत जाऊन लपून बसला. इकडे देन्स लोकांनीं कितीएक शहरें घेतलीं, आणि एदमंद राजास शोधून काढण्याचा प्रयत्न चालविला. प्रथम त्याविषयीं कांहीं पत्ता लागेना. परंतु, कितीएक आंग्लोसाक्सन लोकांस वरीच मारहाण केल्यावर तो कोठें लपून बसला होता हें त्यांनीं त्यांस सांगितलें. देन्स लोकांचा मुख्य सरदार हिंकार ह्या नांवाचा होता. त्यानें एदमंद राजास असें सांगून पाठविलें कीं, तुह्मीं आपला सगळा खजिना आमचे स्वाधीन करून आह्मांस शरण यावें, ह्मणजे आह्मी

तुह्मांस कोणत्याही प्रकारें दुखविणार नाहीं. हें ह्मणणें त्या राजानें कबूल केलें नाहीं. तेव्हां हिंकार ह्यानें आपले कांहीं शिपाई तिकडे पाठवून त्या ठिकाणास वेढा घातला. पुढें कांहीं वेळानें त्या शिपायांनीं, आंत जाण्यास दार पाडून, एदमंदाच्या लोकांवर हल्ला केला. त्या प्रसंगीं त्याचे सगळे नौकरलोक प्राणांस मुकले; आणि, त्याच्या मुसक्या बांधून त्यास त्या शिपायांनीं आपल्या सरदारापुढें आणून उभें केलें.

हिंकार हा अविचारी होता. तो एदमंदाच्या अपराधाच्या चौकशीच्या भानगडींत पडला नाहीं. त्यानें त्यास ठार मारण्याचा ठराव केला. त्याला प्रथम एका झाडाला बांधिलें; आणि मोठाले चाबूक घेऊन त्यांनीं एखाद्या गुराप्रमाणें त्यास मारमार मारिलें. नंतर त्याच्या अंगावर बाणांची वृष्टि केली. ती इतकी कीं, आंत बाण अडकलेला नाहीं, असें एक तीळभर देखील त्याचें आंग राहिलें नाहीं. अशी त्याची विटंबना चालली होती, तेव्हां तो धार्मिक राजा एकसारखा येशू ख्रीस्ताच्या नांवाचा जप करीत होता. त्याच्या योगानें त्याच्या अंत:करणास मधून मधून विश्रांति मिळे, असें दिसे. ह्या जपामुळें देन्स लोक अधिक खवळून त्याला पहिल्यापेक्षां अधिक त्रास द्यायास लागले. तरी त्यानें तो सोडिला नाहीं. शेवटीं, असे भयंकर हाल सोसून तो राजा कांहीं वेळानें मरण पावला. तेव्हां त्याचें शिर देन्स लोकांनीं तोडिलें, आणि, तें कधीं आंग्लोसाक्सन लोकांच्या हातीं लागूं नये, अशा एका दूरच्या अरण्यांत नेऊन टाकिलें.

हा भयंकर प्रकार आटोपल्यावर देन्स लोक तेथून निघून गेले, आणि राजाचें धड तेथेंच त्यांनीं ठेविलें. हें

वर्तमान आंग्लोसाक्सन लोकांस कळतांच ते तेथें आले, आणि राजाची ती अवस्था पाहून फार दुःखी झाले. त्याची प्रेतक्रिया करण्याचा विचार त्यांनीं मनांत आणिला. परंतु, तें कृत्य त्याच्या शिरावांचून खोळंबलें. ह्मणून तें शोधायास ते लागले. त्याविषयींच्या ज्या कांहीं गोष्टी पुस्तकांतून लिहिल्या आहेत, त्या मुळींच खऱ्या वाटत नाहींत. त्यांत- ली एक गोष्ट अशी आहे कीं, ते लोक जेव्हां त्या अर- ण्यांत तें शोधण्यास हिंडत होते, तेव्हां त्या शिरानें ध्वनि करून, आपण अमक्या जागीं आहों, असें त्यांस सुच- विलें. दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं, एका लांडग्यानें तें शिर आपल्या पुढच्या पंजांत अगदीं हळू धरून, मंड- ळीच्या मागोमाग, त्यास पुरावयाच्या ठिकाणीं नेऊन ठेविलें, आणि तें आपोआप त्या धडाशीं जाऊन त्यास जडलें. ह्या दोन्ही गोष्टींत सत्य फार कमी आहे, किंबहुना नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. ह्यास्तव त्या इतिहासांत घालण्यास योग्य नाहींत हें खरें. परंतु, तेव्हांचे लोक त्या खऱ्या मा- नीत होते, ह्यावरून ते किती भोळे होते, आणि त्यांचे ठायीं अज्ञान किती होतें, हें स्पष्ट दिसून येतें.

आलफ्रेद गादीवर बसायाच्या सुमारास लोकस्थिति अ- शी होती. ते सगळे रोमन क्याथोलिक पंथाचे होते. त्या पंथावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. इतालींतील पोप, जो त्या पंथाचा मुख्य अधिकारी, तो त्यांस अत्यंत पवित्र आणि प्रतिपरमेश्वर वाटे. त्यांनीं आपल्या राष्ट्रांतील मुलांकरितां तेथें, बहुत वर्षांमागें एक मोठी शाळा घातली होती, तिचा जीर्णोद्धार एदलउल्फ ह्यानें केला, ह्याविषयींची हकीकत मागें लिहिलीच आहे. ह्या राजाच्या पूर्वींच्या एका राजानें,

घरास आठ पै, ह्याप्रमाणें घरपट्टी वसूल करून पोपास दे-ण्याची वहिवाट घातली होती. ती कितीएक वर्षेपर्यंत चालली होती. तिच्या योगानें त्यास दरसाल पुष्कळ पैसा मिळत असे. पुढें प्रातेस्तंत पंथाचा प्रसार इंग्लंदांत झाला. त्यामुळें आठव्या हेनरी राजाच्या वेळेपासून तो कर माफ होऊन ती रकम त्यास पोहोंचण्याचें बंद झालें.

आतां हा भाग संपवितों. ह्यांत ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्या साक्षात् आलफ्रेदाच्या संबंधाच्या नाहींत; तरी तो गादीवर बसला तेव्हां लोकस्थिति कशी होती, हें प्रद-र्शित करणाऱ्या आहेत. ह्मणून विषयांतर केल्याचा आरो-प आह्मांवर यावयाचा नाहीं, असें वाटतें.

---

## भाग तिसरा.

एदलउल्फ इ. स. ८५७ त मरण पावला. नंतर त्याचा मुलगा एदलबाल्द हा त्याचे गादीवर बसला. त्यानें तीन वर्षें राज्य केलें. तो इ. स. ८६० त निवर्तला, आणि त्याचे गादीवर त्याचा भाऊ एदलबर्त हा बसला. त्यानें साहा वर्षें राज्य केलें. तो नेहमीं देन्स लोकांच्या त्रा-सापासून आपल्या लोकांस सोडविण्याच्या कामांत गुंत-लेला असे. त्याचे मागें त्याचा भाऊ एदलरेद हा इ. स. ८६६ त राज्य करूं लागला. तो फार चांगला आणि शूर राजा होता. त्यास देन्स लोकांपासून पुष्कळ त्रास भोगावा लागला. त्या लोकांशीं लढण्याचे कामीं त्यास त्याचा धाकटा भाऊ आलफ्रेद हा फार साह्य करीत असे. ह्या उभयतां बंधूंनीं दोन वर्षांत नऊ लढाया केल्या.

एदलरेद ह्मास एका लढाईमध्यें कांहीं जखमा लागल्या होत्या. त्यांच्या योगानें आजारी पडून तो इ. स. ८७१ ह्या वर्षी निवर्तला. नंतर आलफ्रेद हा इंग्लंदाचा राजा झाला.

वास्तविक ह्मटलें ह्मणजे, आलफ्रेदाचे जे वडील भाऊ मरण पावले, त्यांतल्या थोरल्याच्या पहिल्या मुलाचा वारसा गादीवर होता. ही गोष्ट लोकांस आणि राजकुलांतील सगळ्या समंजस माणसांस ठाऊक होती. असें असतां, आलफ्रेद सिंहासनारूढ होऊन राज्य करूं लागला, ह्माविषयीं कोणीं चकारशब्द देखील तोंडाबाहेर काढिला नाहीं. कांकीं, ती वेळच तशी होती. ह्मणजे बहुतेक सगळा इंग्लंद देश देन्स लोकांनीं व्यापून टाकिला होता; जिकडे तिकडे दांडगाई माजली होती; लोकांस "दे माय धरणी ठाय" झालें होतें; आणि त्या प्रसंगीं राज्यसूत्र हातीं घेण्यास आलफ्रेदाइतका योग्य मनुष्य दुसरा कोणी नव्हता. कितीएक नामांकित इतिहासकार तर असें ह्मणतात कीं, ह्मा वेळीं राज्यपदारूढ होण्याची इच्छा त्याला मुळींच नव्हती; परंतु स्वदेशकल्याणाच्या बुद्धीनें त्यानें राज्याधिकार पतकरिला. ही गोष्ट खरोखर चमत्कारिक आहे.

ह्मा वेळीं आलफ्रेद सगळा बावीस वर्षांचा होता. आणि त्याचा विद्याभ्यासही बेताचाच झालेला होता. तरी त्याची बुद्धि मोठी होती; आणि तो स्वभावतःच थोर मनाचा होता; त्यामुळें प्रभुत्वही प्राप्त झाल्यावर तो मदांध झाला नाहीं. त्यानें आपल्या भावाची प्रेतक्रिया यथाविधि केली; आणि मग विंचेस्तर भजनालयांत जाऊन रीतीप्रमाणें आपणास राज्या-

भिषेक करविला. तेथें त्याच्या मस्तकीं मुकुट घातला. ह्या सगळ्या संस्कारांच्या जागा तेव्हां जशा पवित्र मानीत असत, तशा अद्यापपर्यंत मानीत आहेत, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. विंचेस्तर हें इंग्लंदांत धर्मसंबंधाचें फार महत्वाचें ठिकाण आहे. तेथल्या धर्माध्यक्षाची प्राप्ति मोठी आहे, आणि लोकांमध्यें त्याचें वजन चांगलें आहे. ह्याशिवाय, तेथील देवालय फार जुनें पाहण्यासारखें बांधिलें आहे, ह्यावरून त्याची आख्या आहे. परदेशीय प्रवासी लोक तें पाहायास गेल्यावांचून बहुतकरून राहात नाहींत.

भावाची प्रेतक्रिया, स्वतःचा राज्याभिषेक, त्या संबंधाच्या मानापानांच्या सभा, इत्यादि कामें आटोपल्यावरोबर, आलफ्रेद देशस्थितीविषयीं विचार करूं लागला. तेव्हां त्याला असें दिसून आलें कीं, ज्या देन्स लोकांनीं आपल्या सगळ्या प्रजेस अगदीं हैराण करून सोडिलें आहे, त्यांचें आधीं पारिपत्य केलें पाहिजे. ह्मणून त्यानें प्रथम सैन्याची जमवाजमव चालविली. ती करायास त्यास भारी प्रयास पडले. कांकीं, देन्स लोक साक्सन लोकांचा जेव्हां पराभव करीत, तेव्हां त्यांस ते अत्यंत क्रूरपणानें वागवीत; आणि जेव्हां एकादां साक्सन लोक देन्स लोकांचा पराजय करीत, तेव्हां साक्सन लोकांस देन्स लोकांचा भयंकर हल्ला सोसण्यास अगदीं तयार असावें लागे; कारण, त्या कामास त्यांच्या टोळ्या, एकीमागून दुसरी, अशा नेहमीं तयार असत; ह्मणजे, एकंदरींत, साक्सन लोकांतलें धैर्य आणि सामर्थ्य हीं अगदीं लयास गेल्यासारखीं झालीं होतीं.

तरी आलफ्रेदानें हिंमत सोडिली नाहीं. तो स्वतः

मोठा शूर होता, आणि लोकांत त्याचें वजन फार होतें, त्यामुळें, अवशेष राहिलेलें जें सैन्य चोहींकडे पांगलें होतें, तें आपणाबरोबर देन्स लोकांशीं लढायास जाण्यास त्यानें पुनः जमविलें. त्या सहवर्तमान तो निघाला. उभय पक्षांचें पहिलें मोठें युद्ध विल्तन येथें झालें. त्याच्या आरंभीं आलफ्रेदाच्या सैन्याची पुष्कळ सरशी झाली, आणि त्यास खचीत जय प्राप्त होतो, असें दिसलें. परंतु, थोडक्या वेळानें तें पारडें फिरलें. देन्स लोकांचा जय झाला, आणि आलफ्रेदाच्या सैन्यास समरांगणांतून पळ काढावा लागला. ह्या प्रसंगीं दोहींकडचेही पुष्कळ लोक रणांगणीं पतन पावले. त्यामुळें त्या दोन्ही पक्षांकडचे लोक परस्परांस भिऊं लागले, आणि युद्धप्रसंग टाळूं लागले. असें कांहीं वेळ चालल्यावर दोहींकडच्या सेनानायकांनीं एकमेकांशीं सल्ला करण्याचा घाट घातला. त्यांत देन्स लोकांकडचा मुख्य हब्बा ह्या नांवाचा होता. त्यानें आलेफ्रेदाशीं असा तह ठरविला कीं, 'आह्मी आपल्या लोकांसहवर्तमान तुमच्या राज्यांतून निघून जातों, पण इंग्लंदामध्यें आम्ही इतर राजांशीं ज्या लढाया करूं, त्यांत तुह्मी हात घालूं नये.' ती गोष्ट आलफ्रेदानें मान्य केली. त्याचें राज्य वेसेक्सांत होतें. त्याशिवाय एसेक्स, मर्सिआ, आणि नार्थंबलैंद हीं राज्यें वेगळीं होतीं. आलफ्रेदाशीं करार केल्याप्रमाणें हब्बा हा त्याच्या राज्यांतून आपल्या लोकांसहवर्तमान निघून गेला, तो तेम्स नदींतून नीट लंदनावर आला. तें शहर तेव्हां मर्सिआ प्रांतांत होतें. तेथें देन्स लोकांनीं दंगा आणि लूट मांडिली. त्या ठिकाणीं त्यांस आड येण्यास कोणी प्रबळ शत्रु नव्हता.

---

१ विल्तनस प्रांतांत सालिसबरीच्या ईशान्येस.

त्या वेळीं मर्सिआचा राजा बर्थ्रेद हा होता. तो, हब्बा आणि त्याच्या हाताखालचे देन्स लोक ह्यांशीं लढण्यास समर्थ नव्हता. आणि त्याला आलफ्रेदाची मदत मिळण्यासारखी नव्हती; कां कीं, तो पूर्वींच हब्बा ह्याशीं तह करून वचनास गुंतला होता. आपल्या स्वतःच्या राज्याच्या संरक्षणाकरितां, आपल्या देशांतल्या आपल्या जातीच्या इतर राजांस वेगळें सोडून, आलफ्रेदानें परकीय लोकांशीं स्नेह केला, हें चांगलें केलें नाहीं, अशी तेव्हां जिकडे तिकडे चर्चा झाली, आणि अद्यापपर्यंत सर्व विचारी पुरुष त्याला ह्या कृत्याबद्दल नांवें ठेवितात. वास्तविक आहे. आलफ्रेद हा ख्रिस्ती धर्माचा होता; आणि त्याच्या शेजारचे इतर राजे तेही ख्रिस्ती होते; त्यांस आश्रय देण्याचें एकीकडे ठेवून, केवळ आपल्या राज्याच्या संरक्षणाकरितां आलफ्रेदानें मूर्तिपूजक, क्रूर, व रानटी लोकांशीं तह ठराविला, हें ख्रिस्ती धर्मांतल्या मुख्य नीतितत्त्वाच्या विरुद्ध केलें. तेव्हां ही जी चर्चा झाली, ती यथायोग्य झाली, असें ह्मटलें पाहिजे. केवळ स्वहितासाठीं सन्मार्ग सोडणें हें कोणालाही शोभावयाचें नाहीं.

आलफ्रेदासारख्या प्रबल राजानें देन्स लोकांशीं स्नेह संपादून ज्या अर्थीं आपल्या राज्याचें रक्षण केलें आहे, त्या अर्थीं, आपणासारख्या साधारण राजास त्या मार्गानें वागण्यास कांहीं चिंता नाहीं, असें मनांत आणून बर्थ्रेद ह्यानें देन्स लोकांस पुष्कळ द्रव्य देऊन, त्यांपासून आपणास आणि आपल्या प्रजेस उपद्रव न होण्याविषयींची तजवीज केली. त्यानें त्यांस विपुल द्रव्य देऊन त्यांजपासून असा करार करून घेतला कीं, "आह्मी आतां तुझ्या राज्यांतून ल-

वकर निघून जाऊं, आणि पुनः कधीं त्यांत पाऊल ठेवणा नाहीं."

परंतु, अशा देणग्या देऊन भिक्षेकरी, चोर, चांचे, दं डेखोर, आणि लोकांवर विनाकारण भलभलते आरोप आ णून त्यांस छळणारे, ह्यांपासून आपला बचाव करून घेणें हें, त्यांस त्यांच्या कर्मांत उत्तेजन देणें आहे. ह्मणजे, अशा प्रकारें द्रव्य काढण्याची त्यांस एकदा रुचि लागली ह्मणजे ते, प्रथम केलेले करारमदार विसरून, कांहींतरी खोटें नाटें कारण काढून, पुनः स्वाऱ्या करण्यास मागें पुढें पाही त नाहींत. तेणेंकरून पहिला झालेला सर्व खर्च फुकट जातो एवढेंच केवळ नव्हे, तर, तसा खर्च वारंवार पडून, शत्रू विषयींची मनांतली धास्ती कधींच नाहींशी होत नाहीं ह्याकरितां, दुष्ट मनुष्यांशीं अशा प्रकारचा व्यवहार सहसा कधीं करूं नये. तर, होईल तितका प्रयत्न करून, त्यांस वश न होतां, त्यांस नाहींसें करावें, हा उत्तम पक्ष होय.

परंतु, बथ्रेद ह्यानें तसें केलें नाहीं; ह्या त्याच्या चुकी बद्दल त्याला चांगलें प्रायश्चित्त भोगावें लागलें. तें असें. हब्बा हा, आपल्या सैन्यासहवर्तमान त्याच्या राज्यांतून नि घून उत्तरेकडे नार्थंबर्लंदाच्या राज्यांत गेला. आणि तिकडे पुष्कळ लुटालूट आणि धामधूम केल्यावर पुनः मर्सिआ मध्यें आला. त्याचें कारण तो असें सांगूं लागला कीं, "उत्तरे कडील प्रांतांत मोठा दुष्काळ पडला आहे, आह्मांस अन्न पाणी मिळत नाहीं, ह्मणून आह्मांस माघारें यावें लागलें आहे." त्यास बथ्रेद ह्यानें पुनः आणखी पुष्कळ द्रव्य देऊन त्याची मर्जी संपादिली. तें द्रव्य हातीं येतांच हब्बा आणि त्याचे लोक हे मद्यपान आणि इतर सर्व प्रकारचे दुर्गुण ह्यांत

ें उधळावयास लागले. तें तेव्हांच नाहींसें झालें. तेव्हां पुन्हां ते बथेद ह्यास व त्याच्या राज्यांतील लोकांस त्रास देऊं लागले. मग मात्र बथेद ह्याचे सगळे उपाय हरले. त्याला तो अपमान सोसेना, आणि लोकांचे ते हाल पाहावेनात. त्याची सर्व प्रकारीं निराशा होऊन गेली. ह्मणून, तो आपल्या राज्याचा त्याग करून रोम येथें पळून गेला. तेथें साक्सन लोकांचा एक मठ होताच. त्यांतील मंडळीनें त्याचा चांगला आदरसत्कार केला, आणि, पदभ्रष्ट राजाची व्यवस्था जशी असावी, तशी त्याची व्यवस्था त्यांनीं ठेविली. परंतु, अपमानानें आणि दुःखानें त्याचें हृदय अगदीं उद्विग्न होऊन गेलें होतें. त्यामुळें तो दिवसेंदिवस पिचत जाऊन कांहीं दिवसांनीं त्या मठांत मरण पावला. आपणास जो राजा ह्मणवीत होता, त्यास मरण अशा प्रकारें आणि अशा ठिकाणीं यावें काय? परंतु होणारापुढें उपाय नाहीं.

बथेद निघून गेल्यावर देन्स लोकांनीं त्याच्या राज्याची अगदीं धूळधाणी करून टाकिली. फार काय सांगावें, मर्सिआ येथील राजांचीं प्रेतें पुरण्याची जी स्मशानभूमि होती, तिचा विध्वंस करून, पुरलेलीं प्रेतें बाहेर काढून त्यांनीं त्यांचे हाल केले. ह्मणजे, त्या राक्षसांस जीवंत माणसांशीं झगडून समाधान झालें नाहीं; ह्मणून, त्यांनीं मेलेल्या माणसांच्या प्रेतांस देखील गांजिलें! हें त्यांचें करणें, त्यांसच केवळ नव्हे, तर सर्व मनुष्यजातीस अत्यंत लांछनास्पद होय!

ह्या राज्याची अशी दुर्दशा करीत असतां, सिओलुल्फ ह्या नांवाचा कोणीएक मनुष्य त्यांस आढळला. तो बथेद ह्याच्या कारकीर्दींत मोठ्या अधिकारावर होता. तो देन्स

लोकांस असें ह्मणूं लागला कीं, "बश्रेद ह्याच्या गादीव मला बसवा, आणि त्याचें राज्य माझ्या स्वाधीन करा, ह्मणजे मी तुमच्या आज्ञेंत राहून सगळा राज्यकारभार चालवीन. हें त्याचें ह्मणणें मर्सिआमधील लोकांस अतिशयित अयोग्य वाटलें, ह्मणून त्यांनीं त्याबद्दल त्याचा फार निषेध केला. परंतु, त्या पुरुषास थोडासा अधिकार प्राप्त झाल्यावर, त्यानें त्या लोकांवर पराकाष्ठेचा जुलूम करून त्यांचा सूड उगविला.

हें चाललें होतें, इतक्यांत नवें एक अरिष्ट इंग्लंदावर आलें. तें असें. हाल्फदन ह्या नांवाचा कोणीएक सरदार पुष्कळ देन्स लोकांसहवर्तमान, जलमार्गानें येऊन इंग्लंदांत उतरला. त्यानें देशामध्यें मोठी धुमाळी मांडिली, आणि लोकांस "दे माय धरणी ठाय" करून सोडिलें. मग त्याची स्वारी आलफ्रेदाच्या राज्याकडे वळली. त्याचें आलफ्रेदास फारसें भय वाटलें नाहीं. कारण, हव्रा ह्यानें आपणाशीं जो तह केला आहे, तो देन्स लोकांच्या सर्व राष्ट्रांस लागू आहे, ह्मणून, कोणाच्याही हाताखालच्या देन्स लोकांपासून आपल्या राज्यास उपद्रव व्हावयाचा नाहीं, असा त्याचा समज होता. आलफ्रेदाच्या राज्यांत वरेहाम ह्मणून एक फार मजबूद किल्ला होता. तो दार्सेतशायर प्रांतांत होता. त्याजवर शिबंदी होती; पण, त्याजवर हल्ला होण्याचें भय नव्हतें, ह्मणून त्यावर कांहीं विशेष बंदोबस्त केला नव्हता. त्यावर मोठ्या तजविजीनें, हाल्फदन ह्यानें एकाएकीं जलमार्गानें येऊन हल्ला केला, आणि पहिल्या सपाट्यास तो घेतला. तें वर्तमान आलफ्रेद आणि त्याच्या राज्यांतील लोक ह्यांस कळलें, तेव्हां त्यांस फार भय

आणि अतिशयित आश्चर्य वाटलें. एवढेंच केवळ नव्हे, तर, देन्स लोकांनीं, आपला पूर्वीचा तह एकीकडे ठेवून, बेइमानपणानें त्या किल्ल्यावर हल्ला केल्याबद्दल त्यांस मनस्वी त्वेष आला. त्यांस हाल्फदन ह्यानें असें कळविलें कीं, "हव्राचा आणि माझा कांहीं एक संबंध नाहीं; मी स्वतंत्र सरदार आहें; मजवर कोणाची हुकमत नाहीं; माझ्या मनास येईल तें मी करीन; हव्रा ह्यानें जो तुह्मांशीं तह केला आहे, त्याप्रमाणें, पाहिजे असल्यास, तो वागेल; मी वागणार नाहीं." ठीकच आहे. हाल्फदन ह्यानें असा निरोप पाठविला, ह्यांत कांहीं नवल नाहीं. अशा प्रकारचे लोक, स्वतः आपण दिलेल्या वचनाप्रमाणें देखील जर चालत नाहींत, तर त्यांनीं, इतरांच्या वचनाप्रमाणें वागावें, हें कसें होईल ?

ह्यानंतर कांहीं दिवसांनीं आल्फ्रेद आणि हाल्फदन ह्यांच्या लढाया चालू झाल्या. कधीं ह्याचा जय होई, कधीं त्याचा जय होई. कधीं हा तह करी, कधीं तो तह करी. त्यांत, लबाडया, कपट, अविश्वासूकपणा, व संधि सांपडल्याबरोबर हानि करण्याविषयींची दक्षता, हीं उभय पक्षांकडे बहुतकरून एकसारखीं भरलीं होतीं. त्यांमुळें कशाचाच निकाल लागेना. आणि त्यापासून दोघांसही पराकाष्ठेचा त्रास होई. देन्स लोकांचें सगळें सैन्य गलबतांतून आलेलें होतें. त्यामुळें त्यांजपाशीं स्वार मुळींच नव्हते. ह्मणून, ते, आल्फ्रेदाच्या सैन्यावर हल्ला करून, मनुष्यांस पिटाळून लावीत; आणि त्यांचे घोडे आपल्या लष्कराकरितां घेत. ह्या प्रकारेंकरून त्यांनीं आपले स्वार तयार केल्यावर, एके वेळीं, एकाएकीं इंग्लंदाच्या दक्षिण भागावर स्वारी केली, आणि ते एक्सतर शहरापर्यंत येऊन ठेपले. तेव्हां त्या शहरास एक्त-

नानसिस्तर ह्मणत असत. तेव्हां सुद्धां तें, आतां आहे त्या-प्रमाणें, मोठें प्रख्यात स्थळ होतें. तें देन्स लोकांनीं मोठ्या पराक्रमानें घेतलें. ह्याचें वर्तमान आलफ्रेदास कळलें तेव्हां त्याला फारच वाईट वाटलें, आणि आतां पुढें काय करावें, ह्या चिंतेंत तो पडला. कारण, तें ठिकाण देन्स लोकांच्या हातीं लागल्यामुळें इंग्लंदाचा बहुतकरून सगळा दक्षिण किनारा त्यांच्या अमलांत गेला, असें झालें. आणखी, थोड-क्याच काळांत आंतला भागसुद्धां शत्रूच्या हातीं जाऊन, त्यांतील लोकांवर भयंकर अरिष्ट ओढवणार, अशीं दुश्चि-न्हें त्या वेळीं चोहींकडे स्पष्ट दिसूं लागलीं. (इ०स०८७१)

त्या वेळच्या ज्या गोष्टी आणि जे लेख उपलब्ध आहे-त, त्यांवरून असें उघड दिसून येतें कीं, त्या आणीबाणी-च्या प्रसंगीं आलफ्रेदावर त्याच्या प्रजेची भक्ति असावी त-शी नव्हती. लोकांस त्याचें आचरण अगदीं अप्रशस्त वा-टत असे. त्याविषयीं ते उघड बोलत नसत; पण आंतल्या-आंत कुजबुजत असत; आणि, त्याच्या दुराचरणानें परमे-श्वराचा क्षोभ होऊन त्यामुळें हीं संकटें राष्ट्रावर आलीं आहेत, असें ते समजत. तो अगदीं तरुण असून स्वभावा-नें कडक होता; अल्प वयांत सिंहासन प्राप्त झाल्यामुळें त्याला गर्व पुष्कळ झाला होता; आणि हव्बा ह्यानें त्याशीं जो तह ठरविला होता, त्या तहावरून जो शांतपणाचा काल सांपडला, त्या कालांत त्यानें यथेच्छ मौजा मारिल्या; आणखी त्या मौजा अगदीं निरुपद्रवी होत्या, असेंही नव्हतें; आणि तो, आपल्या सुखाकरितां लोकांवर जुलूम करितो, आणि स्वतःच्या हिताची कांहीं गोष्ट करावयाची असली

ह्मणजे न्यायान्यायाकडे पाहात नाहीं, असाही आरोप लोक त्याजवर करीत असत.

ह्या गोष्टी घडल्यास आज शेंकडों वर्षें होऊन गेलीं. त्यामुळें, ह्यांत खरें किती आणि खोटें किती, ह्याचा निर्णय करण्यास फारसा मार्ग राहिला नाहीं. डेन्स लोकांच्या स्वाऱ्यांनीं लोक त्रासून गेले होते; त्यामुळें त्यांच्या मनांत आल्फ्रेदाविषयीं अशा नानाप्रकारच्या कल्पना त्या वेळीं आल्या असाव्या, असाही कितीएक ग्रंथकारांचा अजमास आहे. एका पक्षीं पाहिलें असतां असें दिसतें कीं, तो आपल्या वयाच्या भरज्वानींत होता, आणि त्याच्या हातीं सर्व राज्यसूत्र आलें होतें, अशा प्रसंगीं, इतर तरूण राजांप्रमाणें, विषयादिकांच्या नादीं भरून बेतालपणानें वागला असेल, ह्यांत कांहीं नवल नाहीं. आणखी दुसऱ्या पक्षीं पाहिलें तर, एकाद्यास अपयश येत गेलें ह्मणजे त्यास वाईट ह्मणावें, असा साधारणपणें पुष्कळ माणसांचा कल असतो, आणि तो रानटी लोकांमध्यें अधिक असतो; ह्या न्यायानें आल्फ्रेदाविषयीं लोकांचें मत असें झालें असावें, असें वाटतें.

आल्फ्रेदाच्या दरबारीं संतनियल ह्या नांवाचा एक साधु होता. तो आल्फ्रेदाचा दूरचा आप्त असून, त्यास प्रसंगीं विचारमसलत देत असे. तो ह्या वेळेच्या सुमारास राजास इतका निक्षून बोलला ह्मणून सांगतात कीं, त्याच्या हातून जर अतिशयित वाईट आचरण घडलें नसतें, तर तें बोलणें अगदीं शोभलें नसतें, आणि त्यानें सोशिलेंही नसतें. त्या बोलण्याचें तात्पर्य एके ठिकाणीं दिलें आहे. तें असें—"तूं आपल्या वैभवाचा आणि पदवीचा फार गर्व वाहातोस; आणि कोणीं कांहीं ह्मटलें तरी आपल्या पाप-

मार्गांत अचलपणें वागण्याचा निश्चय प्रदर्शित करितोस, हें फार वाईट आहे. ह्या पापाचरणाचें प्रतिफल सिद्ध झालें आहे; तें तुला लवकरच खचीत खचीत भोगावें लागेल. तें कांहीं केल्यानें टळावयाचें नाहीं. ह्मणून मी तुला अगत्य-पूर्वक असें सांगतों कीं, तूं आपल्या प्रजेशीं जुलुमानें आणि अन्यायानें न वागतां, ह्यापुढें तरी, दयाळूपणानें आणि न्यायानें वाग; ह्मणजे कदाचित् तुजवरचा परमेश्वराचा क्षोभ कमी होईल, आणि अरिष्ट टळेल. चांगला विचार कर."

असे कठोर शब्द जर आलफ्रेदानें खरोखर सोशिले असले, तर त्याचे हातून मोठमोठीं पापें खचीत घडलीं असावीं, असें दिसतें. त्याच्या ह्या वागणुकीबद्दल पुढें त्याला फार मोठें प्रायश्चित्त भोगावें लागलें, आणि तें भोगितेवेळीं त्यानें सर्व दुष्कर्में टाकून, आपल्या लोकांचें हित करण्याच्या कामीं इतके परिश्रम केले कीं, त्यांवरून लोक, त्याचे पूर्वीचे सगळे दोष आणि अपराध विसरून, त्याची स्तुति करूं लागले, आणि त्याजवर प्रीति करूं लागले. ह्याविषयींचें साद्यंत वर्णन पुढें यावयाचें आहे. इतिहासाच्या अवलोकनावरून आणि मनुष्याच्या स्वभावाच्या राहाटीवरून असें दिसतें कीं, मनुष्य कितीही शुद्ध अंतःकरणाचा असला, तरी, त्यास, जन्मांत केव्हां ना केव्हां, कोणत्यातरी कारणावरून, अमार्गानें जाण्याविषयीं आणि पाप करण्याविषयीं मोह पडल्यावांचून राहात नाहीं, असा नियमच आहे. आतां, प्रत्येक नियमास अपवाद आहेत, तसे ह्याही नियमास कांहीं असतील; नाहीं असें ह्मणतां येत नाहीं. परंतु, जगाच्या उत्पत्तीपासून आजपावेतों जितकीं माणसें ह्या पृथ्वीवर होऊन गेलीं, त्यांत, अगदीं पूर्णपणें निष्पाप

असें एक देखील मनुष्य झाल्याचें कोठें आढळत नाहीं.

हाल्फदन ह्यानें वेरहाम आणि एक्सत्र्र हीं घेतलीं, तेव्हां आल्फ्रेदास सिंहासनारूढ होऊन बरेच दिवस झाले होते. आणि त्या मुदतींतच वर सांगितलेल्या चुक्या त्याच्या हातून घडल्या. परंतु, देन्स लोक एकामागून एक आपलीं ठाणीं घेत चालले आहेत, असें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां त्याचे डोळे उघडले, आणि त्याला पुढचीं संकटें दिसूं लागलीं. त्याला त्याच्या राज्याविषयीं आणि लोकांविषयीं भय सुटलें, एवढेंच केवळ नव्हे; तर, स्वतः आपली गति पुढें वरी व्हावयाची नाहीं, असें त्याच्या मनांत आलें. कारण, इंग्लंदांतला एक साक्सन राजा, देन्स लोकांच्या त्रासानें, स्वराज्यत्याग करून रोम शहरीं गेला, आणि येथें लाजिरवाण्या रीतीनें मरण पावला, हें वर्तमान नुकतेंच त्याला कळलें होतें, आणि तें त्याच्या मनांत अहोरात्र घोळत होतें. ह्मणून, तो तेव्हां, सर्व व्यसनांचा त्याग करून, बंदोबस्ताच्या कामास लागून, हरएक प्रकारें आपल्या प्रजेची प्रीति संपादण्याचा उद्योग मोठ्या आवेशानें करूं लागला.

ह्या कामास आरंभ करण्याच्या पूर्वी त्यानें आपल्या दरबारांतील आणि राज्यांतील सरदार व मानकरी ह्यांची एक मोठी सभा भरविली. आणि तींत त्यानें त्यांस लक्षून फार चित्तवेधक भाषण केलें. त्यांत, पुढें येणाऱ्या संकटांचीं सर्व चिन्हें प्रदर्शित करून, तीं टाळण्याच्या उद्योगांत त्यांनीं आपणास मनापासून मोठ्या आवेशानें साह्य करावें, अशी त्यांस विनंती केली होती. तो ह्मणाला, "सरदारहो, शत्रु फार भयंकर आहे, त्याशीं सामना करण्यास तुह्मांला आपलीं सर्व सुखें एकीकडे ठेविलीं पाहिजेत, आणि मला द्रव्यद्वारा

साह्य केलें पाहिजे. एरव्हीं शत्रु आटोपणार नाहीं. तुह्मीं सर्वांनीं आतां सशस्त्र होऊन युद्धास जाण्यास सिद्ध व्हावें. तुह्मी मनापासून मला साह्य कराल तर शत्रु ह्मणजे त्रिशात काय?" हें भाषण त्यांचे मनांत भरलें. त्याच्या योगानें त्यांचे ठायीं वीरश्री उत्पन्न झाली; आणि त्यांनीं एकचित्तानें त्यास साह्य करण्याचा निश्चय केला. तेव्हां त्या राष्ट्राचें रक्षण होण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं.

देन्स लोकांपाशीं आरमार पुष्कळ होतें; आणि आलफ्रेदाकडे मुळींच नव्हतें. त्यामुळें त्यास त्यांशीं सामना करितां येईना. ह्मणून त्यानें आरमार उभारण्याचा निश्चय केला. त्याच्या उद्योगास तो लागला; तेव्हां त्याला असें दिसून आलें कीं, आरमार तयार करण्याच्या कामांत, गलबतें बांधणें हें सोपें आहे, पण चांगले खलाशी मिळविणें हें फार कठीण आहे. खलाशांचें काम आपल्या लोकांस शिकवावें कसें, ही त्याला मोठी पंचाईत पडली. ह्मणून त्यानें प्रथमतः, जे रानटी लोक समुद्रकिनाऱ्यावर मासे मारण्याचें आणि चांचेपणाचें काम करीत असत, त्यांस मोठ्या पगाराची लालूच दाखवून आपले चाकरीस ठेविलें. त्यांत कितीएक परदेशचेही लोक होते. त्या सर्वांस त्यानें असें आणखी सांगितलें कीं, शत्रूशीं लढत असतां जी लूट तुमच्या हातीं लागेल, ती सर्व तुह्मी बक्षीस घ्यावी. ह्या आज्ञेवरून तर त्या खलाशी लोकांस फार आनंद झाला. कारण कीं, पगारापेक्षां लुटीच्या योगानें आपणांस अधिक द्रव्य मिळेल, अशी त्यांची खातरी होती. आरमार तयार झाल्यावर, तें समुद्रावर चालू केलें, त्या दिवशीं तें पाहण्यास सहस्रावधि लोक जमले. आणि तो नवीन प्रकार पाहून

त्यांस मोठें आश्चर्य वाटलें. ह्या आपल्या देशाच्या आरमारास, देन्सलोकांशीं लढतांना यश येवो, असें मनांत ह्मणून ते आनंद करीत आपापल्या घरीं गेले.

हीं गलबतें बरोबर घेऊन आलफ्रेदानें जी पहिली स्वारी केली, तींत त्याला पूर्ण यश आलें. त्यानें देन्स आरमाराशीं ही पहिली लढाई इंग्लिश खाडीमध्यें मारिली; आणि तींत त्याचा अगदीं पराभव करून टाकिला. ह्या प्रसंगीं देन्स लोकांचें एक मोठें जाहाज आलफ्रेदाच्या हातीं लागलें. त्यांत खलाशी आणि शिपाई पुष्कळ होते. त्या सर्वांस, आलफ्रेदानें समुद्रांत टाकून देऊन ठार मारिलें. ह्या गोष्टीविषयीं त्या काळीं कोणास कांहीं विशेष वाटलें नाहीं. कारण, शत्रूकडच्या लोकांस तशा प्रकारें वागविण्याची रीति तेव्हां सर्वत्र तशीच होती. परंतु, सांप्रतकाळीं तो प्रकार अत्यंत निर्दयपणाचा आणि पापमूलक समजतात. आणि तसा जर कोणा एखाद्या राजाच्या हातून घडला, तर त्याचा फार निषेध करितात.

हा एक जय आलफ्रेदास मिळाला खरा. पण, तेवढ्यानें देन्स लोकांशीं लढणें आटोपलें असें नाहीं; कारण, देशामध्यें त्यांच्या अनेक टोळ्या जागोजाग येऊन राहिल्या होत्या; आणि कितीएक प्रांत त्यांच्या ताब्यांत कितीएक वर्षेंपर्यंत होते; त्यामुळें त्यांचा समूळ नाश करणें हें आलफ्रेदास दुष्कर होतें. वारंवार लढाया होत, तह ठरत, लोक ओलीस देत घेत, त्यांच्या कत्तली होत, पुनः लढाया चालू होत,असे प्रकार चालले. त्यांत कांहींएक नेम नव्हता. त्यामुळें उभयपक्षांचें अतिशयित नुकसान होत असे.

हे लढायांचे आणि तहांचे प्रकार चालले असतां, आ-

ल्फ्रेदाच्या मनांत असें आलें कीं, देन्स लोक, आपल्या वच नाप्रमाणें वागत नाहींत; त्यांस त्याच्यांतल्या एखाद्या मोठ्य शपथेनें बांधून घेतलें पाहिजे, ह्मणजे ते आपल्या वचना प्रमाणें वागतील. ह्मणून शोध करितां करितां त्याला असें कळलें कीं, एक प्रकारचें बाहुभूषण त्यांच्यामध्यें आहे, त्याची शपथ त्यांस जितकी मोठी वाटते, तितकी दुसरी क शाचीही वाटत नाहीं. ह्मणून, त्यांजकडून त्यानें त्या भूष णाच्या आणा वाहून घेतल्या. आणखी शिवाय, ख्रिस्ती साधूंच्या ज्या कितीएक वस्तु, इंग्लंदांत फार जतन करून फार प्राचीनकाळापासून ठेविल्या होत्या, त्यांच्या शपथा त्यानें त्यांजकडून वाहविल्या. त्या वस्तूंवर देन्स लोकांची निष्ठा मुळींच नव्हती, व त्यांच्या शपथा वाहणें हें त्यांस कांहींच वाटलें नाहीं. तरी, आल्फ्रेदाच्या मनांत असें आलें कीं, ह्या लोकांनीं, त्या पवित्र मानिलेल्या वस्तूंची शपथ मोडिली, ह्मणजे त्यांजवर परमेश्वराचा क्षोभ होईल; तेणें करून त्यांजवर संकटें येतील; त्यांचा नाश होईल; आणि अशा प्रकारें आपणास सहज यशप्राप्ति होईल. मनुष्यास कधीं कधीं त्याच्या अज्ञानानें देखील समाधान होतें, असें ह्मणतात. त्याचें हें एक लहानसें उदाहरण आहे.

आल्फ्रेदाच्या राज्यामध्यें ज्या देन्स लोकांनीं फार दिवसांपासून धुमाळी मांडिली होती, त्यांतील एका मोठ्या टोळीचा नाईक रोलो ह्या नांवाचा मनुष्य होता. तो पुढें इंग्लंदांतून निघून फ्रान्सांत गेला. त्याचें कारण फार चमत्कारिक सांगितलें आहे. तें असें. एके प्रसंगीं आल्फ्रेदानें त्याचा पराभव केल्यानंतर, तो अगदीं निराश होऊन आपल्या लष्करांत आला, आणि विचार करीत बिछान्यावर स्वस्थ

पडला. कांहीं वेळानें त्याला झोंप लागली. आणि त्यानें स्वप्नांत मधमाशांचा एक थवा दक्षिणेकडे उडून जातांना पाहिला. त्यावरून त्याला असें वाटलें कीं, अपण दक्षिणेकडे निघून जावें, असें देवाच्या मनांत आहे. त्याप्रमाणें लागलाच तो निघून गेला. तेथें, ह्मणजे फ्रान्सांत तो चांगला उदयास आला, आणि त्यानें आपलें आयुष्य सुखोपभोगांत घालविलें.

अशा प्रकारें करून कांहीं देन्सलोक इंग्लंदांतून गेले खरेः परंतु, त्यांचें पाऊल त्या देशांत पुढें पुढें पडत चाललें. आलफ्रेदाच्या सैन्यांतला उत्साह कमी झाला. त्याचे सरदार लढाईस कंटाळून त्याला सोडून चालले. देन्स लोकांनीं त्याचे किल्ले आणि शहरें घेतलीं. आणि, त्यास राज्याभिषेक झाल्यापासून आठ वर्षांच्या आंत, त्यास अतिशयित वाईट अवस्था प्राप्त होऊन, त्याचीं बहुतेक मनुष्यें त्याला सोडून गेलीं. ह्यानंतर, आलफ्रेदास कितीएक दिवसपर्यंत अज्ञातवास करावा लागला. त्याचें कथन पुढच्या भागीं करूं.

---

## भाग चवथा.

जवळचीं सर्व माणसें जाऊन आलफ्रेदाची अगदीं निराशा झाली होती, हें खरें. तरी त्यानें एकाएकीं धैर्य सोडिलें नाहीं. तो, आपणाकडून होतील तितके प्रयत्न करून, आपलें पद राखण्यास झटत होता. अशा शेवटच्या प्रसंगीं, निराशेपासून उत्पन्न झालेलें जें धीटपण मनुष्यास प्राप्त होतें, तें कधीं कधीं, त्यास धैर्यापेक्षांहीं अधिक उपयोगीं पडतें, आणि त्याच्या योगानें प्रसंगीं फार मोठीं कार्यें घडतात. तसा प्रकार कदाचित् आलफ्रेदाचाही झाला

असाला. परंतु, ह्या वेळाच्या सुमारास त्याजवर एक मोठें नवें विघ्न आलें, त्यामुळें त्याचे उपाय हरले. त्याचा प्रकार असा.

देन्स लोकांची एक नवी झुंड इंग्लंदामध्यें एकाएकीं मोठ्या वेगानें आणि आवेशानें आली. ते लोक मागें आलेल्या सर्व लोकांपेक्षां अतिशयित क्रूर, अतिशयित लोभी, आणि अतिशयित उपद्रवकारक असे होते. त्यांस असें आढळून आलें कीं, आलफ्रेदाच्या राज्याखेरीज बाकीचीं सगळीं राज्यें अगदीं धुळीस मिळालीं आहेत. ह्मणून त्यांची स्वारी आलफ्रेदाच्या राज्यावर आली. त्यांची विलक्षण तयारी पाहून, त्यांस आड येण्याचा विचार आलफ्रेदानें सोडून दिला. त्याचे लोक दशदिशा पळून गेले. त्यांतले कितीएक देशाबाहेर गेले, आणि कितीएक, जंगलांत दडून राहिले. तेव्हां आलफ्रेदालाही आपल्या जीवाच्या बचावाकरितां रान धरावें लागलें. त्याबरोबर त्याचे कांहीं सेवक, सेवाधर्मास जागून ह्मणा अथवा स्वनिर्वाहास दुसरें कांहीं साधन नव्हतें ह्मणून ह्मणा, त्या अरण्यांत गेले. परंतु, त्याबरोबर राहून पोटालासुद्धां बरोबर मिळत नाहीं असें जेव्हां त्यांस झालें, तेव्हां, आज एक गेला, उद्यां दोन गेले, परवां चार गेले, अशा प्रकारें ते बहुतेक सर्व त्यास सोडून गेले.

जवळ द्रव्य असलें ह्मणजे मनुष्यास सेवक भूषणास्पद वाटतात, आणि त्यांपासून त्याला सुख होतें; पण तें जवळ नसलें, ह्मणजे ते त्याला ओझ्यासारखे होतात, आणि त्यांपासून त्याला दुःख होतें. ह्या अर्थानें पाहिलें ह्मणजे, जवळचे सर्व लोक निघून गेल्यानें, आलफ्रेदास वाईट वाटलें नसेल एवढेंच केवळ नव्हे; तर त्याला उलटें बरें वाटलें असेल. शेवटीं शेवटीं त्याजवळ अगदीं थोडे लोक राहिले,

त्या वेळीं त्याला असें वाटे कीं, लढाईच्या कामास हे फार थोडे आहेत, आणि लपून बसायास हे फार आहेत, ह्यास्तव हे कोणत्या तरी पर्यायानें दूर होतील, तर बरें; आणि तसें आपोआप घडून आलें; तेव्हां त्याला एकटें राहायास बरें पडलें असेल, ह्यांत कांहीं संशय नाहीं. आलफ्रेदाचें लग्न झालें होतें. पण, ह्या वेळीं त्याची बायको त्याबरोबर नव्हती. ती अशाच दुसऱ्या एका जागीं लपून राहिली होती, ती त्याला मग येऊन मिळाली. आलफ्रेदाला शोधून काढण्याविषयीं जसे देन्स लोकांचे प्रयत्न चालले होते, तसे तिलाही धरण्याविषयीं चालले होते. परंतु, त्यांत आलफ्रेदाकडे त्यांचें लक्ष फार होतें; कारण, तो हातीं लागला ह्मणजे तिच्या एकटीच्यानें कांहीं व्हावयाचें नाहीं, हें त्यांस ठाऊक होतें.

आलफ्रेदानें पश्चिमेकडची वाट धरिली. त्यास खडकाळ जमिनींतून, रानांतून, खोऱ्यांतून, आणि डोंगरांतून, शत्रूच्या भयानें फार दूर जावें लागलें. पोटांत अन्न नसे, आणि सर्व दिवसभर चालण्याचा थकवा येई, ह्या दोन गोष्टींनीं त्याला पराकाष्ठेचे क्लेश होत. ते तो निमूटपणें सोशी. इतकें झालें तरी, त्याजबरोबर त्याचे दोन विश्वासू नोकर होते. ते आपल्या धन्यास साह्य करण्यास झटत. परंतु, त्या अवस्थेंत त्यांचा कांहीं उपाय चालेना. तेणेंकरून त्यांस वाईट वाटून तेही त्याला सोडून गेले. तेव्हां, तो बिचारा आलफ्रेद, दीन होऊन, एकटा हिंडत हिंडत आपल्या राज्याच्या पश्चिमे-च्या ..हद्दीवर येऊन पोहोंचला. तेव्हां, आपणास

फ७

कोणीं ओ[illegible] नये ह्मणून त्यानें आपला वेष बदलला होता. त्या ..[illegible]वर आथेल्नें ह्मणून एक ठिकाण होतें, तेथें आलफ्रेद प्रा[illegible]ला. तें ठिकाण फार वाईट हवेचें होतें.

त्याच्या भोंवतीं मोठें रान असून, चारी बाजूंस चिखलाच्या दलदली होत्या. त्या ठिकाणीं राहाण्यास कोणत्याही प्रकारची सोय नव्हती. तरी, त्यांतल्या त्यांत सोय काढून, एक धनगर एक झोंपडें बांधून त्यांत सकुटुंब राहात होता. तो आपल्या घराभोंवतीं थोडीशी जमीन खणून तिजवर कांहीं धान्य पेरी, आणि त्याच्या पिकावर आपला निर्वाह करी. त्यांतच त्याच्या गाई आणि मेंढ्या चरत. त्याच्या भोंवतालचें रान इतकें किर्र होतें कीं, त्यांतून वाट काढून त्या धनगराच्या घरीं येणें हें अगदीं जंगली माणसासही अवघड होतें. तरी, त्यांतूनही आल्फ्रेद हा, मोठ्या संकटानें आणि कष्टानें वाट काढीत त्या झोंपडीकडे चालला. त्या अडचणींतून पार पडण्यास त्याला *अतिशयित* प्रयास पडले खरे. *तरी त्या मार्गाचें* दुर्गमपण पाहून मधून मधून त्याला बरें वाटत असे. कां कीं, अशा भयंकर प्रदेशांतून आपला पाठलाग करण्यास देन्स लोकांच्यानें कधींही येववणार नाहीं, असें त्याच्या मनांत येई.

ह्याप्रमाणें जेमतेम करून आल्फ्रेद त्या धनगराच्या झोंपडींत गेला; आणि त्यानें त्यास आपलें दैन्य दाखवून त्यापाशीं थारा मागितला. असे जंगलांत राहणारे लोक बहुतकरून दयाळू असतात, आणि त्यांचे ठायीं परोपकारबुद्धि बरीच असते. तसा तो धनगर होता. त्यानें त्याला आपले झोंपडींत उतरायास जागा दिली, आणि, तो फार भुकावला होता, ह्मणून त्याला आधीं थोडें खायाला दिलें. थोडा वेळ राहिल्यावर, आल्फ्रेदानें, त्या धनगराचें बरें वाटलें करायास लागून आणि त्याच्या मर्जीप्रमाणें लोक राहिले,

प्रीति संपादिली. मग त्या धनगरानें त्याला आपले चाकरीस ठेविलें.

पुढें कांहीं दिवसांनीं, त्या धनगरानें त्यास, तूं कोण काय ह्मणून विचारिलें. त्यावरून त्यानें त्याला असें सांगितलें कीं, "देन्स लोकांनीं आलफ्रेद राजाच्या सैन्याची दाणादाण करून टाकिली आहे; त्याचे सगळे सरदार दशदिशा पळाले आहेत; आणि त्यांबरोबर, मी, मला वाट सांपडली तिकडे आलों आहें. मी एक लहानसा सरदार आहें; आणि मला ही अशी दशा प्राप्त झाली आहे. ह्यास्तव, मी कोण आहें हें कोणासही कळूं न देतां, मला आपले चाकरीस असाच ठेवा, एवढें माझें मागणें आहे. परमेश्वराच्या कृपेनें केव्हांना केव्हां तरी माझा पुनः उदयकाल येईल. तेव्हां मी आपले उपकार फेडण्याचा प्रयत्न करीन."

त्या धनगराच्या घरीं चाकरीस राहिल्यावर त्याला तेथें नानाप्रकारचीं कामें करावीं लागलीं. तो कोणी मोठ्या योग्यतेचा पुरुष आहे, असें त्या धनगराला कळलें होतें; ह्मणून तो कामाकाजांत त्याचा मान ठेवीत असे. परंतु, ती गोष्ट त्याच्या बायकोला माहीत नव्हती, आणि ती स्वभावतः मोठी कडक होती; त्यामुळें ती त्याला एकाद्या हलक्या चाकराप्रमाणें वागवीत असे. तो तेथें नानाप्रकारचीं कामें करीत असे. आणि आपलीं कामें आपल्या धन्याच्या इच्छेप्रमाणें व्हावीं, अशी त्याची फार इच्छा असे॰''.त, त्याचें मन नेहमीं स्वतःच्या स्थितीच्या आणि कोणीं ओदाप्त करून घेण्याच्या विचारांत गुंतलेलें असे. त्या सुरंध्याचे हातून वारंवार चुक्या होत; आणि त्यां- आल्फ्रेद प्राक्तलकिणीचीं बोलणीं सोसावीं लागत. मनांत

विचार एका प्रकारचे, आणि हातांनीं कामें करावयाचीं दुसऱ्या प्रकारचीं, अशी स्थिति मनुष्यास प्राप्त झाली, ह्मणजे त्याचे हातून कामांत चुक्या व्हावयाच्याच.

अशा प्रकारची एक चूक आलफ्रेदाच्या हातून झाली, आणि तीबद्दल त्याला त्या धनगराच्या बायकोचें कठोर भाषण सोसावें लागलें. त्याचा प्रकार असा.– एके दिवशीं सायंकाळीं ती बाई स्वैपाक करीत असतां, मध्यंतरी कांहीं कामानिमित्त उठून दुसरीकडे गेली, आणि चुलीवर पोळ्या भाजत टाकल्या होत्या, त्या पाहण्यास तिनें आलफ्रेदाला सांगितलें. तें काम पतकरून तो चुलीजवळ बसला. परंतु, त्या वेळीं त्याचे मनांत नानाप्रकारचे विचार घोळत असल्यामुळें, त्या पोळ्या उलथण्याचें भान त्याला राहिलें नाहीं; आणि ती बाई परत येऊन पाहूं लागली तों त्या करपून जात होत्या अशा तिच्या दृष्टीस पडल्या. तेव्हां तिला अतिशयित राग येऊन, ती त्याला मोठ्यांनीं ओरडून ह्मणाली, "अरे वात्रा, तुला खायाला मात्र इतक्या चांगल्या पोळ्या पाहिजेत, पण त्या भाजायाचें काम तुला करितां येत नाहीं. ऊठ तेथून." हें बोलणें, आलफ्रेदानें खालीं मान घालून गुपचूप सोशिलें. वास्तविक ह्मटलें तर राजा तो, त्याला असें बोलणें सोसून घेण्याचा प्रसंग प्राप्त व्हावा काय? परंतु करतो काय? त्याला काळ विपरीत आला होता. त्या पुढें त्याचा उपाय चालेना; [illegible] नुष्यास काळाप्रमाणें व्हावें लागतें.

त्या धनगराच्या येथें आलफ्रेदास नाना[illegible]चीं कामें करावीं लागत. त्यांत, तिरकमटा नीट [illegible] शिकारीस जाण्याचीं शस्त्रें तयार ठेवणें, इत्यादि कांहिंमें मर्दगिरी-

चीं असत, तीं त्याला फार आवडत. आपले सरदार लोक वेष पालटून देशांत भटकत असतील त्यांस एकत्र कसें करावें, त्यांची खरी स्थिति आपणास आणि आपली खरी स्थिति त्यांस कशी कळावी, शत्रूचें किती किती सैन्य कोठें कोठें आहे, तें कसें समजावें, कोणत्या प्रकारचा उद्योग केला असतां आपला विपत्काल जाऊन आपला उदय होईल, इत्यादि नानाप्रकारच्या विचारांनीं त्याचें मन नेहमीं भरलेलें असे. तें इतकें कीं, त्यांच्या योगानें तो कधीं कधीं भूकतान्ह देखील विसरे. त्याला एवढी विपत्ति प्राप्त झाली होती, तरी, केव्हांना केव्हां तरी पुनः आपला उदयकाल येणार आहे, असें त्यास वारंवार वाटत असे, आणि त्याच्या योगानें त्या अडचणी सोसण्यास धैर्य आणि शत्रूच्या नाशाचा उद्योग करण्यास उमेद हीं येत असत. जे खरे थोर असतात, ते कसाही कठीण प्रसंग आला, तरी धैर्य सोडीत नाहींत, आणि संकट निवारणाचा उद्योग सतत चालवितात. ह्यांतलें बीज एवढेंच आहे कीं, ते कधीं असत्पक्षास हात घालीत नाहींत, आणि सत्पक्षास परमेश्वर साह्य असतो, हें त्यांस पूर्णपणें ठाऊक असतें.

हा अज्ञानवास आल्फ्रेदास अत्यंत दुःखप्रद झाला खरा. परंतु, त्याच्या योगानें, त्याच्या आंगचे कितीएक दुर्गुण नाहींतसे होऊन सद्गुण आले. त्याच्या ह्या स्थितीचें वर्णन करीत असतां एका चांगल्या ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं, " जो पूर्वीं गर्विष्ठ हट्टी आणि दुराग्रही होता, तो नम्र, गरीब, आणि कोणत्याही कामांत भलताच आग्रह न धरणारा असा झाला. " ह्याविषयीं दुसरा एक चांगला ग्रंथकार ह्मणतो, " संपत्तीच्या योगानें जे दुर्गुण मनुष्याच्या

ठायीं उत्पन्न होतात, ते सगळे विपत्तिरूप अग्नींत जळून जातात." हें खरें आहे. ह्याचीं उदाहरणें इतिहासांत आणि लोकव्यवहारांत पावलोपावलीं दृष्टीस पडतात.

आलफ्रेद इतक्या विपत्तींत असून, तींतील दुःखें इतक्या शांतपणानें सोशीत होता, तरी, त्याचें चित्त नेहमीं, आपलें पांगलेलें सैन्य पुनः कसें जमवावें, तें शत्रूवर कसें न्यावें, आणि त्याचा नाश कोणत्या उपायांनीं करावा, ह्याविषयींच्या विचारांत अगदीं मग्न असे. त्याचे जुने मित्र त्याच्या प्रमाणेंच रानोमाळ हिंडत होते. त्यांतले कांहीं भटकत भटकत, आलफ्रेद होता, त्या ठिकाणाजवळ आले. ते आसपास आल्याचें वर्तमान त्यास कळलें, तेव्हां त्यांस भेटण्याविषयीं त्याला अतिशयित इच्छा झाली. तो मोठ्या युक्तीनें गुप्तपणानें त्यांस भेटला. त्यानें त्यांशीं आपल्या सगळ्या मसलतींविषयीं आणि बेतांविषयीं वादविवाद केला. त्यांस त्याचे विचार पसंत पडले. त्या ठिकाणाच्या आसपास देन्स लोक नव्हते, त्यामुळें त्यांस एकमेकांस भेटण्यास आणि मसलती करण्यास चांगलें फावलें. त्याचे अनुयायी येथें अधिकाधिक जमत चालले. त्यांनी आपल्या शस्त्रास्त्रांची तयारी मोठ्या झपाट्यानें चालविली, आणि देन्स लोकांस कोठें कसें गांठावयाचें, ह्याविषयीं बेत ठरविले. आलफ्रेदानें आपलें दीनत्वाचें स्वरूप टाकून देऊन सत्यस्वरूप प्रकट केलें. तो ह्याप्रमाणें प्रकट झाल्याचें वर्तमान, जे साक्सन लोक इतर भागांत पसरून ह्याचा शोध करीत होते, त्यांस कळलें. तेव्हां ते मोठ्या त्वरेनें त्यास येऊन मिळाले. हें कृत्य प्रथम कांहीं दिवस गुप्तपणें चाललें होतें; पण, मग तें ते उघडपणें आणि निर्भयपणें करूं लागले. आलफ्रेदाचें

कुटुंब त्यापासून दूर गेल्याला पुष्कळ दिवस झाले होते, तेंही येऊन त्याजपाशीं राहिलें. ह्या सगळ्या गोष्टी त्या धनगराला ठाऊक होत्या. पण त्यानें त्या फोडिल्या नाहींत. एवढेंच केवळ नव्हे; तर आलफ्रेदाचे आणि त्याच्या सोबत्यांचे जे बेत चालले होते, त्यांत तो मन घालून त्यांस चांगल्या मसलती सांगण्यास आणि इतर प्रकारीं त्यांचें साह्य करण्यास पुष्कळ उपयोगीं पडला. त्यांवर त्याचे उपकार फार झाले. ते आलफ्रेद विसरला नाहीं. राजपद प्राप्त झाल्यावर त्यानें त्यास मोठ्या योग्यतेस चढविलें. उपकार करणें आणि उपकार फेडणें ह्या दोन गोष्टी अगदीं वेगळ्या आहेत. ह्यांतली पहिली गोष्ट सधन पुरुष, कीर्तीच्या आशेनें करितात; ह्यांत कांहीं विशेष नाहीं. गरीबीमध्यें आपणावर ज्यांनीं उपकार केले असतात, त्यांचें स्मरण धरून त्यांचें उतराई होणें, हें आपलें अत्यंत अगत्याचें कर्तव्य आहे, असें मानणारे आणि त्याप्रमाणें वागणारे धनवान् पुरुष फार थोडे असतात. अशा थोड्यांत आलफ्रेदाची गणना केली पाहिजे.

ह्या प्रसंगीं ह्या स्थळीं आलफ्रेदास निर्वाहाची मोठी पंचाईत पडूं लागली. कारण, त्यास आपल्या कुटुंबाच्या माणसांची तर्तूद ठेवून, शिवाय, त्याच्याभोंवतीं जे कितीएक सरदार आणि शिपायी जमले होते, त्यांच्या खाण्यापिण्याची आणि वस्त्रप्रावर्णाची तजवीज त्यालाच ठेवावी लागे. त्या धनगराच्या शेतांत जें कांहीं उत्पन्न झालें होतें, तें सगळें तेव्हांच सरून गेलें; आणि त्या जागेभोंवतीं अतिशयित रान आणि दलदल असल्यामुळें, सामान बाहेरून

आंत आणण्यास मार्ग नव्हता. असें मोठें संकट त्याला प्राप्त झालें. त्याचें निवारण कसें करावें हें त्याला सुचेना.

ह्या स्थितीमध्यें असतां, आल्फ्रेदास नानाप्रकारच्या युक्तींनीं वेळ काढून न्यावा लागला. त्याविषयींच्या अनेक चमत्कारिक गोष्टी पुस्तकांतून लिहिल्या आहेत. त्यांत कित्तीएक त्याच्या औदार्याच्या आणि धार्मिकपणाच्या आहेत. त्या वहुतकरून कल्पित असाव्या, असा ग्रंथकारांचा समज आहे. तरी, त्या गोष्टींपैकीं, जी गोष्ट सर्वत्र प्रसिद्ध आहे, ती येथें सांगितली पाहिजे. ती गोष्ट अशीः—हिंवाळ्यामध्यें थंडी अतिशयित पडली होती; ती इतकी कीं, त्या जागेच्या भोंवतालची दलदल अगदीं थिजून गेली होती. तसेंच जवळच्या नदीचें पाणी इतकें घट्ट झालें होतें कीं, त्यांतून मासे मारणाऱ्या होड्या चालेनात. त्याप्रमाणेंच शिकारींत सांपडावयाचे पशुपक्षी अपापल्या घरांत, आंग आंखडून दडून बसले होते. अशी अवस्था होती, तरी घरांत कांहींच नसल्यामुळें त्याची मंडळी, कांहींतरी मिळून आणण्याच्या उद्योगाकरितां, कोणी होड्यांत बसून जाळीं घेऊन, आणि कोणी पायीं, तिरकमटे घेऊन, बाहेर गेली होती. आल्फ्रेद हा घरामध्यें वाचीत बसला होता, आणि त्याच्याजवळ, त्याच्या कुटुंबांतली कोणी वृद्ध बाई स्वस्थ पडून राहिली होती. इतक्यांत, ती भयंकर दलदल ओलांडून, एक भिकारी तेथें आला, आणि आल्फ्रेदापाशीं कांहीं खायास मागूं लागला. त्यास त्याची दया आली, आणि त्याला द्यायाला घरांत कांहीं आहे कीं नाहीं हें पाहण्यास त्यानें त्या बाईला सांगितलें. ती जाऊन पाहूं लागली तों, घरांत एक भाकर आणि एक मासा एवढें मात्र

अन्न तिच्या दृष्टीस पडलें. तें त्या भिकाऱ्यास द्यावें किंवा न द्यावें, ह्या विचारांत तो पडला. तरी, क्षणभर विचार केल्यावर, त्यांतली अर्धी भाकर त्यास देण्याविषयीं त्यानें त्या बाईला सांगितलें, आणि वर डोळे करून भक्तिभावपूर्वक ह्मटलें, " ज्याच्या कृपाप्रसादें करून एके वेळीं पांच रोटगे आणि दोन मासे इतक्या अन्नावर तीन सहस्र माणसांचा निर्वाह झाला,* त्याच्या कृपाप्रसादानें अर्धी भाकर आपणां सर्वांस पुरेल. आपली सर्वांची काळजी त्याला आहे."

त्याप्रमाणें ती अर्धी भाकर त्याला दिली. ती हातीं पडली तेव्हां त्या भिकाऱ्यास फार संतोष झाला; तो आल्फ्रेदास आशीर्वाद देऊन तेथून निघून गेला. मग आल्फ्रेद पुनः आपलें पुस्तक वाचूं लागला. तें वाचतां वाचतां त्याला झोंप लागली; आणि त्याला स्वप्न पडलें. त्यामध्यें कोणीएक सिद्ध पुरुष प्रकट होऊन त्यास ह्मणाला, "बाबा, आल्फ्रेदा, तुझी विनंती परमेश्वराच्या कानीं गेली आहे. ती त्यानें ऐकिली आहे. तुझ्या दुःखांकडे पाहून त्याला तुझी दया आली आहे. आणि, आपण स्वतः कुटुंबासुद्धां अशा महत्संकटांत असतां, त्वां अर्धी भाकर त्या भिकाऱ्यास देऊन जी दया त्यावर केली, ती भगवंताला फार मान्य झाली आहे. ह्या कृत्यांत तुझा जो निर्धार दिसून आला, त्याचें उत्तम फल परमेश्वर तुला लवकर देणार आहे. तुझें राज्य तुला पुनः मिळेल, आणि तुझी राजसत्ता पूर्वीपेक्षां पुष्कळ अधिक होईल. हें सर्व खरोखर घडू[illegible]णार

* ह्या साक्षात्काराचें वर्णन ख्रिस्ती धर्मशास्त्रांत आहे.

आहे, ह्यास प्रमाण आज एवढेंच दिसून येईल कीं, तुझी जी मंडळी, मासे मारण्याकरितां आणि शिकारीकरितां बाहेर गेली आहे, तिला मासे आणि शिकार, पूर्वीं कधीं सांपडली नव्हती अशी विपुल सांपडेल."

त्या सिद्धाचें बोलणें संपतांच आलफ्रेद जागा झाला, आणि, त्या स्वप्नावरून त्याला जो अत्यानंद झाला होता, त्याविषयीं विचार करूं लागला. बाहेर गेलेली मंडळी परत येईल केव्हां, आणि त्यांनीं आणिलेलें विपुल साहित्य दृष्टीस पडेल केव्हां, असें त्याला झालें. तो त्यांची वाट पाहात बसला. इतक्यांत ते सर्व लोक आले. आणि त्यांनीं आणिलेली सामुग्री, एकाद्या सैन्यास पुरण्यासारखी पुष्कळ आहे, असें पाहून आलफ्रेदाला जो हर्ष झाला, तो त्याच्या पोटांत मावेना. त्यानें आपल्या स्वप्नाची सगळी हकीकत त्यांस सांगितली. तेव्हां त्यांसही, त्याप्रमाणेंच यशप्राप्तीची आशा उत्पन्न होऊन, उद्योग करण्याविषयीं नवी उमेद आली. आणि ते सगळे मोठ्या आवेशानें आपापल्या कामांस लागले. (इ० स० ८७८.)

शत्रूंवर हल्ला कसा करावा; आपल्या बचावाकरितां बळकट ठिकाणें कोठें कशीं बांधावीं; सैन्य कसें जमवावें; शत्रूंचा बंदोबस्त कमी कोठें आहे, हें कसें शोधून काढावें; आपले लोक देशामध्यें जागोजाग अज्ञातवासांत राहिले आहेत, त्यांस आपणांस येऊन मिळण्याविषयीं सूचना कशा कराव्या; अपल्या हातची जी राजसत्ता गेली आहे, ती पर[illegible]ावी; आणि शत्रूंचा नाश कोणत्या प्रकारें करावी; ह्या विचारांत ते गढून गेले. ह्मणजे औरंगजेब बादशाहाच्या वेळीं हिंदुस्थानांत मुसलमानांचा अंमल पूर्ण बसलेला

असतां, स्वराज्य स्थापण्याविषयीं शिवाजीमहाराज आणि त्यांचे अनुयायी हे जसे विचार आणि मसलती करीत होते, तसे ह्या प्रसंगीं आलफ्रेद आणि त्याचे सरदार स्वसत्ता पुनः स्थापित करण्याच्या खटपटींत अगदीं गढून गेले. त्यांचे उद्योग सफल होण्यास ह्यापुढें कितीएक चमत्कारिक कारणें घडून आलीं. त्यांचें निरूपण पुढच्या भागांत करूं.

---

## भाग पांचवा.

आलफ्रेदाच्या अज्ञातवासाचें ठिकाण एथलनी हें इंग्लंदाच्या वायव्येस सामर्सेतशायर प्रांतांत असावें, असें शोधक इतिहासकारांचें मत आहे; आणि त्या नांवाचें एक ठिकाण अद्यापही त्या जागेच्या सुमारास लोक दाखवितात. तरी, तें ठिकाण अमकेंच होतें, ह्याविषयीं निश्चय करवत नाहीं. त्या प्रदेशाच्या जवळ, कांहीं वर्षांपूर्वीं, एक जुनें कंठभूषण सांपडलें आहे, त्यांतील मधल्या खड्यावर "आलफ्रेद" अशीं अक्षरें साक्सन भाषेंत कोरिलेलीं आहेत. ह्यावरून तें ठिकाण, तेथेंच कोठें आसपास असावें, असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं.

तें ठिकाण कोणतेंही असो. त्याविषयीं वाटाघाट करून कांहीं उपयोगीं नाहीं. तरी, मागच्या भागाच्या शेवटीं वर्णिल्याप्रमाणें जेव्हां उद्योग चालले, तेव्हां, जी जागा पूर्वीं भयंकर दलदलींनीं आणि रानांनीं भरली होती, आणि जीवर राहण्यास एका गरीब शेतकऱ्यास देखील कठीण पडत होतें, ती जागा, लहानशा लष्कराच्या बळकट छावणीसारखी दिसूं लागली. आलफ्रेदाच्या लोकांनीं, आपल्या संरक्षणाकरितां एक मोठी भिंत तेथें बांधिली; आणि, त्या प्रदेशा-

च्या भोंवतीं जो अवघड जलमार्ग होता, त्यावर एक लहा-नसा पूल बांधिला. त्या पुलावर चांगली नजर ठेवितां यावी, ह्मणून, त्याच्याजवळ दोहों बाजूंस दोन लहान लहान बुरू-ज त्यांनीं उभारिले. हीं सगळीं कामें, जवळ चांगलें साहित्य नसतां, फार जलदीनें झालीं होतीं; तेव्हां तीं अगदीं ओबड-धोबड असावीं, हें उघड आहे. तरी, ज्या उद्देशानें तीं केलीं होतीं, ते उद्देश त्यांच्या योगानें चांगल्या प्रकारें सि-द्धीस गेले, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. त्या उद्देशामध्यें एक मुख्य उद्देश हा होता कीं, तेथील लोकांनीं भीति टाकून देऊन, शत्रूंशीं सामना करण्यास सिद्ध व्हावें. तो उत्तम प्रकारें साधला, ह्मणजे, त्या स्थळाच्या मजबुदीच्या बळावर त्यांस धैर्य आलें; आणि, आपण लपून बसणारे चोरटे लोक नसून, राजाच्या हाताखालचे लष्करी शिपाई आहों, असें त्यांच्या मनांत बिंबून गेलें; आणि तशा आवेशानें ते वागूं लागले. युद्धाच्या कामाला, अशा प्रकारची वीरश्री आणि शस्त्रादि इतर साहित्य, ह्या दोहोंची अवश्यकता असते. त्यांत, हा आवेश विशेष उपयोगीं पडतो. नाहींतर, हा आवेश नाहीं, आणि शस्त्रांच्या राशि पडल्या आहेत; तर त्यांचा काय उपयोग?

शत्रूंशीं सामना करण्याची तयारी आल्फ्रेद आणि त्या-चे लोक मोठ्या झपाट्यानें करीत होते, तेव्हां वेल्स प्रांताम-ध्यें हब्बा ह्या एका देन्स सरदारानें मोठी धुमाळी मांडिली होती. तो आल्फ्रेदाच्या ठिकाणाच्या अगदीं उत्तरेस होता; आणि त्याला ह्याजवर स्वारी करण्यास मध्यें त्रिस्तल नांवाची एक मोठी नदी होती. तरी; त्यापाशीं गलबतें पुष्कळ अस-ल्यामुळें, आपण येथें आहों असें कळल्याबरोबर तो आ-

पणावर चाल करून येईल, असें आल्फ्रेदास मोठें भय पडलें.

ब्रिस्तल नदीच्या अलीकडच्या कांठीं, डेव्हनशायर प्रांतामध्यें केनविथ ह्या नांवाचा एक लहानसा किल्ला होता. तेथें ओदन ह्मणून एक सुभेदार असे. तो शूर होता; आणि, आल्फ्रेदाची तयारीची सगळी खबर त्याला कळली असल्यामुळें तो त्यास साह्य करण्याकरितां सैन्य जमवीत होता. त्या किल्ल्यावर हब्बा ह्याची स्वारी आली. त्याजबरोबर फौजफांटा चांगला असल्यामुळें, ओदन हा घाबरून पळत सुटला. तो कांहीं चक्कें घेऊन, आपल्या लोकांसहवर्तमान, पुनः आपल्या किल्ल्यांत येऊन, त्याचे दरवाजे लावून घेऊन आंत बसला. तेव्हां हब्बा ह्यानें त्यास वेढा घातला.

हा हब्बा फार शूर पुरुष होता. ह्यानें स्वदेशांत आणि इंग्लंदांत मोठे पराक्रम केले होते, त्यामुळें त्यास डेन्स लोक फार मानीत असत. ते त्याला सदा विजयी समजत. त्याच्या सैन्याच्या आघाडीस एक मोठा बावटा असे. त्याचें नांव रिफान असें होतें. त्यावर, त्याच्या तिघी बहिणींच्या हातचा, रेशमाचा काढलेला एक डोमकावळा होता. त्याच्या ठायीं कांहीं विलक्षण गुण आहेत, असें डेन्स आणि साक्सन ह्या दोन्ही प्रकारच्या लोकांस वाटे. ते असें समजत कीं, लढाईच्या वेळीं तो बावटा सैन्यापुढें चालविला, ह्मणजे, त्या लढाईचा शेवट काय व्हावयाचा, हें त्या डोमकावळयाच्या चर्येवरून कळतें. पराभव व्हावयाचा असला, ह्मणजे तो, आपले पंख वगैरे न हालवितां अगदीं स्वस्थ राहतो, आणि जय व्हावयाचा असला, ह्मणजे तो आपले पंख हालवून आनंद प्रदर्शित करितो, असें त्यांच्या मनांत भरलें होतें. ह्मणून, उभय पक्षांची लढाई चालू झाली, ह्मणजे सर्वांची दृष्टि त्या डोम-

कावळ्याकडे असे. तो डोमकावळा रेशमाचा, निर्जीव होता. त्याला स्वत: हालण्याची शक्ति नव्हती. हें जरी उघड दिसण्यासारखें होतें, तरी, तेव्हांचे लोक इतके भोळवट होते कीं, कांहीं ईश्वरी साक्षात्कारानें त्याला चेतना प्राप्त होते, असें ते समजत; आणि त्याचा पंख जरासा हालल्यासारखा दिसल्यावरोवर, डेन्स लोकांस वीरश्री चढे, आणि साक्सन लोकांचें धैर्य खचे. वास्तविक पाहिलें असतां ही समजूत अगदीं भ्रांतिमूलक होती. तरी, ती, एका पक्षाच्या जयास आणि दुसऱ्या पक्षाच्या पराजयास कारणीभूत होत असे. जगांतल्या व्यवहारांचें धोरण जसें ज्ञानावर अवलंबून असतें, तसें कधीं कधीं अज्ञानावर असतें, हें पाहून मोठा चमत्कार वाटतो.

केनविथ हा किल्ला एका उंच खडकावर बांधिला होता; आणि त्याच्या भोंवतीं फार मजबूद भिंत होती. तिजकडे पाहून हब्बा ह्यास असें वाटलें कीं, हल्ला करून हातीं येण्यासारखा हा किल्ला नव्हे; ह्यास्तव, हा घेण्यास दुसरा कांहीं उपाय योजिला पाहिजे. त्याविषयीं तो विचार करीत असतां, त्यास असें कळलें कीं, किल्ल्यामध्यें मनुष्यें पुष्कळ असून, अन्नपाण्याचा पुरवठा अगदीं बेताचा झालेला आहे; आणि बाहेरून आंत जाण्याच्या सगळ्या वाटा बंद झाल्यामुळें, आणखी अन्नपाणी आंत जाण्याचें बंद झालें आहे. तेव्हां, त्यानें असा निश्चय केला कीं, दुसरा कांहींएक उद्योग न करितां, असाच वेढा घालून स्वस्थ बसावें, ह्मणजे, आंतले लोक, तान्हेनें आणि भुकेनें व्याकुळ होऊन, आपोआप शरण येतील, आणि किल्ला स्वाधीन करितील. त्याप्रमाणें वेढ्याचें काम पुरें करून तो स्वस्थ राहिला.

तिकडे किल्ल्यामध्यें ओदन हा बरीच तयारी करून राहिला होता. परंतु, आपण असेंच दिवस काढीत बसलों असतां, शेवटीं उपाशीं मरण्याचा प्रसंग प्राप्त होणार आहे, तसें दीन होऊन मरण्यापेक्षां, सुटका करून घेण्याचा प्रयत्न एकवार करून पाहावा, असा त्यानें निश्चय केला. त्याप्रमाणें एके दिवशीं सूर्यास्त झाल्यावर किल्ल्यामध्यें अंधेरांतूनच त्यानें आपल्या सैन्याची तयारी चालविली. ही रात्रीं काळोखांत तयारी करण्याचा हेतु एवढाच होता कीं, आपला हेतु बाहेरच्या देन्स लोकांस समजूं नये; आणि ते असावध आहेत तों एकदम त्यांजवर हल्ला करावयास सांपडावा.

बाहेरच्या शत्रूंवर हल्ला करून त्यांचा पराभव करण्यास अंधेराची वेळ चांगली, परंतु, त्या हल्ल्यांत जो जय प्राप्त होईल, त्याचा उत्तम उपयोग करून घेण्यास दिवसाचा वेळ पाहिजे, असा विचार ओदन ह्याच्या मनांत आला. ह्मणून त्यानें पाहांटेच्या वेळीं, ह्मणजे थोडा अंधेर होता तोंच, मोठ्या आवेशानें देन्स लोकांवर हल्ला केला. उभय पक्षांचे दोन हात झाले. त्यांत, देन्स लोक जरी पुष्कळ होते, तरी ते असावध असल्यामुळें त्यांचा अगदीं मोड झाला, आणि ओदन ह्यास जय मिळाला. देन्स लोक दशदिशा पळूं लागले. ओदन आणि त्याच्या हाताखालचे लोक जे मोठ्या वेगानें किल्ल्याच्या बाहेर पडले, ते नीट हब्बा ह्याच्या तंबूंत गेले. तेथें तो स्वस्थ निजला होता. तेथच्या तेथें त्यांनीं त्याला ठार मारिलें. त्याच ठिकाणीं त्यांस तो डोमकावळ्याचा बावटा सांपडला. त्याच्या योगानें त्यांस अत्यानंद झाला. ह्याचें कारण असें कीं, देन्स लोकांस सम-

रांगणीं लढण्यास जी वीरश्री चढत असे, ती त्या बावट्यामुळे चढत असे, हें त्यांस ठाऊक होतें.

साक्सन लोकांनीं आपला सरदार ठार मारिला आहे आणि आपला विजयाचा बावटा छिनावून नेला आहे, हें वर्तमान सगळ्या देन्स लोकांनीं जेव्हां ऐकिलें, तेव्हां त्यांचें धैर्य सुटून, त्यांस दे माय धरणी ठाय झालें. ते आपले जीव घेऊन पळत असतां, साक्सन लोकांनीं त्यांस अत्यंत निर्दयपणें कापून काढिलें. कितीएकांच्या आंगांत भाले भोसकून त्यांस त्यांनीं रस्त्यांवर टाकून दिलें; आणि जाणाऱ्या येणाऱ्यांच्या पायांखालीं त्यांची अत्यंत दुर्दशा झाली. तिचें वर्णन वाचिलें ह्मणजे आंगावर रोमांच उभे राहातात. त्यांस आश्रयास जाण्यास ठिकाण ह्मटलें ह्मणजे कायतीं त्यांचीं गलबतें होतीं. जे त्या शस्त्रवृष्टींतून बचावले, ते समुद्रकिनाऱ्यांकडे पळत सुटले. तेथेंही साक्सन लोक होतेच. त्यांच्या हातून ज्यांस आपली सुटका करून घेतां आली, असे कांहीं धडेखडे आणि सशक्त लोक, होड्यांत बसून पार झाले; आणि, जे कोणी रोडके, आजारी, जखमी आणि अशक्त होते, ते, होड्यांशीं पोंचण्याच्या आधींच पाण्यांत बुडून मरण पावले. ह्या प्रसंगीं समरांगणीं सुमारें बाराशें देन्स लोक पडले, असें सांगतात.

हा जय, आणि विशेषेंकरून तो साक्षात्काराचा बावटा, साक्सन लोकांस फार उपयोगीं पडला. ह्मणजे, त्याच्या योगानें त्यांस आपल्या उदयकालाची पक्की खातरी आली, आणि आपला प्रतिकूळ काळ जवळ आला असें देन्स लोकांच्या मनांत भरून त्यांचे हातपाय गळाले. ही सर्व हकीकत सगळ्या देशभर पसरली. ती ऐकून, जे साक्सन

लोक, आलफ्रेदाप्रमाणें, अज्ञातवासांत काळ काढीत राहिले होते, त्यांस स्फुरण चढलें. त्याप्रमाणेंच, सर्व साक्सन लोक देन्स लोकांस अतिशयित त्रासले होते, ते त्यांजवर उठण्यास तयार झाले. आलफ्रेद कोठें आहे, आणि तो कोणत्या स्थितींत आहे, हें सगळें वृत्त, गुप्तपणें, बहुतेक सर्वांस समजलें. तेव्हां, आपल्या राज्याची स्थापना पुनः खचीत होणार अशी साक्सन लोकांस उमेद आली, आणि, आपणांवर संकटें लवकरच येणार आहेत, असें देन्स लोकांस पक्कें वाटून, ते आपल्या रक्षणाच्या तयारीस लागले.

देन्स लोकांच्या लष्कराच्या छावणीचें मुख्य ठिकाण विल्तशायर प्रांतामध्यें एदेनदून येथें होतें. तें कोठें होतें, हें बरोबर समजत नाहीं. तरी कांहीं शोधक पुरुष त्याचा सरासरी अजमास बसवितात, आणि त्याच्या कांहीं खुणा हल्लींही दाखवितात. त्या जागीं देन्स लोकांच्या सगळ्या टोळ्या जमल्या, आणि आलफ्रेदाचा मोड कोणत्या प्रकारें करावा, ह्याविषयीं ते विचार करूं लागले. इकडे आलफ्रेद आणि त्याचे अनुयायी हेही त्याच प्रकारच्या विचारांत मग्न झाले होते. परंतु, त्यांची मंडळी, देन्स लोकांच्या मानानें, फार थोडी होती; आणि देन्स लोकांचें खरोखर बळ किती आहे, हें त्यांस कळेना, त्यामुळें त्यांजवर चाल करण्यास त्यांचा हिय्या होईना. तेव्हां आलफ्रेदाला अशी इच्छा झाली कीं, शत्रूंकडे व्यवस्था कशी काय आहे ती पाहून येण्यास हेर पाठविण्यापेक्षां, त्यांच्या छावणीमध्यें आपण स्वतःच, कोणत्या तरी भिन्न वेषानें प्रवेश करावा, ह्मणजे, त्यांजवर स्वारी कशी करावयाची ह्याचा विचार करण्यास ठीक पडेल. एवढें नुसतें मनांत आणूनच तो राहिला नाहीं. तर लागलाच

तो त्या उद्योगास लागला. तो असा. त्याला लहानपणापासून गाण्याचा नाद होता; त्यामुळें त्याला पुष्कळ गाणीं पाठ होतीं; त्याचा कंठ मधुर होता; त्याची चर्या चित्तवेधक होती; आणि, दुसऱ्यास संतुष्ट कसें करावें, हें तो चांगलें जाणत होता; आणखी शिवाय, त्याला सारंगीसारखें त्यांच्यांतलें एक तंतुवाद्य उत्तम वाजवितां येत होतें; तेणेंकरून, त्याला सारंग्या बनण्यास अगदीं उशीर लागला नाहीं. त्यानें भिकाऱ्याचा वेष घेतला; आपणाबरोबर असण्यास एका मित्रास, तसाच भिकाऱ्याचा पोषाक करून, बोलाविलें; आणि ते उभयतां, शुद्ध भीक मागणारे बनून, आपल्या ठाण्याबाहेर पडले, आणि, देन्स लोकांच्या छावणीकडे जाण्याचा रोख धरून, दारोदार भिक्षा मागत चालले.

ते देन्स लोकांच्या छावणीजवळ आले. त्यांच्या त्या वेषांवरून आणि वृत्तीवरून, ते हेर असतील असा कोणास संशय आला नाहीं. एवढेंच केवळ नव्हे; तर, त्यांचें गाणें वजावणें ऐकून देन्स लोकांस मोठा चमत्कार वाटला, आणि ते त्यांच्या नादीं लागले. त्यांस कोणीं पैसे द्यावे, कोणीं वस्त्र द्यावें, कोणीं अन्न द्यावें, असा क्रम चालला. शिपाई लोकांत त्यांची प्रसिद्धि होतां होतां, त्यांच्या गाण्यावजाविण्याचा लौकिक देन्स लोकांच्या मुख्य सेनापतीच्या कानावर गेला. त्यानें लागलेंच त्यांला आपल्या तंबूंत बोलावून नेलें, आणि त्यांचें गाणें वजावणें ऐकिलें. तेणेंकरून त्याला परम संतोष झाला, आणि त्यानें त्यांला आपल्या योग्यतेप्रमाणें चांगलें बक्षीस दिलें. त्या सेनापतीपुढें आल्फ्रेदानें आपलें कसब इतकें उत्तम प्रकारें दाखविलें कीं, तो कोणी मोठा

गवई आणि बजवण्या असावा, असें त्याला वाटलें, आणि त्याच्या विशेष शोधानें त्याचें खरें स्वरूप त्या वेळेस प्रकट होण्याचें सुद्धां भय होतें. परंतु, आल्फ्रेदानें तें आपल्या चतुराईनें टाळलें. खरें स्वरूप एक आणि बाहेर दाखवावयाचें दुसरें, हें कर्म फार कठीण आहे. ह्यास नेहमीं अतिशयित सावध असावें लागतें; आणि तें साधण्यास मनुष्याच्या ठायीं धूर्तता फार पाहिजे. बहुरूपी, नाटककार, इत्यादिकांस ह्या गोष्टीचा अभ्यास असतो, तेणेंकरून त्यांस तें फार जड जात नाहीं. परंतु, पांडव, आल्फ्रेद, इत्यादि राजपुरुषांस ह्या विषयाचा अभ्यास मुळींच नसतां, त्यांनीं तें उत्तम प्रकारें करून दाखविलें, ह्यावरून त्यांच्या चातुर्याचें मोठें नवल वाटतें.

देन्स लोकांच्या छावणींत असतां, आल्फ्रेद हा बाह्यात्कारें नेहमीं गाण्याबजावण्यात गुंतलेला असे खरा; तरी, त्यांचे शिपाई किती आहेत, त्यांचा बंदोबस्त कोठें कसा आहे, कोणत्या बाजूनें आणि कोणत्या वेळीं त्यांजवर हल्ला केला असतां आपणास यश येण्याचा संभव अधिक आहे, इत्यादि गोष्टी बारीक दृष्टीनें पाहण्यांत आणि त्यांविषयीं विचार करण्यांत त्याचें मन गुंतलेलें असे.

देन्स लोकांचा जो सेनापति वर सांगितला, त्याचें नांव गथ्रम असें होतें. त्याला गाण्याबजावण्याचा फार शौक असे; शिवाय, संभाषणांतली समयसूचकता त्याला फार आवडत असे. आणि हे सगळे गुण आल्फ्रेदाच्या ठायीं होते. त्यांच्या योगानें त्या उभयतांचें जमलें. तो सेनापति त्यास एकाद्या मित्राप्रमाणें वागवून वारंवार बोलावूं लागला. असें त्यांचे प्रहरांचे प्रहर त्या तंबूंत गाण्याबजावण्यांत आणि

इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगण्यांत गेले. तेणेंकरून त्यांचे स्नेह पुष्कळ वाढला. गुणांचा चमत्कार कसा आहे तो पाहा. तो सेनापति एवढ्या मोठ्या योग्यतेचा होता, तरी त्या भिकाऱ्याच्या अंगच्या गुणांच्या योगानें, तो त्याचा मित्र झाला.

तेथें कांहीं दिवस राहिल्यावर आलफ्रेद, गथ्रम ह्याचा निरोप घेऊन, आपल्या सोबत्यासहवर्तमान, जणूंकाय भिक्षा मागायास दुसरीकडे कोठें जाण्याकरितां, त्याच्या छावणींतून बाहेर पडला. देन्स लोकांच्या दृष्टीआड झाल्याबरोबर, एका चोरवाटेनें, तो एथलनी येथें आला. तेव्हां वसंतऋतूस नुकताच आरंभ झाला होता. ह्मणून लढाईची तयारी करण्यास ती वेळ फार सोईची होती.

त्या ठिकाणाच्या आसपास किल्ल्यांमध्यें आणि गढ्यांमध्यें सावसन लोक गुप्तपणें राहिले होते, हें आलफ्रेदास ठाऊक होतें. त्यांस आपलेकडचें सगळें वर्तमान कळविण्यास आणि देन्स लोकांवर हल्ला करण्याच्या कामीं आपणांस साह्य करायास येण्याविषयीं विनंती करण्यास कांहीं विश्वासू लोक प्रथम त्यानें रवाना केले. त्यांनीं त्या लोकांस सर्व हकीकत कळविली, आणि आलफ्रेदाच्या साह्यास बोलविलें. तेव्हां त्यांस मोठा आनंद झाला. त्यांनीं, आपल्या हाताखालच्या सर्वलोकांसह येण्याविषयीं त्यांस वचन दिलें. औरंगजेबाच्या वेळीं, आपलें राज्य स्थापण्याविषयीं शिवाजी जसे प्रयत्न करीत होता, तसे हे प्रयत्न होते.

ज्या अरण्यामध्यें आलफ्रेदानें सर्व लोक जमवून, लढाईची मसलत करण्याचा विचार मनांत आणिला होता, तें अरण्य सुमारें ८ कोस लांब आणि तीन कोस रुंद होतें.

तें तेव्हां सेलवुड जंगल ह्या नांवानें प्रसिद्ध होतें. त्यांत एगबर्गकातळ ह्मणून एक ठिकाण होतें, तेथें त्यांच्या सभा भरावयाच्या ठरल्या. त्या ठिकाणीं, बोलावणें पाठविलेल्या सरदारांनीं, आपल्या हत्यारबंद लोकांसह, फार गुप्तपणें, देन्स लोकांस अगदीं कळूं न देतां यावें, असे निरोप पाठविले ह्मणजे, आपली तर सगळी तयारी यथास्थित व्हावी, आणि तिजवरून देन्स लोकांनीं तर सावध होऊं नये, अशी कडीकोट तजवीज त्यांनीं चालविली.

काल अनुकूल झाला, ह्मणजे मनुष्यास हातीं घेतलेलें काम साधण्यास उशीर लागत नाहीं. साक्सन लोकांच्या हालचालीकडे देन्स लोकांचें लक्ष कमी होतें असें नाहीं. परंतु, त्यांच्या हातून आतां कांहीं व्हावयाचें नाहीं, असें समजून ते स्वस्थ राहिले होते. आणि वास्तविक ह्मटलें असतां, ह्यांत त्यांजकडून मोठी चूक झाली होती, असें ह्मणतां येत नाहीं. कांकीं, त्यांनीं साक्सन लोकांची राजसत्ता अगदीं रसातळास मिळवून टाकिली होती. ती इतकी, त्यांच्यांमध्यें आलफ्रेदासारखा विलक्षण बुद्धीचा आणि अनुपम उद्योगी राजा जर निपजला नसता, तर त्यांची राजसत्ता पुनः कधींही स्थापित झाली नसती, हें खचीत आहे.

हिंवाळा संपला; उन्हाळा लागला; बोलावलेले सगळे सरदार आपापल्या लोकांसह आले; त्यांनीं सर्वांनीं, एकमतें विचार करून, देन्स लोकांवर हल्ला कोणत्या प्रकारें करावयाचा, हें ठरविलें; आणि त्यांत, ओदन ह्यानें हब्बा ह्याचा पराभव करून त्यापासून तें डोमकावळ्याचें जादूचें निशाण हिरावून घेतलें, हें वर्तमान त्यांस कळलें; तेव्हां त्यांस अधिकच वीरश्री चढली; आणि आपलें सामर्थ्य के-

वढें आहे, हें एकवार देन्स लोकांस दाखवून त्यांच्या हातू राजसत्ता परत घेण्याचा उद्योग करण्याविषयीं त्यांचे बाहु फुरफुरले.

त्या अरण्यामध्यें, आज एक आला, उद्यां दोन आले, परवां चार आले, असे साक्सन सरदार, आपल्या जवळच्या लोकांसहवर्तमान फार गुप्तपणें आले. परंतु, ज्या ज्या मा नानें त्यांची संख्या वाढत गेली, त्या त्या मानानें त्यांचें धै वाढत गेलें; आणि त्यांचें धैर्य वाढल्यावर, ते, गुप्तपणें व गण्याचें सोडून देऊन, युद्धाची तयारी प्रसिद्धपणें क लागले. तयारीच्या मसलतींचें काम दोन दिवसपर्यंत च ललें होतें. तें सकाळीं कांहीं वेळ चाले, आणि दुपारां कां वेळ चाले; तो वेळ खेरीजकरून, बाकीचा सगळा वेळ, साक्सन वीर, खाण्यापिण्यांत आणि आनंद करण्यांत घाल वीत. ते देन्स लोकांस मुळींच भीतनासे झाले होते; त्या मुळें, त्यांच्या वाद्यांच्या नादानें दशदिशा दणाणून जा असत.

इकडे एदेनढून येथें गथ्रम आणि त्याचे लोक हे नेहमीं प्रमाणें स्वस्थ होते. तेथें लष्कर फार नव्हतें. तरी, देन्स लोकांच्या लष्करांतून काढून टाकिलेले, आणि, साक्सन लोकांस त्यांच्या ठिकाणांवरून हांकून देऊन तेथें वतनदारां सारखे होऊन राहिलेले, असे पुष्कळ देन्स लोक देशभर पसरले होते; आणि ते साक्सन लोकांशीं लढण्यास एका पायावर तया[illegible] होते. त्यांमुळें, देन्स लोक साक्सन लोकांस मुळींच भीत न[illegible]त.

गथ्रम हा चतुर [illegible]या होता. तो साक्सन लोकांच्या हालचाली फार बारीक दृष्टीनें प[illegible]स[illegible]द्वात असे; आणि त्यानें कांहीं हेर

ठेविले होते; ते त्याला त्यांजकडील वर्तमान वारंवार कळवीत असत. साक्सन लोक, स्वराज्य पुनः स्थापण्याच्या उद्योगांत आहेत, आणि सेलवुड अरण्याकडे त्यांचे थव्यांचे थवे जात आहेत, ही गोष्ट त्याला पूर्णपणें समजली होती. ते आपणांवर हल्ला करून आपणांस त्रास देतील, असें वारंवार त्याच्या मनांत येई; पण, तिकडे जेवढी तयारी खरोखर चालली होती, तेवढीची कल्पना त्याच्या मनांत आली नाहीं; आणि त्यामुळें तो किंचित् बेसावध राहिला. तरी, उन्हाळ्यामध्यें आपणास युद्ध करावें लागणार आहे, असें समजून तो आपल्या सैन्याची तयारी हळूहळू करीत होता.

सर्व गोष्टींची सिद्धता झाल्यावर, आल्फ्रेद हा, रागवर्त खडक येथील सर्व सैन्यावर मुख्य झाला, आणि त्यासहवर्तमान, मोठ्या आवेशानें गथ्रम ह्याच्या छावणीकडे चालला. तो, पहिल्या दिवशीं थोडासा पुढें गेला, आणि त्यानें लागलाच तेथें मुक्काम केला; त्यांतला आशय मिळून एवढाच होता कीं, दुसरे दिवशीं बेताची मजल पडून, शत्रूच्या छावणीनजीक आपल्या लष्करास उतरायास सांपडावें. तो त्याचा बेत सिद्धीस गेला. दुसरे दिवशीं सायंकाळीं तो, आपल्या सैन्यासहवर्तमान, ईसग्ली ह्या नांवाच्या ठिकाणावर जाऊन उतरला. तें स्थळ बरेंच उंच होतें; आणि कारण पडल्यास शत्रूशीं सामना करण्यास जसें असावें तसें होतें.

त्या ठिकाणीं लष्कराचा तळ पडून त्याची व्यवस्था लागली, तों सूर्यास्त झाला. अंधेर पडला. सैन्यांतल्या सरदारांनीं, आल्फ्रेदाच्या आज्ञेप्रमाणें जागोजाग पाहारे ठेवि-

ले; आणि, ती सर्व व्यवस्था स्वत: दृष्टीनें पाहून, तो आपल्या तंबूत जाऊन पडला. तेथें कांहीं वेळानें त्याला झोंप लागल्यावर, त्यास एक स्वप्न पडलें. त्यांत त्याला असें दिसलें कीं, सेंत निआत हा आपला कोणी आप्त आणि साधु पुरुष, एकाएकीं येऊन, आपणापुढें उभा राहिला, आणि ह्मणाला, "बेटा, शत्रूचें सैन्य जरी मोठें आहे, तरी तूं त्यास अगदीं भिऊं नको. तूं त्यावर उद्यां हल्ला करणार आहेस, तेव्हां तुला खचीत खचीत यश येईल. तुला तुझ्या कर्मांचा जो पश्चात्ताप झाला आहे, तो परमेश्वरास मान्य झाला आहे, आणि तो आतां तुजवर दया करणार आहे. तुला आतां कशाचेंही भय नाहीं. तूं सिंहासनारूढ झाला तेव्हां, अधिकाराच्या बळानें जीं पापें तुझे हातून घडलीं होतीं, त्यांबद्दल तुला शासन करण्यास, हीं अरिष्टें आणि संकटें देवानें तुजवर बुद्ध्या पाठविलीं होतीं. त्याचें प्रायश्चित्त, त्या संकटांपासून झालेल्या दु:खांच्या योगानें झालें आहे. आतां तूं मोकळा झाला आहेस. परमेश्वराची कृपा तुजवर झाली आहे. तूं बेलाशक शत्रूवर चाल करून जा; भिऊं नको; तुला जय प्राप्त होईल, आणि लवकरच तुझें राज्य तुला परत मिळेल."

दुसरे दिवशीं प्रात:काळीं हें सगळें स्वप्न आलफ्रेदानें आपल्या सैन्यास सांगितलें. तें त्या सर्वांस खरें वाटलें, आणि, त्यांचे ठायीं जी वीरश्री आली होती, तीस अधिक उत्तेजन येऊन, आपण शत्रूंवर चालून जाऊं केव्हां आणि त्यांचा पराभव करूं केव्हां, असें त्यांस झालें. ते आपली सर्व तयारी करून मोठ्या आवेशानें त्या छावणीच्या बाहेर पडले, आणि दोन तीन प्रहरांच्या आंत देन्स लोकांशीं सामना



करावयास सांपडेल, अशा वेगानें त्यांच्या छावणीकडे चालले. हें वर्तमान इ० स० ८७८ त झालें.

---

## भाग साहावा.

सर्व सैन्याचा नायक आलफ्रेद होता. तो आपल्या राष्ट्राचें खरें हित साधणारा, शूर आणि पराक्रमी होता, असें त्याच्या सर्व लोकांस वाटत होतें; आणि तो नेईल तिकडे जावयास आणि सांगेल तें करावयास ते तयार होते. तेव्हां, अशा सैन्यास जय प्राप्त व्हावा, ह्यांत कांहीं विशेष नव्हतें. आणखी त्यांत असें होतें कीं, गथ्रम हा स्वस्थ होता. साक्सन लोकांची कांहीं गडबड चालली आहे, असें वर्तमान त्याला कळलें होतें; आणि त्यांच्या हालचालीकडे त्याचें लक्ष होतें; तरी, त्यांचें एवढें सैन्य एकाएकीं येऊन आपणावर पडलें, असें त्याला मुळींच वाटलें नाहीं.

गथ्रम ह्याची छावणी एदेनदून येथें होती, हें मागें सांगितलेंच आहे. त्या ठिकाणाजवळ एक टेंकडी होती. ती त्याच्या अंमलांत होती. ती बरीच उंच होती. तिजवर त्यानें आपल्या सैन्याच्या रक्षणाकरितां किल्ल्यासारखें कांहीं बांधिलें होतें. तरी, त्याचें बहुतेक लष्कर त्या टेंकडीच्या पायथ्याजवळच्या मोठ्या मैदानांत असे. त्यानें बराच प्रदेश व्यापिला होता. ह्या ठिकाणाच्या जवळ आल्यावर आलफ्रेदानें आपले सर्व लोक उभे केले, आणि युद्धास पुढें सरसावण्यास जशी त्यांची व्यवस्था पाहिजे होती, तशी केली. ह्या प्रसंगीं त्यांस लक्षून त्यानें थोडेंसें भाषण केलें. तें असें:—

"मद्देशबांधवहो, ज्या क्रूर परकीय लोकांनीं आपलें राज्य व आपलें राष्ट्र स्वाधीन करून घेऊन जुलूम मांडिला आहे,

त्यांशीं आज संग्राम करावयाचा आहे. मित्रहो, देव आपल्या पक्षाकडे आहे, आणि तुह्मांस जय देण्याविषयीं त्यानें वचन दिलें आहे. ह्याकरितां, बापहो, माझें तुह्मांला एवढेंच सांगणें आहे कीं, आज समरंगणामध्यें तुह्मांस यश येईल, आणि त्याच्या योगानें पुढें तुमच्या राष्ट्रास सुख होईल अशा प्रकारें वागा. आपणांस परमेश्वर अनुकूल आहे, तर कांहीं कमी पडावयाचें नाहीं."

हें भाषण झाल्यावर, साक्सन लोक पुढें सरसावले. त्यांचे आणि देन्स लोकांचे कितीएक ठिकाणीं कितीएक वेळां अनेक लहान मोठे प्रसंग झाले. त्या सर्वांत साक्सन लोकांचा जय झाला, आणि देन्स लोक पराभव पावले. ह्या युद्धामध्यें उभय पक्षांकडे शस्त्रें ह्मटलीं ह्मणजे, तीरकमठे, भाले, आणि तरवारी हीं होतीं. प्रथम, दृष्टादृष्ट झाल्यावर, तीं सैन्यें एकमेकांवर बाण सोडीत; तीं जवळ जवळ आलीं ह्मणजे भाल्यांनीं लढूं लागत; आणि त्याहून निकट येऊन भिडलीं ह्मणजे तरवारींनीं युद्ध करीत.

देन्स लोकांची छावणी आणि टेंकडी ह्यांच्या मध्यें लहानसें मैदान होतें; तें, मोठ्या युक्तीनें आलफ्रेदानें आपले स्वाधीन करून घेतलें होतें. त्यामुळें त्यांची पळापळ झाली तेव्हां त्यांस कोठें थारा मिळेना. ते दशदिशा पळूं लागले, आणि त्यांचा पाठलाग साक्सन लोकांनीं केला. ते पुढें आणि हे मागें, अशी पळपकड बहुतेक सगळ्या देशांत झाली. जागोजाग झटापटी होऊन सहस्रावधि देन्स लोक समरांगणीं पतन पावले, आणि शेंकडों लोक साक्सन लोकांच्या हातीं सांपडले. कितीएक जखमी झालेले लोक, रडत आणि कण्हत रस्त्यांच्या बाजूंनीं पडले; आणि त्यांचे

जे सोबती धडेखडे होते, ते, त्यांजकडे पाहत, गथ्रम ह्याचा शोध करीत त्यांजवळून पळून गेले. अशी दाणादाण झाल्यावर, गथ्रम ह्याच्याजवळ अगदीं थोडे लोक राहिले. आणि, ते, संकटें टाळीत टाळीत, आश्रयाच्या आशेनें, एका किल्ल्याजवळ आले. ते मोठ्या लगबगीनें त्यांत शिरले, आणि, शत्रूंपासून त्रास होऊं नये ह्मणून त्यांनीं आधीं त्या किल्ल्याचे दरवाजे लावून घेतले.

ह्या किल्ल्यांत आश्रय मिळाल्यावर त्या लोकांस आणि गथ्रम ह्यास प्रथम मोठा आनंद झाला. पण तो फार वेळ टिकला नाहीं. अशा प्रसंगीं, त्यांस साह्य करण्यास, आसपासच्या प्रदेशांत पुष्कळ लोक असते, तर बरें झालें असतें. परंतु, तसा प्रकार नव्हता. एवढेंच नव्हे. तर, किल्ल्यामध्यें त्यांच्याजवळ अन्नपाण्याची सामुग्री मुळींच नव्हती. त्यामुळें, त्यांचे अतिशयित हाल होऊं लागले. फुपाळ्यांतून निघून आगींत पडावें, असें त्यांस झालें. शत्रूच्या हातीं सांपडलों असतों, तर त्यांच्या तरवारीच्या धारेखालीं एकदां चटकर प्राण गेला असता, तें मरण पुरवलें असतें, पण, अन्नपाण्यावांचून आठवड्यांचे आठवडे अत्यंत दुःखांत काढणें आणि शेवटीं मरणें हें नको, असें त्यांस वाटलें. ज्या टोळीची अवस्था अशी झाली, ती टोळी, देन्स लोकांच्या सर्व टोळ्यांत मुख्य होती; आणि तिची अशी भयंकर स्थिति झाल्याचें वर्तमान जेव्हां बाकीच्यांस कळलें, तेव्हां त्यांचें धैर्य अगदीं नाहींसें झालें; आणि आपला नाश आतां जवळ आला आहे, असें त्यांना खचीत वाटलें.

देन्स लोकांची अशी दुर्दशा पाहून, आणि आपला राजा आल्फ्रेद पुनः राज्य स्थापण्याच्या उद्योगांत यश पा-

वत आहे असें वर्तमान ऐकून, देशांतल्या सर्व साक्सन लोकांस अत्यानंद झाला, आणि ते स्वराष्ट्राचें स्वातंत्र्य पुनः मिळविण्याच्या कामीं उद्योग करण्यास आणि लढण्यास सिद्ध झाले. अशा प्रकारें करून सगळा देश हत्यारबंद होऊन डेन्स लोकांवर उठला. गथ्रम ज्या किल्ल्यांत जाऊन राहिला होता, त्यास साक्सन लोकांनीं वेढा घातला होता, त्यामुळें बाहेरचें वर्तमान त्याला कळेना. वेढा घालणाऱ्यांच्या संख्येच्या मानानें पाहिलें असतां त्याजपाशीं सैन्य अगदीं थोडें होतें; त्यामुळें, शत्रूची फळी फोडून बाहेर निघून जाण्याचा प्रयत्न करण्यास त्यास धैर्य होईना; आणि, शत्रूस शरण कधींही जावयाचें नाहीं, असा त्याचा निश्चय होता. त्यामुळें, पुढें काय करावें हें त्याला सुचेना. बाहेरून आपल्या लोकांकडून आपणास साह्य मिळेल, अशी आशा धरून त्यानें कितीएक दिवसपर्यंत वाट पाहिली; पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. अन्नपाणी न मिळाल्यामुळें रोड झालेले डेन्स पाहारेकरी, त्या किल्ल्याच्या बुरुजावरून फार आशाळभूत दृष्टीनें, दूर कोठें सैन्य दिसतें कीं काय, असें पाहात असत. पण त्या बापड्यांची आशा कधींही सफल झाली नाहीं. शेवटीं ते अगदीं टेंकीस आले. आणखी हट्टास पेटलों असतां आपला खचीत नाश होईल, असें गथ्रम यास स्पष्ट कळून आल्यावर, तो, दांतीं तृण धरून, वेढा घालणाऱ्या साक्सन लोकांच्या स्वाधीन झाला. अशा प्रकारेंकरून, डेन्स लोकांच्या मुख्य टोळीचा अगदीं नाश होऊन, साक्सन लोकांस जय प्राप्त झाला. त्यांनीं बाकीच्या डेन्स लोकांच्या टोळ्यांस मोठ्या धिटाईनें धुडकावून

लावून, जिकडे तिकडे आपला अंमल बसविला. तेव्हां आलफ्रेद हा पुनः इंग्लंदाचा राजा झाला.

गथम ह्यास पुरता वेढा पडल्यापासून तो शरण येईतों-पर्यंत मध्यें सुमारें चवदा दिवस लोटले. ते आलफ्रेदानें व्यर्थ घालविले नाहींत. तर, आतां कांहीं वेळानें शत्रु हातीं खचीत लागणार त्यांची व्यवस्था पुढें कशी करावयाची, आणि देशांत शांतता कशी स्थापावयाची, ह्या गोष्टींच्या विचारांत त्यानें ते घालविले. त्या विचारांचें फळ पुढें लवकरच दिसून आलें. ह्या प्रसंगीं इंग्लंदांतील लोकांवर शांतपणानें आणि न्यायानें अंमल चालविण्याची मोठी पंचाईत होती. ती अशी. देन्स लोक हे जरी साक्सन लोकांचे शत्रु होते, तरी, त्यांचें येणें इंग्लंदांत बहुत दिवसांपूर्वी झाल्यामुळें, त्यांतले कितीएक तेथील सुखवस्तू, रहिवासी, आणि शेतकरी बनून गेले होते. आंतलेआंत लग्नसंबंध होऊन, कांहीं अंशीं, पुष्कळ देन्स लोक अगदीं साक्सन लोकांसारखे झाले होते. त्यांस, इतर देन्स लोकांबरोबर देशांतून हांकून देणें, ह्मणजे सगळ्या राष्ट्राचा विघड करणें, असें झालें होतें. आणि ह्या सर्व गोष्टी आलफ्रेदाच्या लक्षांत येऊन चुकल्या होत्या.

देन्स लोकांनीं साक्सन लोकांस बहुत वर्षेपर्यंत अतिशयित त्रास दिला होता; त्या सगळ्याचा सूड घेण्याचा हा प्रसंग होता. दुसरा एकादा अविचारी राजा असता, तर त्या वेळीं त्यानें सगळ्या देन्स लोकांची सरसकट कत्तल उडविली असती. परंतु, आलफ्रेद हा मोठा विचारी होता. त्यानें आपल्या सर्व सरदारांस जवळ बोलाविलें, आणि भलतेंच अविचाराचें कृत्य केलें असतां आपल्या सगळ्या राष्ट्रा-

ची कशी हानि होईल हें त्यांस समजावून सांगितलें, आणि त्यांचा आवेश कमी केला. सगळे देन्स लोक देशांतून हांकून लावावे, असें कितीएकांचें मत होतें, तें देखील त्यानें समजुतीच्या गोष्टी सांगून मोडून काढिलें. आणि एवढाच निश्चय केला कीं, जे देन्स लोक लढाईचें काम करणारे आणि हत्यारबंद असतील, त्यांस मात्र इंग्लंदांतून काढून द्यावयाचें; आणि जे कोणी दुसरा कामधंदा करून, साक्सन लोकांस उपद्रव न देणारे असतील, त्यांस तसेंच स्वस्थ राहूं द्यावयाचें. त्याप्रमाणेंच त्यानें गथ्रम ह्यास असें स्पष्ट सांगितलें कीं, "तुह्मी आमच्या हातीं लागलेले शत्रु, असे आह्मी तुह्मांस वागवूं इच्छीत नाहीं. आमच्या राज्याच्या सरहद्दीबाहेर जेथें इंग्लंदांत तुमच्या लोकांचा अंमल चालत असेल, तेथें तुह्मी जाऊन खुशाल राहावें. आह्मी तुह्मांस मोकळें सोडितों, आणि, आह्मांस उपद्रव न देतां जर तुह्मी आपल्या प्रांतांचा कारभार चालवाल, तर आह्मी तुह्मांस मित्रांप्रमाणें वागवूं. परंतु, तुह्मी प्रथम, आपल्या सगळ्या हत्यारबंद लोकांसहवर्तमान आमच्या राज्याच्या सरहद्दीबाहेर निघून गेलें पाहिजे, आणि पुनः इकडे परत येणार नाहीं, अशी शपथ वाहिली पाहिजे. आमच्या राज्याच्या दक्षिणेस, ज्या प्रांतीं साक्सन लोकांचें राज्य बहुत वर्षेपर्यंत नाहींसें होऊन देन्स लोकांचें स्थापित झालें आहे, त्यांत मात्र तुह्मीं अंमल करावा; अशा वागणुकीच्या खातरीबद्दल तुह्मीं कांहीं लोक आह्मांकडे ओलीस ठेविले पाहिजेत; आणि, ह्या सर्वांपेक्षां विशेष अगत्याची अट ही आहे कीं, तुह्मीं उभय पक्षांच्या सैन्यासमक्ष ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करून बापि-

स्मा घेतला पाहिजे; त्यांत एक गुरु हवा लागतो, तो स्वतः मी होईन."

आलफ्रेदाच्या ह्या बोलण्याचा खरोखर मोठा चमत्कार वाटतो. त्याला गथ्रम आणि इतर देन्स लोक ह्यांपासून अतिशयित त्रास झाला होता, आणि त्यांच्या पायीं राज्यास मुकून कितीएक महिनेपर्यंत त्यास अज्ञातवास भोगावा लागला होता; तेव्हां वास्तविक ह्मटलें ह्मणजे, त्यानें सूड उगविण्याकरितां त्यांचा पराकाष्ठेचा छळ करावा, हें, त्याच्या शिक्षणाच्या वगैरे एकंदर स्थितीच्या मानानें विशेष संभवनीय होतें. परंतु, तो पुरुष खऱ्या थोर मनाचा होता. तो, त्यांनीं केलेले सगळे अपकार अगदीं जणुं काय विसरला, आणि त्यांस आपल्या मित्रांप्रमाणें वागविण्यास तयार झाला. त्यानें गथ्रम ह्यास धर्मांतर करावयास सांगितलें, तें कशाकरितां, हें बरोबर समजत नाहीं. परंतु, खरा तारणारा कायतो येशूख्रीस्त, आणि त्याजवर जे विश्वास ठेवितील ते तारण पावतील, असा जो ख्रिस्ती धर्मशास्त्राचा मुख्य सिद्धांत आहे, त्यास अनुसरून हा त्याचा आग्रह असावा, असें अनुमान होतें. हें अनुमान जर बरोबर असलें, तर, शत्रूचें हित करणें, हा जो साधूंचा उत्तम धर्म तो आलफ्रेदाच्या ठायीं पूर्णपणें वसत होता, असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं.

आलफ्रेदानें घातलेल्या सगळ्या अटी गथ्रम ह्यानें कबूल केल्या. त्यानें कांहीं सैन्य, त्याच्या राज्याबाहेर निघून जाण्यास, पूर्वेकडे लावून दिलें; आणि, आपण आपल्या तीस मुख्य सरदारांसह त्याजकडे राहावयास आला. त्याचा त्यानें मोठ्या पाहुण्याप्रमाणें आदरसत्कार केला. तो तेथें कांहीं आठवडे स्वस्थ राहिल्यावर, त्याच्या बाप्तिस्म्याची तयारी

चालली. तो बाप्तिस्मा एथेलनी ह्या ठिकाणाजवळ एके जागीं व्हावयाचा होता. कारण, तो संस्कार करणारे भट तेथें राहात होते.

गथ्रम ख्रिस्ती होण्यास जो तयार झाला होता, तो, त्या धर्माच्या सत्यतेवर त्याची निष्ठा बसून तयार झाला होता, असें नाहीं; तर, तो, आलफ्रेदाच्या आग्रहास्तव ख्रिस्ती होत होता. असा जरी खरा प्रकार होता, तरी, त्याचा परिणाम चांगला झाला. तो असा कीं, त्यास आणि त्याच्या बरोबरच्या लोकांस ख्रिस्ती धर्माचीं मूलतत्वें समजून, त्यांतील नीतीच्या अनुरोधानें वागण्याविषयीं त्यांची प्रवृत्ति झाली, हें एक; आणि, बाकीच्या साधारण लोकांला तो धर्म घेण्यास मोकळीक झाली, हें दुसरें. वास्तविक ह्मटलें असतां, अशा प्रकारें अडचणींत धरून मनुष्यांकडून धर्म घेववावा, हें ख्रिस्ती धर्मशास्त्रांतल्या मूलतत्वांस अनुसरून नाहीं. परंतु, तेव्हांचा काळ वेगळा होता; त्या वेळीं लोकांच्या समजुती कांहीं वेगळ्या प्रकारच्या होत्या; आणि राज्यव्यवहार आणि धर्म ह्यांचा संबंध फार निकट आहे, अशी समजूत फार होती; त्यामुळें ह्या प्रकाराचें फारसें नवल कोणास वाटलें नाहीं.

बाप्तिस्म्याचा संस्कार नेमलेल्या ठिकाणीं चालू झाला. तो पुरता होण्यास कितीएक दिवस लागले. तो ज्या ठिकाणीं झाला, त्या ठिकाणाचें नांव आलेर असें होतें. तेथें पुष्कळ धर्माधिकारी राहात होते. तो संस्कार होतेवेळेस गथ्रम ह्यास पांढरा शुभ्र पोषाक केला होता; आणि त्यावर तसाच पांढराशुभ्र शेला पांघरविला होता. ह्या वस्त्रांचें निर्मलपण हें त्या धर्माच्या निर्मळपणाचें आणि पवित्रपणाचें

सूचक होतें, असें लोक समजत. तो संस्कार समाप्त झाल्यावर, त्याला, एदलस्तन हें नवें नांव दिलें; आणि आलफ्रेदानें त्याचें गुरुत्व पतकरिलें. नंतर, ती सगळी मंडळी, तेथून कांहीं अंतरावर आलफ्रेदानें एक चांगली जागा तयार करविली होती, तेथें मोठ्या डामडौलानें गेली. त्या ठिकाणीं, एदलस्तन ह्याचा मंडळींत मिळण्याचा विधि झाला. हें सगळें आटोपल्यावर, तेथें पुष्कळ मेजवान्या झाल्या. देन्स आणि साक्सन लोक हे पूर्वींचा सगळा वैरभाव विसरून, मित्रांप्रमाणें वागूं लागले, आणि त्या सर्वांनीं कांहीं दिवस मोठ्या आनंदांत घालविले.

ह्या वेळापासून एदलस्तन हा राजा ही पदवी पावला; आणि, त्यानें, आलफ्रेदाच्या राज्याच्या पूर्वेस, नेमलेल्या प्रांतांवर स्वतंत्रपणें राज्य करावें, असें ठरलें. तो आपल्या बरोबरीचा राजा आहे, असें समजून, आलफ्रेदानें त्याशीं मित्रत्वाचा तह ठरविला. त्यांत गथ्रम ह्यानें असें कबूल केलें कीं, नेमलेल्या प्रांतांबाहेर मी कधींही दरखदारी ठेवणार नाहीं. हे प्रांत कोणते होते, ह्याचा बरोबर नकाशा आतां काढून दाखवितां यावयाचा नाहीं, हें खरें आहे; तरी, त्यांत, नार्फक, सफक, केंब्रिजशायर, एसेक्स, आणि हियरफर्दशायराचा कांहीं भाग, इतके परगणे मोडत होते, इतकें सांगतां येतें. ह्या प्रांतांमध्यें तेव्हां मुख्यत्वेंकरून देन्स लोकांची वस्ती होती; आणि जर्मन समुद्रांतून ह्या प्रांतांत येण्यास फार सोपें पडत असे.

आलफ्रेदानें नेमिलेल्या प्रांतांत स्वतंत्रपणें राज्य करावयाचें, एवढेंच कबूल करून गथ्रम राहिला नाहीं. तर, तो आपणास त्याचा ताबेदार ह्मणवूं लागला, आणि, त्यास सं-

कटसमयीं साह्य करण्याचें त्यानें कबूल केलें. आणि शिवाय, त्यानें कांहीं लोक ओलीस दिले, ते वेगळेच. तरी, आल्फ्रेद ह्मणजे त्याच्या बोलण्यावर पूर्ण विश्वास ठेवून राहिला, असें नाहीं. कां कीं, देन्स लोकांमध्यें सत्य आणि प्रामाणिकपणा हीं किती आहेत, हें त्याला बहुत दिवसांपासून ठाऊक झा लें होतें. तरी, आपण त्याच्या हातीं सांपडलों असतां, त्या नें आपणास न छळितां, एक स्वतंत्र राज्य दिलें, आणि एवढ्या ममताळूपणानें वागविलें, हें त्याच्या विलक्षण औ दार्याचें आणि थोरपणाचें लक्षण आहे, असें गथ्रमाच्या म नांत येऊन, तो त्याला फार थोर मानूं लागला, आणि, त्याच्या सैन्याचें सामर्थ्य पूर्णपणें जाणून त्यास भिऊन वागूं लागला.

आल्फ्रेदाचे येथील मेजवान्यांचा थाट आटोपल्यावर गथ्रम हा तेथून त्याचा निरोप घेऊन निघाला, आणि नेम लेल्या प्रांतीं जाऊन राज्य करूं लागला. त्याला, निघून जातेवेळीं आल्फ्रेदानें पुष्कळ मोलवान वस्तु बक्षीस दिल्या. शत्रु हातीं लागल्यावर त्याजवर इतकी ममता करणें आणि त्याला अशा प्रकारच्या देणग्या देणें हें खरोखर फार मो ठ्या औदार्याचें आणि मनाच्या थोरपणाचें लक्षण आहे. हा अलौकिक गुण आल्फ्रेदाचे ठायीं होता. तेव्हां, इति हासकारांनीं त्याची गणना जी वर्णनीय थोर पुरुषांत केली आहे, ती यथार्थ आहे.

गथ्रम ह्यास स्वतंत्र राज्य देण्याच्या कामांत, त्या राज्या वर आल्फ्रेदानें आपलें स्वामित्व कोणत्या प्रकारें ठेविलें होतें कीं नव्हतें, ह्याविषयीं कोठें कांहीं उल्लेख नाहीं; ह्मणून त्या विषयीं खातरीनें कोणतीच गोष्ट सांगतां येत नाहीं. तरी,

आपल्या राज्यांत जे कायदे चालणार, तेच कायदे गथम ह्याच्या राज्यांत चालावे, असा त्याचा फार हेतु होता; ह्मणून, त्यानें त्याच्या राज्याकरितां कायदे करण्याचा अधिकार त्यानें आपणाकडे ठेविला होता, असें दिसतें. ह्या कामांत त्याची दृष्टि फार दूरवर गेली होती. ह्मणजे, कालांतरेंकरून हीं दोन्हीं राज्यें एक होणार, हें त्याला खचीत दिसून आलें होतें; आणि तसें झालें असतां, तिकडील लोकांस लोकव्यवहाराच्या आणि राज्यरीतीच्या संबंधानें कांहीं परकेपणा वाटूं नये, असा त्याचा आशय होता. थोर पुरुष जीं कामें करितात, तीं, केवळ प्रकृत कालाकडे लक्ष देऊन करीत नाहींत. तर, त्यांचें धोरण, शेंकडों वर्षांनंतर घडणाऱ्या गोष्टींकडे असतें.

गथम हा तहाप्रमाणें वागला. त्याला राज्य करण्याला जे प्रांत नेमिले होते, त्यांच्या बाहेर, आल्फ्रेदाच्या राज्यांत किंवा राजाधिकारांत हात घालण्याचा प्रयत्न त्यानें कधींही केला नाहीं. तो राज्य करूं लागल्यानंतर, देन्स लोकांच्या कितीएक टोळ्या त्याच्या प्रांतांच्या शेजारीं आल्फ्रेदाच्या राज्यांत येऊन उतरल्या, आणि गथमापासून साह्य मिळविण्याचा प्रयत्न करूं लागल्या. परंतु, त्यांचे सर्व उद्योग व्यर्थ गेले. गथम हा, आल्फ्रेदाचे उपकार स्मरून, आपल्या वचनास न ढळतां, आपलें राज्य हांकीत स्वस्थ राहिला. तेणेंकरून त्या टोळ्यांपासून आल्फ्रेदास फारसा उपद्रव झाला नाहीं. गथम हा, आपल्या देशबांधवांस साह्य न करितां स्वस्थ राहिला, एवढेंच केवळ नव्हे; तर, त्यांच्या कितीएक झुंडी त्यानें मोठ्या आवेशानें देशाबाहेर हांकून लाविल्या, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. मनुष्य स्व-

कटसमयीं साह्य करण्याचें त्यानें कबूल केलें. आणि शिवाय, त्यानें कांहीं लोक ओलीस दिले, ते वेगळेच. तरी, आल्फ्रेद ह्मणजे त्याच्या बोलण्यावर पूर्ण विश्वास ठेवून राहिला, असें नाहीं. कां कीं, देन्स लोकांमध्यें सत्य आणि प्रामाणिकपणा हीं किती आहेत, हें त्याला बहुत दिवसांपासून ठाऊक झालें होतें. तरी, आपण त्याच्या हातीं सांपडलों असतां, त्यानें आपणास न छळितां, एक स्वतंत्र राज्य दिलें, आणि एवढ्या ममताळूपणानें वागविलें, हें त्याच्या विलक्षण औदार्याचें आणि थोरपणाचें लक्षण आहे, असें गथ्रमाच्या मनांत येऊन, तो त्याला फार थोर मानूं लागला, आणि त्याच्या सैन्याचें सामर्थ्य पूर्णपणें जाणून त्यास भिऊन वागूं लागला.

आल्फ्रेदाचे येथील मेजवान्यांचा थाट आटोपल्यावर गथ्रम हा तेथून त्याचा निरोप घेऊन निघाला, आणि नेमलेल्या प्रांतीं जाऊन राज्य करूं लागला. त्याला, निघून जातेवेळीं आल्फ्रेदानें पुष्कळ मोलवान वस्तु बक्षीस दिल्या. शत्रु हातीं लागल्यावर त्याजवर इतकी ममता करणें आणि त्याला अशा प्रकारच्या देणग्या देणें हें खरोखर फार मोठ्या औदार्याचें आणि मनाच्या थोरपणाचें लक्षण आहे. हा अलौकिक गुण आल्फ्रेदाचे ठायीं होता. तेव्हां, इतिहासकारांनीं त्याची गणना जी वर्णनीय थोर पुरुषांत केली आहे, ती यथार्थ आहे.

गथ्रम ह्यास स्वतंत्र राज्य देण्याच्या कामांत, त्या राज्यावर आल्फ्रेदानें आपलें स्वामित्व कोणत्या प्रकारें ठेविलें होतें कीं नव्हतें, ह्याविषयीं कोठें कांहीं उल्लेख नाहीं; ह्मणून त्याविषयीं खातरीनें कोणतीच गोष्ट सांगतां येत नाहीं. तरी,

आपल्या राज्यांत जे कायदे चालणार, तेच कायदे गथ्रम ह्याच्या राज्यांत चालावे, असा त्याचा फार हेतु होता; ह्मणून, त्यानें त्याच्या राज्याकरितां कायदे करण्याचा अधिकार त्यानें आपणाकडे ठेविला होता, असें दिसतें. ह्या कामांत त्याची दृष्टि फार दूरवर गेली होती. ह्मणजे, कालांतरेंकरून हीं दोन्हीं राज्यें एक होणार, हें त्याला खचीत दिसून आलें होतें; आणि तसें झालें असतां, तिकडील लोकांस लोकव्यवहाराच्या आणि राज्यरीतीच्या संबंधानें कांहीं परकेपणा वाटूं नये, असा त्याचा आशय होता. थोर पुरुष जीं कामें करितात, तीं, केवळ प्रकृत कालाकडे लक्ष देऊन करीत नाहींत. तर, त्यांचें धोरण, शेंकडों वर्षांनंतर घडणाऱ्या गोष्टींकडे असतें.

गथ्रम हा तहाप्रमाणें वागला. त्याला राज्य करण्याला जे प्रांत नेमिले होते, त्यांच्या बाहेर, आल्फ्रेदाच्या राज्यांत किंवा राजाधिकारांत हात घालण्याचा प्रयत्न त्यानें कधींही केला नाहीं. तो राज्य करूं लागल्यानंतर, देन्स लोकांच्या कितीएक टोळ्या त्याच्या प्रांतांच्या शेजारीं आल्फ्रेदाच्या राज्यांत येऊन उतरल्या, आणि गथ्रमापासून साह्य मिळविण्याचा प्रयत्न करूं लागल्या. परंतु, त्यांचे सर्व उद्योग व्यर्थ गेले. गथ्रम हा, आल्फ्रेदाचे उपकार स्मरून, आपल्या वचनास न ढळतां, आपलें राज्य हांकीत स्वस्थ राहिला. तेणेंकरून त्या टोळ्यांपासून आल्फ्रेदास फारसा उपद्रव झाला नाहीं. गथ्रम हा, आपल्या देशबांधवांस साह्य न करितां स्वस्थ राहिला, एवढेंच केवळ नव्हे; तर, त्यांच्या कितीएक झुंडी त्यानें मोठ्या आवेशानें देशाबाहेर हांकून लाविल्या, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. मनुष्य स्व-

भावानें कितीही क्रूर आणि उपद्रवकारक असो; तो, कृतज्ञतेच्या योगानें भला होतो, असें ह्या आणि दुसऱ्या कितीएक गोष्टींवरून दिसून येतें.

ह्याप्रमाणें देन्स लोकांचा उपद्रव कमी होऊन, शांतता प्राप्त झाल्यावर, आल्फ्रेद हा आपल्या राज्याच्या व्यवस्थेच्या आणि सुधारणेच्या कामास लागला. सैन्याची टापटीप ठेवणें, रस्ते बांधणें, नवीं शहरें वसविणें, जुन्यांची दुरुस्ती करणें, नवे किल्ले बांधणें, जुन्यांची डागडुजी करणें, सरहद्दीवर शिबंदी ठेवणें, जागोजाग न्यायाधीश नेमणें, त्यांच्या कामाची पद्धति लावण्याकरितां नवे कायदे करणें, व्यापार आणि शेतकी ह्यांस उत्तेजन मिळेल अशा तजविजी योजणें, लोकांत विद्येची अभिरुचि उत्पन्न करणें, त्यांच्यांतल्या अडाणीपणाच्या चाली काढून टाकणें, त्यांच्यांत चांगल्या रीतींचा प्रचार पाडणें, इत्यादि अनेक स्तुत्य कृत्यें त्यानें पुष्कळ मेहनत घेऊन केलीं. त्यांतल्या कितीएकांचें वर्णन आह्मीं पुढच्या भागीं थोडक्यांत करण्याचें योजिलें आहे.

देन्स लोकांच्या संबंधाचा आल्फ्रेदाचा त्रास पुष्कळ अंशीं नाहींसा झाला खरा. परंतु, नार्थमेन ह्मणून दुसऱ्या एका प्रकारचे रानटी लोक त्याच्या देशामध्यें तेव्हांपासून वारंवार येऊं लागले, आणि त्यांच्या योगानें आल्फ्रेदास पुष्कळ श्रम झाले. त्याच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं तर त्या लोकांस एक दोन प्रसंगीं चांगले जय मिळाले. त्यांची हकीकत फार लांब नाहीं; थोडीच आहे. परंतु, कालानुक्रमानें ह्मटलें ह्मणजे तिचें स्थळ हें नव्हे. ह्मणून तिचें कथन यथाकालीं करूं.

ज्या औदार्यानें आणि थोरपणानें आल्फ्रेदानें प्रथम

ह्यास वागविलें, तें औदार्य आणि तें थोरपण खरोखर वर्णनीय आहे. आणि असा अनुपम थोर पुरुष आपल्या देशामध्यें होऊन गेला, ह्मणून इंग्लिश लोक गर्व वाहातात, तो अगदीं यथार्थ आहे. इंग्लिश लोकांचीच गोष्ट कशास पाहिजे? गथ्रमाच्या संबंधानें आलफ्रेदानें जें आचरण केलें, तें कोणत्याही देशांतल्या लोकांस स्तुत्य वाटण्यासारखें आहे; आणि त्याचा कित्ता आपण घ्यावा, असें कितीएक राजांस वाटण्यासारखें आहे. शत्रूस त्याच्या अपराधांची क्षमा करणें आणि त्याला देणग्या देऊन त्याला आपलेंसें करून घेणें, हा सद्गुण फार मोठा आणि फार उपयोगी आहे. हा लोकांचे ठायीं दृष्टीस पडला ह्मणजे मनुष्यांस फार चमत्कार आणि संतोष वाटतो. परंतु, तो अंगीं धरणें हें किती कठीण आहे, ह्याचा अजमास त्यांच्या मनांत येत नाहीं. आपल्या शत्रूशीं जसा आलफ्रेद वागला, तसें आपणही आपल्या शत्रूशीं वागूं, असें ज्या कोणास वाटत असेल, त्यानें, आपल्या अल्पव्यवहारांतच त्याचा अनुभव घेऊन पाहावा. उगाच अनुमानें करून स्वस्थ बसूं नये.

---

## भाग सातवा.

आलफ्रेदाच्या कारकीर्दीच्या वर्णनाकडे सुज्ञ पुरुषांचें जें इतकें लक्ष लागतें, त्याचें मुख्य कारण असें आहे कीं, त्याला लहानपणापासून लढाईच्या कामाचा नाद असून, आणि त्याच्या तारुण्याचे बहुतेक दिवस देन्स लोकांशीं युद्ध करण्यांत गेले असून, राजाधिकार हातीं आल्यावर तो, आपल्या राष्ट्रांतील लोकांच्या सुखाच्या वृद्धीकरितां, एखादा मोठ्या जुन्या मुत्सद्याप्रमाणें, मोठ्या शहाणपणानें,

औदार्यानें आणि दयाळूपणानें मनापासून झटूं लागला, आणि त्याचे प्रयत्न सफल झाले, ही गोष्ट फार चमत्कारिक आहे. तो शूर होता, ह्याविषयीं सर्व लोकांची खातरी झाली होती; आणि त्यावरून त्याची कीर्तिही पुष्कळ पसरली होती. परंतु, नुसत्या लढाया मारिल्यानें आणि शत्रु जिंकिल्यानें आपल्या राष्ट्राचें खरें हित होणार नाहीं आणि आपलें नांव चिरकाल राहाणार नाहीं; तर, ह्या दोन गोष्टी साधण्यास आपल्या लोकांतलें अज्ञान घालविण्याचा आणि त्यांच्यांतल्या अडाणीपणाच्या रीति नाहींतशा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असें त्याचे मनांत आलें; तो त्यानें केला, आणि तो पुष्कळ अंशीं सिद्धीस केला.

आलफ्रेदाला ज्या लोकांची सुधारणा करावयाची होती, ते फार अडाणी होते. तरी, ते जाणे होते. ह्मणजे, आपला राजा जे श्रम करीत आहे, ते सर्व राष्ट्राच्या हिताकारितां करीत आहे, आणि त्याचें फल शेवटीं उत्तम होणार आहे, असें ते समजत होते. त्यानें ज्या गोष्टींचा पाया तेव्हां घातला, त्या गोष्टी पूर्णतेस येण्यास तेव्हांपासून गेलेलीं दाहा शतकें लागलीं. ह्याविषयीं कोणीएक तद्देशाभिमानी ग्रंथकाराचा लेख फार चमत्कारिक आहे. त्याचें तात्पर्य असें:—"आंग्लोसाक्सन लोकांशिवाय दुसऱ्या कोणत्याही लोकांत आलफ्रेद उत्पन्न झाला नसता, हें जसें खरें आहे, तसें, त्याचे बेत दुसऱ्या कोणत्याही लोकांच्या हातून तडीस गेले नसते, हेंही खरें आहे. आंग्लोसाक्सन लोक हे, मोठे शांत, उद्योगी, लढाईच्या कामांत कुशल, संकटसमयीं न डगमगणारे, सर्व कामें पद्धतवार करणारे आणि दृढ निश्चयी, असे आहेत. त्यांस कोणतेंही काम करावयाचें असूंद्या

मग तें त्यांस माहीत असो किंवा नसो—तें ते मोठ्या युक्तीनें आणि कांहींतरी एक नियमित पद्धत धरून करितील. त्यांच्या उद्योगांत कधीं गोंधळ असावयाचा नाहीं. काम त्यांचे हातांत गेलें, कीं लागलेंच त्याला चांगलें स्वरूप येतें; आणि दिवसानुदिवस त्याची सुधारणा अधिकाधिक होत जाते. जगांतलीं इतर राष्ट्रें कांहींएक विशेष उद्योग न करितां अगदीं स्तब्ध असतात, तेव्हां आंग्लोसाक्सन लोकांचा उद्योग मोठ्या झपाट्यानें चाललेला असतो. त्यांस, निरुद्योगी राहाणें हें कसें तें ठाऊक देखील नाहीं. इतर राष्ट्रांमध्यें लोकसुखाचीं साधनें युगांचीं युगें जशांच्यातशींच असतात, आणि त्या वेळांत आंग्लोसाक्सन लोकांच्या सुखाचीं साधनें एकसारखीं सुधारत जात असतात. नवनव्या युक्ति काढणें, त्या प्रचारांत आणणें, नवीन प्रकारचे उद्योग धैर्यानें पतकरणें, आपलें सुख वाढविण्याचा उद्योग करणें, नवे कायदे करणें, इत्यादि गोष्टींत नेहमीं गुंतलेलें असणें, हें ह्या लोकांचें ब्रीद आहे. ह्याचें फळ सांप्रतकाळीं कसें आलें आहे तें पाहा. आज शेंकडों वर्षांपासून हें राष्ट्र पृथ्वींतल्या कितीएक राष्ट्रांस वस्त्र आणि अन्न पुरवीत आहे, कितीएक राष्ट्रांवर राज्य करीत आहे, आणि मोठमोठ्या बलाढ्य राष्ट्रांस प्रसंगविशेषीं आपल्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यास लावीत आहे." हें वर्णन स्वदेशाभिमानाच्या आवेशाच्या भरांत लिहिलेलें आहे. त्यामुळें ह्यांत क्वचित् कोठें अतिशयोक्ति झाली आहे. तरी, एकंदरीनें पाहिलें असतां, हें वर्णन यथार्थ आहे, असें वाटतें.

आपल्या राष्ट्राच्या हिताकरितां आलफ्रेदानें जे उद्योग केले, ते, आपले लोक अशा उत्तम प्रकारचे आहेत, असें

समजून केले, किंवा, त्याला ते सहज सुचले ह्मणून केले, ह्याविषयीं कांहींच निश्चय करवत नाहीं. तथापि, आपलें राष्ट्र हें सगळें आपलें कुटुंब आणि गणगोत आहे, असें समजून, तो त्याच्या सुधारणेकरितां आणि सुखाच्या वृद्धीकरितां निरंतर प्रयत्न करीत असे, ह्यांत कांहीं संशय नाहीं. तो राज्य करूं लागला तेव्हां त्याचे लोक बरेच रानटी आणि अडाणी होते, आणि त्यांजकरितां प्रत्येक चांगली गोष्ट आल्फ्रेदास करावी लागली, ह्यामुळें त्याला फार श्रम पडले.

तो प्रथम गादीवर बसल्यापासून तर त्याला देन्स लोकांशीं झगडावें लागलेंच. पण प्रथम, ह्याशीं तह ठरल्यावर देखील त्याला त्यांपासून पुष्कळ त्रास झाला. त्यांचा बंदोबस्त करणें हेंच एक मोठें काम होतें; आणि साधारण बुद्धीच्या माणसास, तेवढें पुरून उरलें असतें; परंतु, आल्फ्रेद ह्याची बुद्धि असाधारण होती. त्यामुळें, त्यानें तें सगळें संभाळून, आपल्या लोकांच्या सुधारणेचीं पुष्कळ कामें केलीं. ही गोष्ट समजून, इंग्लिश लोक त्याची कीर्ति अद्यापपर्यंत गात आहेत.

ह्या लढाईच्या त्रासाशिवाय, त्याला दुसरा एक ताप होता. तो हा कीं, त्याला लहानपणापासून एक रोग झाला होता, त्यापासून त्याला वारंवार अतिशयित वेदना होत असत. तो रोग कोणता होता, ह्याचें निदान तेव्हां कोणास करितां आलें नाहीं; तेव्हां अर्थात, त्यास औषध न मिळाल्यामुळें, त्याला त्याचें दुःख जन्मभर सोसणें भाग पडलें. त्या रोगामुळें त्याला नेहमीं चैन पडत नसे; आणि कधीं कधीं तर इतक्या वेदना होत कीं, त्या डोळ्यांनीं पाहावत

ना. पण हें सर्व दुःख तो अगदीं शांतपणानें सोशीत असे. हा रोग आपला शेवट केव्हां करील कोणजाणे, असें जरी वारंवार त्याचे मनांत येत असे, तरी त्यानें राष्ट्राचें हित करण्याचा उद्योग कधीं कमी पडूं दिला नाहीं. हें त्याचें आचरण खरोखर मोठ्या साधूसारखें होतें. खऱ्या थोर पुरुषांचें वागणें असेंच असतें.

आपल्या लोकांस विद्या द्यावी, असा आलफ्रेदाचा फार हेतु असे. पण तो सिद्धीस नेण्यास साधनें नव्हतीं. छापण्याची कला तेव्हां निघाली नव्हती; त्यामुळें पुस्तकांची अतिशयित कमताई असे. तीं सगळीं हातांनीं लिहावीं लागत. त्यांस वेळ आणि श्रम फार लागत. त्यामुळें त्यांस किंमत अतिशयित पडे. राष्ट्रांतले बहुतेक लोक शेतकीवर आपली उपजीविका करीत असत. त्यांस शेतांतलें काम चांगलें कळत असे. आणि, इतर गोष्टींविषयीं ते अगदीं अज्ञानी असत. त्यांचे ठायीं विद्याभ्यासाची अभिरुचि उत्पन्न करण्याचा प्रयत्न आलफ्रेदानें केला; त्याप्रमाणेंच, वरच्या प्रतीच्या लोकांत कलाकौशल्याची आवड उत्पन्न करण्याविषयीं तो फार झटला. तो नुसता तोंडीं बोध करून स्वस्थ राहिला नाहीं. तर, ज्ञानसंपादनार्थ कसे परिश्रम करावे, हें त्यानें स्वतःच्या उद्योगानें लोकांस दाखविलें. ह्याविषयीं कितीएक गोष्टी पुस्तकांतून लिहिल्या आहेत, त्यांतली एक सांगतों.

वेल्स प्रांतामध्यें असर ह्या नांवाचा एक मोठा नामांकित धर्माध्यक्ष होता. विद्वत्तेविषयीं चोहींकडे त्याची फार कीर्ति होती. ती आलफ्रेदाच्या कानीं आल्यावर, त्यास बोलावून आणण्याकरितां त्यानें बुद्ध्या एक जासूद त्याजकडे पाठवि-

ला. त्याप्रमाणें तो त्याचे दरबारीं आला. त्याची विद्या आणि वृत्ति पाहून आलफ्रेदास फार आनंद झाला, आणि असा थोर पुरुष आपल्या संग्रहीं असावा, असें त्याच्या मनांत आलें. त्यावरून त्यानें त्याला असें ह्मटलें कीं, "आपण कृपा करून माझ्या दरबारीं येऊन राहाल, तर, वेल्स प्रांतांत जी प्राप्ति तुह्मांला आहे, तिजहून पुष्कळ अधिक उत्पन्नाचें काम मी तुह्मांस देईन, आणि यथाशक्ति बहुमान करीन." तें असर ह्यानें नाकबूल केलें. तेव्हां आलफ्रेदानें त्यास असें ह्मटलें कीं, "तुह्मांस आह्मांकडे नेहमीं राहाण्यास बरें वाटत नसेल, तर, निदान, वर्षांतून साहा महिने तरी आमच्या दरबारांत राहात जावें, असें माझें मागणें आहे." त्यावर असर ह्यानें उत्तर दिलें कीं, "ह्याविषयीं माझ्यानें आतां कांहींएक सांगवत नाहीं. वेल्सामध्यें माझ्या बरोबरीचे आणि हाताखालचे जे धर्माधिकारी आहेत, त्यांचा विचार घेतल्याशिवाय मी कांहीं बोलूं शकत नाहीं. तरी, आपल्या प्रश्नाचें उत्तर देण्यास मी पांच चार महिन्यांत परत येईन." इतकें बोलणें झाल्यावर असर कांहीं दिवसपर्यंत आलफ्रेदाच्या दरबारीं राहिला, आणि मग त्याचा निरोप घेऊन आपल्या गांवीं निघून गेला.

ह्या गोष्टीस साहा महिने लोटले. तरी, कबूल केल्याप्रमाणें, असर परत आला नाहीं. तेणेंकरून आलफ्रेदास किंचित् वाईट वाटलें; आणि, त्याचा शोध करण्याकरितां त्यानें पुनः एक जासूद पाठविला. तो जाऊन पाहूं लागला, तों असर हा आजारी होता. तरी, त्याच्या मंडळीनें त्यास इंग्लंदांत साहा साहा महिने राहण्याविषयीं अनुमोदन दिलें होतें. ह्यांतला त्यांचा आशय एवढाच होता कीं, राजाच्या

आश्रयानें आपल्या वेल्स प्रांतांतल्या संस्थानाच्या रक्षणास अधिक बळकटी येईल, आणि कदाचित् आणखीही कांहीं उत्पन्न मिळेल. त्याप्रमाणें पुढें कांहीं दिवसांनीं असर इंग्लंदास गेला, आणि आलफ्रेदाकडे साहा महिने राहिला. तो सर्वकाळ त्याच्या संनिध असे, आणि तो त्याला नानाप्रकारच्या नवनव्या गोष्टी शिकवीत असे. त्याजवर आलफ्रेदाचा लोभ फार जडला. त्यानें त्याला कांहीं अधिकाराचीं कामें सांगितलीं, आणि त्याची देखरेख धर्माच्या खात्यावर असावी असें ठरविलें.

कोणे एके वेळीं असर आणि आलफ्रेद हे उभयतां नानाप्रकारच्या विषयांवर बोलत बसले असतां, असर ह्यानें लातिन भाषेंत कांहींएक वाक्य ह्मटलें, आणि त्याचा अर्थ आंग्लोसाक्सन भाषेमध्यें आलफ्रेदास सांगितला. तो ऐकून राजास फार आनंद झाला, आणि त्याला अशी इच्छा झाली कीं, तें वाक्य आपणाजवळ लिहिलेलें असावें. ह्मणून त्यानें लागलीच आपल्या खिशांतून एक वही काढिली. तिजवर प्रार्थना आणि स्तोत्रें लिहिलेलीं होतीं. ती वही नेहमीं त्याच्याजवळ असे. तिजवर कोठें तरी, तें वाक्य आणि त्याचा अर्थ हीं लिहून घ्यावीं, असें त्याच्या मनांत होतें. पण तिजवर रिकामी जागा मुळींच नव्हती. तें पाहून असर त्याला ह्मणाला, " अशीं लातिन वाक्यें पुष्कळ आहेत; आणि तीं वारंवार तुमच्या कानीं पडणार आहेत; ह्याकरितां तीं टिपून घ्यावयास एक वेगळीच वही करावी, आणि तिजवर तीं लिहावीं, ह्मणजे बरें होईल. " त्याप्रमाणें त्यानें एक चोपडी तयार केली, आणि तिजवर लातिन भाषेंतलीं धर्मसंबंधीं आणि नीतिसंबंधीं वाक्यें लिहिण्याचा

क्रम चालविला. त्या वाक्यांचें भाषांतर आंग्लोसाक्सन भाषेंत आल्फ्रेद स्वहस्तें लिहीत असे. अशा प्रकारें त्या वहीवर हजारों वाक्यांचा संग्रह झाला. ती वही नेहमीं आल्फ्रेद आपल्या खिशांत बाळगीत असे, आणि फावल्या वेळांत त्या वाक्यांचा अभ्यास करीत असे. असें होतां होतां त्याला लातिन भाषेची गोडी लागली. ही अभिरुचि दिवसेंदिवस वाढत जाऊन, त्यानें त्या भाषेचा जो अभ्यास केला, त्याच्या योगानें तो तींत प्रवीण झाला. मोठें कार्य घडून येण्यास अगदीं लहान कारण कधीं कधीं बस होतें, तें असें.

आपल्या लोकांची बुद्धि वाढावी आणि त्यांनीं विद्या शिकावी, अशी आल्फ्रेदाची फार इच्छा होती. त्याविषयीं तो नेहमीं झटत असे. तेव्हां छापण्याची कला कोणास माहीत नव्हती. त्यामुळें पुस्तकांच्या प्रती हातांनीं कराव्या लागत असत. आपल्या लोकांच्या सोईकरितां आल्फ्रेदानें स्वतः आपल्या हातानें कितीएक पुस्तकांचीं भाषांतरें लिहिलीं. त्यांतलीं कांहीं मठांतून टेविलीं, आणि कांहीं, लोकांस वाचायास मिळत अशा रीतीनें वांटिलीं. त्यांत नीति, धर्म आणि व्यवहार ह्यांसंबंधीं बोध होता. तो फार चांगला होता. तो तेव्हांच्या शाहाण्या पुरुषांस फार आवडत असे. त्यांत कितीएक सिद्धांत असे होते कीं, ते अद्यापपर्यंत विद्वानांस मान्य आहेत, आणि पुढें ते चिरकाल तसेच राहतील, अशी आशा आहे. कितीएक गोष्टी त्यांत अशाही आहेत कीं, त्या, त्या काळीं जरी फार उत्तम अशा वाटत होत्या, तरी, आतां, त्या बालिश आणि अग्राह्य अशा दिसूं लागल्या आहेत. हा विद्यावृद्धीचा स्वाभाविक परिणाम होय. आल्फ्रेदाच्या हातचे लेख अद्या-

पपर्यंत कोठें कोठें फार जपून वाळगून ठेविले आहेत. ते, शोधक आणि प्राचीन वस्तूंचे भोक्ते पुरुष मोठ्या सन्मान-बुद्धीनें आणि आनंदानें पाहातात. फार जुने झाल्यामुळें त्यांजवरचीं पुष्कळ अक्षरें वाचतां येत नाहींत; आणि, मध-ले शब्द गेल्यामुळें कितीएक वाक्यांचा अर्थ देखील बरोबर समजत नाहीं. तरी, विद्वान पुरुष त्यांची योग्यता फार मो-ठी मानितात.

लोकांस विद्या शिकविण्याकरितां आलफ्रेदानें जे अनेक प्रयत्न केले, त्यांतच आक्सफोर्द येथील पाठशाळासमाजा-च्या स्थापनेची गणना आहे. आक्सफोर्द येथें पुष्कळ दिवसपर्यंत तो राहात असे, आणि कितीएक वर्षेपर्यंत ती त्याची राजधानी होती. हें शहर थेम्सनदीवर वसलेलें आहे. ह्याच्या भोंवतीं डोंगर आणि रानें पुष्कळ आहेत. आणि हें स्थळ निर्मळ, शांत आणि दिसण्यांत गंभीर असें आहे. तेणेंकरून, तें, आपली कल्पनाशक्ति पाहिजे तशी चालवून, कविता रचीत बसायास योग्य आहे, असें विद्वान् पुरुषांस वाटतें. तेथें, आलफ्रेदाच्या वे-ळेच्या आधींपासूनच एक मोठा मठ होता. त्यांत पुष्कळ विद्वान् पुरुष राहात असत. त्या मठास पुष्कळ राजांनीं नानाप्रकारच्या देणग्या दिल्या होत्या. त्यांत कितीएक अशा होत्या कीं, त्यांपुढें आलफ्रेदाच्या देणग्या कांहींच नव्हत्या. ह्मणून कितीएक ग्रंथकारांचें ह्मणणें असें आहे कीं, आक्स-फोर्ड येथील विद्वत्सभा आलफ्रेदानें स्थापिली, असें ह्मणण्या-पेक्षां, आलफ्रेदानें तीस उत्तेजन दिलें, असें ह्मणावें हें बरें. तरी, आलफ्रेदानें, कांहीं नवे नियम करून, त्या सभेच्या कामास एक उत्तम पद्धति लावून दिली, तेथें दूरदूरच्या

देशांतले नामांकित विद्वान् पुरुष बोलावून आणून, अनेक विद्याविषयांवर त्यांजकडून चर्चा करविण्याचा पाठ घातला, आणि लोकांच्या विद्याभ्यासाकरितां अनेक शाळा जागोजाग स्थापिल्या, ह्या अलौकिक कृत्यांवरून, त्यास सर्व लोकांनीं त्या सभेचा जनक ह्मणून जें एकदां ह्मटलें आहे, तें तसेंच चाललें आहे, आणि ह्यापुढें तें तसेंच चालणार आहे. आतां आक्सफोर्ड हें शहर विद्यांचें माहेरघर झालें आहे. त्याच्या रस्त्यांतला स्वस्थपणा, त्याचे मोठमोठे चवाठे, देवालयें, भजनालयें, पुस्तकालयें, जुन्या भव्य इमारती, इत्यादि गोष्टी दृष्टीस पडल्या ह्मणजे नवखा प्रवासी अगदीं थक्क होऊन जातो. गेल्या दाहा शतकांत, ह्या विद्यापीठांत विद्वान् होऊन जी मंडळी बाहेर पडली आहे, तिच्या योगानें जनाच्या मनाच्या स्थितीवर पुष्कळ फेरफार झाले आहेत, आणि आणखी किती होतील ह्याविषयीं कांहीं अनुमान करितां येत नाहीं. ह्यास्तव, विद्येच्या संबंधानें ह्या ठिकाणास जें एवढें महत्त्व प्राप्त झालें आहे, तें यथार्थ आहे, असें ह्मटलें पाहिजे.

पुष्कळ दिवस देशामध्यें दंगा चालल्यामुळें बहुतेक किल्ले अगदीं नादुरुस्त झाले होते, त्यांची डागडुजी आलफ्रेदानें केली. कितीएक किल्ले नवे बांधिले. कांहीं शहरें वसविलीं. आणि जागोजाग सार्वजनिक सुधारणेच्या मंडळ्या स्थापून, त्यांचें मुख्यत्व विद्वान् आणि धार्मिक अशा पुरुषांस दिलें. त्याप्रमाणेंच, देशांतील राज्यव्यवहाराचे सर्व कायदे एकत्र करून त्यानें त्यांची नीट व्यवस्था लाविली, आणि त्यांच्या अनुरोधानें काम कसें करावें, हें ठरविलें. त्या वेळेपर्यंत काम कायद्यांप्रमाणें चालत नव्हतें, असा आमच्या ह्मण-

ण्याचा आशय नाहीं. परंतु, समजुतीच्या आणि वहिवाटीच्या संबंधानें जे कांहीं वेगवेगळे प्रकार वेगवेगळया ठिकाणीं चालले होते, ते मोडून टाकून त्या सर्व कामास एक पद्धत त्यानें लावून दिली.

आलफ्रेदानें आपल्या राष्ट्रांतील लोकांत पुष्कळ नवीन परिपाठ चालू केले. अडाणी लोक, आपल्या रीतीभातींच्या संबंधानें मोठे हट्टी आणि दुराग्रही असतात. जुन्या रीति टाकून नव्या घ्यावयाच्या ह्मटलें ह्मणजे त्यांच्या जीवावर येतें. आणि ह्या कामांत ते सहसा कोणाचें ऐकत नसतात. साक्सन लोकांची स्थिति अगदीं ह्या प्रकारची असतां, आलफ्रेदानें त्यांच्यांत पुष्कळ नव्या रीति चालू केल्या, हें खरोखर मोठें नवल आहे. परंतु, थोडा विचार करून पाहिला असतां, त्यांत कांहीं आश्चर्य नव्हतें, असें स्पष्ट दिसून येईल. त्याचा प्रकार असा. आलफ्रेद हा मोठा विचारी आणि दूरदृष्टि पुरुष होता. त्याला मनुष्याच्या स्वभावाचें ज्ञान चांगलें होतें. आपण जें लोकांस करायास सांगतों, तें स्वतः आपण करूं लागल्यावांचून लोक त्यास हात लावणार नाहींत, हें तो पूर्णपणें जाणून तसा वागत होता. आणि, सर्वांत एक गोष्ट फार उत्तम झाली होती; ती ही कीं, त्याजवर त्याच्या लोकांचा विश्वास पूर्ण बसला होता, आणि तो आपणांस जें कांहीं करावयास सांगतो, त्यांत खरोखर आपलें हित आहे, असें त्यांच्या मनांत बिंबून गेलें होतें. यामुळें लोकसुधारणेचें काम त्याला फार सुलभ गेलें. राजा आणि प्रजा ह्यांचा विचार एक असला ह्मणजे राष्ट्राची सुधारणा होण्यास उशीर लागत नाहीं. परंतु त्यांत विपर्यास असला ह्मणजे तीस किती व्यत्यय येतात, आणि

ती किती सावकास चालते, ह्याचा अनुभव पाहाण्यास आ-
मच्या वाचकांस दूर जावयास नको. स्वतःच्या राष्ट्राकडे
त्यांनीं लक्ष द्यावें, ह्मणजे झालें.

आल्फ्रेद हा स्वभावानें फार शांत आणि मोठ्या धी-
राचा पुरुष होता. तो सहसा कधीं रागावत नसे, आणि सं-
कटसमयीं घाबरत नसे. ज्या गोष्टींच्या योगानें साधारण
कोणाही माणसास अतिशयित संताप यावयाचा, त्या गो-
ष्टींचें त्याला कांहीं वाटत नसे. तो मोठा सोशीकही होता.
त्याला कोणीं कांहीं ह्मटलें, तरी तो तें मनास आणीत नसे.
हाताखालच्या नौकरांनीं कांहीं चूक किंवा कुचराई केली,
तर तो त्यांज़वर कधीं जाहाल जात नसे. कांकीं, नौकरांच्या
हातून त्या गोष्टी नेहमीं व्हावयाच्याच, असें तो समजत
असे. मोठ्या लाभानें अत्यंत हर्षित होणें अथवा कांहीं हानि
झाली ह्मणजे खिन्न होऊन बसणें, हेंही त्याच्या स्वभावाला
ठाऊक नव्हतें. ह्मणजे, तो नित्य तृप्त, शांत, आणि विचार-
मग्न असा तत्त्ववेत्ता होता, असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं.
तो वारंवार असें ह्मणे कीं, "मनुष्याची स्थिति कोणत्याही
प्रकारची असो, त्याला सुखदुःखाची पाळी चुकावयाची
नाहीं. ह्यास्तव, तिच्या योगानें आपल्या व्यवसायांत अंतर
पडूं द्यावयाचें नाहीं, असा मनुष्याचा दृढ निश्चय असावा."
असें नुसतें ह्मणून तो रहात नसे; तर त्याप्रमाणें वर्तत असे.
परमेश्वरानें आपणास जो हा जीव दिला आहे, तो दुस-
ऱ्याचें बरें करण्याकरितां दिला आहे, असा त्याचा भरंवसा
होता; आणि ह्मणून तो नेहमीं त्याला लक्षून चालत असे.
स्वराष्ट्राचें हित साधणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे, ही
गोष्ट त्याच्या अंतःकरणांत ठिंबून गेली होती. ह्मणून,

तिला साधक असे उद्योग तो निरंतर करीत असे. हा सर्व प्रकार त्याच्या हाताखालच्या कामदारांस आणि प्रजेस कळला होता. त्यामुळें, सर्व लोक त्याला बापासारखा मान देत, आणि तो जें काम हातीं धरी, तें सिद्धीस नेण्याकरितां ते मनापासून प्रयत्न करीत.

इतक्या प्रकारचीं कामें आल्फ्रेदानें हातीं घेतलीं होतीं, त्यामुळें त्यास स्वस्थपणा असा कधींही मिळत नसे. तो नेहमीं कोणत्या ना कोणत्या तरी कामांत गुंतलेला असे. आणि सर्व कामें यथास्थितपणें करण्यास त्याला आपल्या वेळास फार जपावें लागे. तेव्हां घड्याळांची युक्ति निघाली नव्हती. आणि आल्फ्रेदाच्या मनांत असें आलें कीं, कोणत्या तरी प्रकारानें आपणास वेळाचें मान पाहिजे तेव्हां कळेल असें केल्यावांचून नियमानें सर्व कामें करण्याची शिस्त लागावयाची नाहीं. ह्याविषयीं त्यानें आपल्या जवळच्या माणसांशीं पुष्कळ वादविवाद केला. परंतु, त्यापासून कांहीं फायदा झाला नाहीं. तेव्हां शेवटीं, त्यानें स्वतःच एक युक्ति बसविली. तिचा प्रकार असा:—त्याच्या वाड्यामध्यें आणि भजनालयामध्यें उजेडाकरितां ज्या मेणबत्त्या लावीत असत, त्या, ज्या मानानें लहान मोठ्या असत, त्या मानानें, कमजास्त वेळांत, परंतु नियमित अवधीनें जळत, ह्या गोष्टीकडे प्रथम त्याचें लक्ष गेलें. तीवरून कांहीं नियमित प्रमाण बसवून, एका तासांत तीन इंच जळावी, अशा प्रकारच्या मेणबत्त्या तयार करण्यास त्यानें सांगितलें. त्याप्रमाणें त्या तयार झाल्या. त्यांतील प्रत्येक मेणबत्तीचें वजन बारा पेनिवेत होतें; आणि तिची लांबी बरोबर एक फूट असे. ह्मणजे प्रत्येक मेणबत्ती बरोबर चार तासपावेतों

जळावी, अशी तजवीज त्यानें काढिली. त्या मेणबत्त्यांवर रेघा काढविल्या होत्या. त्यांवरून, वीस वीस मिनितांचें मान कळत असे. ह्या मेणबत्त्या आलफ्रेदानें भजनालयांत ठेवविल्या; आणि, तेथल्या एका कामदारास असें सांगितलें कीं, त्या तेथें अहोरात्र लावाव्या, आणि, त्यांच्या धोरणानें, दर तासास, किंवा दर दोन तासांनीं मोठ्या घंटेचा गजर करावा. आणि, लोकांस असें सुचविलें कीं, त्यांनीं आपापलीं कामें, नियमित वेळानें रोजच्या रोज करावीं. ही गोष्ट लोकांच्या मनांत चांगली भरावी, आणि त्यांनीं तीप्रमाणें वागावें, ह्मणून तो स्वत: आपलीं कामें त्या घंटेच्या धोरणानें करूं लागला. बोध करण्याच्या कामीं वाचालतेपेक्षां क्रिया फार उपयोगीं पडते, हें त्याला ठाऊक होतें.

हें लोकांस फार बरें वाटलें; आणि त्यांचीं कामें वेळच्या वेळीं होऊं लागलीं. परंतु, त्यांत एक मोठी अडचण उत्पन्न झाली. ती ही कीं, त्या काळीं तिकडे कांच कोणास ठाऊक नसल्यामुळें, देवालयांतल्या खिडक्यांतून कधीं कधीं वाऱ्याचा सोसाटा येऊन, वेळ मोजण्याच्या मेणबत्त्या विझून जात, आणि तेणेंकरून वेळाच्या मोजण्यांत वारंवार चूक पडे. ही गोष्ट आलफ्रेदाच्या कानीं गेली. तेव्हां तो तिजविषयीं विचार करूं लागला. विचार करितां करितां, त्याला असें सुचलें कीं, जनावरांचीं शिंगें कापून कागदासारखीं पातळ केलीं असतां, चांगलीं पारदर्शक आणि कांहीं वेळपर्यंत पाहिजेत तशीं लवणारीं होतात, त्यांचा उपयोग करून पाहावा. त्याप्रमाणें त्यानें लहानशा पेटीसारखे कांहीं फुगे तयार करविले, आणि ते त्या मेणबत्त्यांवर ठेविले. तेव्हां, त्यांस वारा लागण्याचें बंद होऊन, त्या बेताप्रमाणें

जळूं लागल्या. ही युक्ति आल्फ्रेदानें काढिली, ह्मणून, कंदिलाची मूळ कल्पना काढणारा तो होता, असें युरोपांतले लोक समजतात.

ह्याप्रमाणें वेळाचें मान ठरविण्याचें काम पुरें झाल्यावर, आल्फ्रेदाचे सगळे उद्योग बरोबर नियमांनीं चालले. त्या वेळचा एक इतिहासकार असें सांगतो कीं, "आल्फ्रेदानें एकंदर अहोरात्राचे तीन सारखे भाग केले. त्यांतला एक भाग तो विश्रांति आणि खाणेंपिणें ह्यांकडे लावी, एक भाग राज्यसंबंधीं कामकाजांत खरची, आणि एक ईश्वरभजनांत घालवी." ईश्वरभजनाच्या कामांत, विद्याभ्यास, धर्माच्या खात्याची व्यवस्था पाहाणें, इत्यादि गोष्टींचा समावेश होत असावा, असा सुज्ञ ग्रंथकारांचा तर्क आहे. आणि, त्या वेळीं ग्रंथ लिहिणें, ग्रंथ वाचणें, आणि धर्मनीतिसंबंधीं विचार करणें ह्या सर्व गोष्टी मठांत व्हावयाच्या असत. त्यावरून, तो तर्क खरा दिसतो. अमक्या वेळेस अमकें काम करावयाचें, असा नियम ठरविणें कांहीं कठीण नाहीं. पण, त्याप्रमाणें तीं कामें, अव्यवस्था न होऊं देतां करणें हें फार अवघड आहे. ही गोष्ट सर्वांच्या अनुभवास येण्याजोगी आहे. तरी, मागच्या लेखांवरून असें दिसतें कीं, आपलीं कामें वेळच्या वेळीं करण्यांत आल्फ्रेद हा कधीं टळला नाहीं.

आल्फ्रेद आपल्या राज्यकारभारांत फार चोख रीतीनें वागत असे, आणि आपल्या राष्ट्राचें हित करण्यास अहोरात्र झटत असे. त्याच्या योगानें त्याच्या लोकांस फार सुख झालें, आणि त्याच्या मुलुखाची अमदानी दिवसानुदिवस वाढत गेली. तरी, देन्स लोक स्वाऱ्या करून त्यांस कधीं कधीं त्रास देत असत. शिवाय, जे देन्स लोक इंग्लंदांत

राहिले होते, ते आपसांत कलह करून नानाप्रकारच्या कटकटी करीत त्या वेगळ्याच. त्या सगळ्यांचें निवारण करून आलफ्रेदानें, आपल्या लोकांमध्यें, नीति, धर्म, कलाकौशल्य इत्यादि सुखप्रद गोष्टींची वृद्धि अल्प कालांत पुष्कळ केली, आणि त्यांची योग्यता वाढविली, हें त्यास अत्यंत भूषणप्रद होय. देन्स लोकांचे बखेडे त्यानें मोडून टाकिले; तरी, त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीच्या सुमारास, देन्स लोकांचा सरदार हेस्तिंग ह्यानें त्याच्या राज्यावर स्वारी केली, त्यामुळें त्यास आणि त्याच्या राष्ट्रास बराच त्रास भोगावा लागला. ती गोष्ट बरीच लांब आहे; आणि ह्या भागाची मर्यादा सरली आहे. ह्मणून हा येथें पुरा करितों.

---

## भाग आठवा.

सत्पुरुष जगाच्या कल्याणाकरितां प्रयत्न करीत असले, ह्मणजे त्यांस मध्यें विघ्न करणें हें दुष्टांचें ब्रीद आहे. जणुं काय तसें केल्याशिवाय त्यांची दुष्टता पूर्णत्व पावत नाहीं. आलफ्रेदानें देन्स लोकांपासून आपलें राज्य परत घेऊन, आपल्या राष्ट्राच्या उत्कर्षाचे प्रयत्न चालविले. ते पुष्कळ अंशीं सिद्धीस गेले. ह्मणजे त्याचे लोक त्यांच्या योगानें सुखी झाले. परंतु, त्यांच्या सुखाची वृद्धि फार दिवस एकसारखी चालावी, असा ईश्वरी संकेत नव्हता. एदेनडू येथें आलफ्रेदानें जय मिळविल्यास पंधरा वर्षें पूर्ण झालीं नाहींत तोंच हेस्तिंग नामक एका सरदारानें इंग्लंदावर स्वारी केली, आणि तेथील लोकांस हैराण केलें. त्याविषयीं कथन करण्यापूर्वीं हेस्तिंग हा कोण होता, हें थोडेंसें सांगितलें पाहिजे.

हेस्तिंग हा कोणी एक देन्स मनुष्य होता. तो नेहमीं फौजबंद असे. त्याचें आरमारही चांगलें होतें. तो जर्मन समुद्रावर अधिकार चालवीत असे, आणि आपणास त्या समुद्रावरचा राजा ह्मणवीत असे. त्याचें सगळें तारुण्य असें बंडाळींतच गेलें होतें. तो तेव्हां ज्या रीतीनें वागत असे, त्या रीतीनें जर आतां कोणी वागूं लागला, तर त्याला चांचा आणि बंडखोर ह्मणतील, आणि शिक्षा करितील. परंतु, तेव्हांचा काळ कांहीं वेगळा होता. तो असा कीं, अशा प्रकारच्या वर्तनास लोक शूराचें वर्तन ह्मणत, आणि त्याची वाहवा करीत. हें तरी सर्वत्रासारखें होत नाहीं. पाहा. हेस्तिंग ह्यास त्याच्या देशाचे लोक शूर आणि पराक्रमी ह्मणत; परंतु, ज्या परकीय लोकांस त्यापासून ताप होई, ते त्यास बंडखोर, चोर, दुष्ट, घातकी समजत. ठीकच आहे. अनुभव हा अभिप्रायाचा जनिता होय.

हेस्तिंग ह्यानें फ्रान्सावर स्वाऱ्या करून तेथील लोकांस पराकाष्ठेची पीडा दिली होती, हें वर्तमान आलफ्रेद आणि आंग्लोसाक्सन लोक ह्यांस कळलें होतें. त्यामुळें ते त्यास फार भीत असत. त्यानें ह्यापूर्वींही एकदां इंग्लंदावर हल्ला करण्याचा मोठा प्रयत्न केला होता; परंतु, तेव्हां गथ्रम होता. त्यानें, आपल्या वचनाप्रमाणें वागून, आलफ्रेदाच्या राज्याच्या रक्षणाकरितां, त्याशीं लढून त्यास मागें फिरायास लाविलें. परंतु, आतां गथ्रम मरून बरेच दिवस झाले होते. ह्यामुळें ह्या प्रसंगीं आलफ्रेदास एकट्यासच शत्रूशीं लढायास उभें राहणें भाग पडलें. (इ० स० ८९३)

हेस्तिंग हा गलबतांतून आला होता. त्यानें, इंग्लंदाच्या दक्षिण किनाऱ्यावर आपल्या सैन्यासहवर्तमान उतरण्याचा

निश्चय केला. गथमाच्या मागें, इंग्लंदाच्या पूर्वभागीं देन्स लोक अंमल करीत होते; त्यांशीं प्रसंग न यावा, ह्मणून त्यांचा प्रदेश टाळून हेस्तिंग बुद्ध्या दक्षिणेकडे वळला. त्याला, गथम मेला हें समजलें नव्हतें. आणखी, त्याला असें खचीत ठाऊक होतें कीं, देन्स लोकांशीं संग्राम करण्याचा प्रसंग आला असतां, आपणास एकदम परत जावें लागेल. ह्मणून कांहीं अंशीं तो त्यांना भिऊनही वागत होता.

आधींच हेस्तिंग ह्याबरोबर पुष्कळ लोक होते; आणखी, इकडे येतांना, वाटेंतल्या कितीएक बेटांतले लोक त्याला मिळाले. अशी त्याजपाशीं सैन्याची जमात बरीच झाली. त्याजबरोबर लहान मोठीं, एकंदर सुमारें अडीचशें जाहाजें होतीं. हें सगळें आरमार, इंग्लंदाच्या दक्षिण किनाऱ्यावर, एके जागीं फार दलदलीची आणि अरण्यमय अशी एक भली मोठी मैदानाची पट्टी होती, तिजवर येऊन उतरलें. ह्या पट्टीस रोमी असें नांव होतें. ही पट्टी, आतां भर टाकून, आणि समुद्राचें पाणी आंत येऊं नये ह्मणून पुढें बांध घालून, चांगली सुपीक केली आहे. ती इतकी कीं, तेथें पूर्वीं अशी वाईट जागा होती, असें पाहाणाऱ्याच्या मनांत सुद्धां येत नाहीं. हेस्तिंग येथें उतरला, तेव्हां ह्या जंगलांतून आंतील चांगल्या प्रदेशांत जाण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे कायती एक नदी होती. तींत जाहाजें चालत. त्या नदींतून, जाहाजांत बसून लोक आंत येत असत.

ह्या नदींतून गलबतें हांकारून, हेस्तिंग हा आंतील कोरड्या प्रदेशांत आला; आणि, तेथें उतरून, मोठ्या बंदोबस्तानें लहानशी छावणी करून राहिला. हें ठिकाण दल-

दलीचें नव्हतें, एवढेंच कायतें. पण, येथें अरण्य अतिशयित भयंकर होतें, आणि त्याच्या आसपास माणसांची वस्ती मुळींच नव्हती. त्याजपासून बऱ्याच अंतरावर कांहीं रानटी शेतकरी राहात असत. ते, त्या अरण्यांत गवतकाडी, लांकूडफांटें न्यावयास, आणि, त्या दलदलीच्या अगदीं कांठावर ते एक लहानशी गढी बांधीत होते, तिचें काम करावयास मात्र कधीं कधीं आलेले दृष्टीस पडत. त्यांस हेस्तिंग ह्यानें धिसपिटावून लाविलें, आणि, आणखी थोडासा प्रदेश ओलांडून तो आंत गेला. तेथें त्याला चांगली जागा सांपडल्याबरोबर, त्या ठिकाणीं त्यानें एक लहानसा किल्ला बांधिला, आणि त्यांत आपलें सैन्य ठेविलें.

हेस्तिंग ह्याचा विचार असा होता कीं, तेम्स नदीच्या मुखाजवळ आपलें सैन्य उतरण्यास जागा मिळाली ह्मणजे, तेथें दुसरी एक टोळी पाठवून, किल्ला बांधून, त्या ठिकाणीं छावणी करावी. ही त्याची इच्छा पूर्ण झाली. ह्या दोन छावण्यांच्या मध्यें अंतर फार थोडें होतें. त्यामुळें त्यांस एकत्रपणें तयारी करण्यास फार चांगली सोय झाली. परदेशचा मनुष्य इतक्या सैन्यासहवर्तमान त्या दोन ठिकाणीं येऊन सैन्यासहवर्तमान राहिला, आणि एवढ्या बंदोबस्ताच्या छावण्या त्यानें तेथें केल्या, तरी, त्यांविषयींची खबर आलफ्रेदास कळली नाहीं कशी, ह्याचें मोठें नवल वाटतें. परंतु, त्या काळीं, हल्लींप्रमाणें टपाल नव्हतें; आणि सर्व प्रकारचें दळणवळण फार कमीं होतें; त्यामुळें असा प्रकार घडला, हें लक्षांत ठेवावें. शिवाजीनें तोरणा किल्ला घेतल्याचें वर्तमान दिल्लीच्या दरबारीं कळायास साहा महिने लागले.

तरी, थोडक्या वेळानें हें सगळें वर्तमान आलफ्रेदास

कळल्यावर, तो, आपल्या सैन्याची तयारी करून, हेस्तिंग ह्यापाशीं लढण्यास सिद्ध झाला. त्याचें सैन्य बरेंच मोठें होतें. तरी, तें हेस्तिंग ह्याच्या सैन्यापेक्षां पुष्कळ कमी होतें. उभय पक्षांच्या लढाया चालू झाल्या. त्यांत कधीं ह्याचा जय होई कधीं त्याचा जय होई. आपलें सेनाबल कमी आहे, हें आल्फ्रेद जाणून होता. ह्मणून, तो, समोरासमोर लढण्याचा प्रसंग, होईल तितका प्रयत्न करून टाळीत असे. हेस्तिंग ह्याच्या लोकांस कोठेंतरी अडचणीच्या जागेंत गांठून वेढा घालावा, त्यांस दाण्याचाऱ्याचा तोटा पाडावा, त्यांस एकाद्या भयंकर प्रदेशांतून पार जाण्याचा प्रसंग आणावा, इत्यादि उपायांनीं त्यांस जेरीस आणावें, असा क्रम आल्फ्रेदानें चालविला. त्यामुळें, शेवटीं आपणास जय मिळेल कीं आपला पराभव होईल, ह्याविषयीं त्यांच्यानें कांहींच अजमास करवेना. तरी, जयाच्या आशेपेक्षां अपजयाची भीति त्यांचे ठायीं विशेष होती. आणि, लढाई जसजशी लांबत चालली, तसतशी ती अधिकाधिक होत गेली. आणि त्या मानानें, शत्रूचा पराभव करण्याविषयीं आल्फ्रेदास अधिकाधिक उमेद येत चालली.

हेस्तिंग हा मोठा कपटी होता. त्याचे लोक थकत चालले, असें जेव्हां त्याला दिसलें, तेव्हां, त्यानें आल्फ्रेदाशीं लबाडी केली. तिचा प्रकार असा. माझ्यानें पुढें लढाई चालववत नाहीं, मी तुह्मांस शरण येण्यास सिद्ध आहे, असा निरोप त्यानें आल्फ्रेदास पाठविला; आणि त्यापाशीं मागणें एवढेंच मागितलें कीं, मला माझ्या लोकांसहवर्तमान आपल्या मुलूखांतून सुरक्षितपणें जाऊं द्यावें, ह्मणजे झालें. तें सगळें आल्फ्रेदानें कबूल केलें; आणि एकमात्र विशेष अट

त्याला अशी सांगून पाठविली कीं, तुह्मी येथून निघून जाण्यापूर्वीं तुमच्या दोघां मुलांनीं बाप्तिस्मा घेतला पाहिजे. तें त्या लबाडानें मान्य केलें. त्यावरून, त्याचें बोलणें खरें आहे असें आलफ्रेदास वाटलें. परंतु, थोडक्या वेळानें त्याला असें समजलें कीं, हेस्तिंग हा आपणास इकडे अशा भुलथापा देऊन, तिकडे गुप्तपणें सैन्याच्या टोळ्या आंग्लोसाक्सन सेनेवर हल्ला करण्यास पाठवीत आहे. तेव्हां त्यानें तो नाद सोडून दिला; आणि, त्या टोळ्यांचा पाठलाग करण्याकरितां आपले लोक रवाना केले. अशा प्रकारें पुनः ती लढाई मोठ्या आवेशानें चालू झाली.

कोणे एके वेळीं हेस्तिंग हा, आपली छावणी सोडून कांहीं कामाकरितां कोठें दूर गेला होता. ती संधि पाहून, आलफ्रेदाच्या लोकांनीं तिजवर हल्ला केला, आणि तींत सांपडलेल्या सगळ्या लोकांस धरिलें. त्यांत हेस्तिंग ह्याची बायको आणि मुलें हीं त्यांच्या हातीं लागलीं. त्यांस प्रखरतर शासन भोगण्यास किंवा ठार मारण्यास, तेव्हांच्या चालीप्रमाणें, त्यांनीं आलफ्रेदाकडे पाठविलें. त्यांस त्यानें तिळमात्रही दुःख दिलें नाहीं. एवढेंच केवळ नव्हे; तर, परमार्थबुद्धीनें त्यानें त्या मुलांस बाप्तिस्मा दिला, आणि त्यांस व त्यांच्या आईस उत्तम उत्तम वस्तु बक्षीस देऊन, त्यांस परत हेस्तिंग ह्याजकडे पाठवून दिलें. ही गोष्ट आलफ्रेदाच्या वर्तनास अत्यंत भूषणप्रद होय. शत्रूचीं मुलेंमाणसें हातीं लागल्यावर, मनांतल्या द्वेषबुद्धीच्या तृप्त्यर्थ त्यांचे हाल करावे, असा माणसाचा स्वाभाविक कल असतो; आणि रानटी लोकांत हा प्रकार फार आढळतो. असें असतां, त्या दुष्ट मनोवृत्तीस एकीकडे ठेवून, त्या मा-

णसांवर त्यानें इतकी दया केली, ह्याचें खरोखर मोठें आश्चर्य वाटतें. असे आश्चर्यकारक सद्गुण ज्यांचे ठायीं असतात, तेच खरे थोर असे जनास वाटतात.

आलफ्रेदानें एवढें विलक्षण औदार्य प्रकट केलें, तरी, हेस्तिंग ह्यास त्याचें कांहींएक वाटलें नाहीं. तो पूर्ववत् आलफ्रेदाचा द्वेष करून त्याशीं लढत होता. पुढें कांहीं वेळानें त्याच्या मदतीस आणखी सैन्य आलें. तेव्हां तर त्याला विशेष उमेद आली; आणि, आलफ्रेदाच्या राज्याच्या अंतर्भागीं प्रवेश करावयाचा, असा त्यानें निश्चय केला. त्याप्रमाणें तो आपल्या सैन्यासहवर्तमान तिकडे वळला, आणि कांहीं मजलांपर्यंत गेला सुद्धां; पण, असा कांहीं चमत्कार झाला कीं, ह्या त्याच्या फाजीलपणामुळें त्याची मोठी हानि झाली. ती अशी कीं, तो आपल्या राष्ट्रामध्यें मोठा जय करीत येत आहे, असें जेव्हां आंग्लोसाक्सन लोकांनीं पाहिलें, तेव्हां त्यांस त्याचा फार राग आला; आणि, ज्या प्रदेशांतून तो चालला होता, त्या प्रदेशांतले सगळे आंग्लोसाक्सन रहिवासी त्याजवर उठले, आणि त्याच्या सैन्यावर बाणांचीं वृष्टि करूं लागले. ती इतकी कीं, तिच्या योगानें, त्याला पुढें जाण्याचा क्रम सोडावा लागून, एका बंदोबस्ताच्या जागीं छावणी करून राहणें भाग पडलें. त्यास आंग्लोसाक्सन लोकांनीं वेढा घातला, आणि, त्याच्या लष्करास अन्नपाणी प्राप्त होण्याचीं सर्व द्वारें बंद केलीं.

आलफ्रेदास आणि त्याच्या लोकांस असें वाटलें कीं, हेस्तिंग आणि त्याचे लोक हे, अन्नपाणी न मिळाल्यामुळें तडफडूं लागले, ह्मणजे सहज दीन होतील, आणि आपणांस शरण येतील. परंतु, त्यांचा अजमास चुकला. अन्न-

पाणी न मिळाल्यामुळें त्यांचे जे हाल होऊं लागले, त्यांच्या योगानें ते दीन तर झाले नाहींत; परंतु, निराशेच्या योगानें ते अधिक त्वेषास चढले, आणि, मरायाचें पण शरण जावयाचें नाहीं, असा त्यांनीं निश्चय केला. त्याप्रमाणें त्यांनीं, जीवावर उदार होऊन, मोठ्या आवेशानें, वेढा घालणाऱ्यांवर हल्ला केला. तेव्हां उभय पक्षांचे दोन हात चांगलेच झाले. शेवटीं, हेस्टिंग आणि त्याचे लोक हे, मोठ्या शौर्यानें, अंगलोसाक्सन लोकांची फळी फोडून बाहेर पडले, आणि जवळच एक नदी होती, तींतून पार जाऊन पूर्वेकडे वळले. त्यांचा पाठलाग आंग्लोसाक्सन लोकांच्या हातून झाला नाहीं. आणि दैववशांत् त्यांस तिकडे चांगली बंदोबस्ताची जागा सांपडली, आणि त्यांचें रक्षण झालें.

नंतर कांहीं दिवस शांतपणानें गेले. परंतु, देन्स लोक पुनः आपल्या आरमाराची तयारी करून पुनरपि एकदा थेम्स नदींत आले. त्या प्रसंगीं आलफ्रेदानें त्यांचा पराभव ज्या रीतीनें केला ह्मणून कितीएक प्राचीन इतिहासकारांनीं लिहिलें आहे, ती रीत फार चमत्कारिक आणि असंभवनीय वाटते; ती रीति अशी. आलफ्रेदानें, विलक्षण प्रयत्नानें, त्या नदीचा प्रवाह दुसऱ्या मार्गानें वाही असा करून देन्स लोकांचीं गलबतें, एकाएकीं, कोरड्या जमिनीवर राहात अशीं केलीं, आणि मग त्यांजवर एकदम हल्ला करून त्यांचा पराभव केला. ह्यांतलें कांहींएक खरें वाटत नाहीं. कांकीं, थेम्स नदीसारख्या ज्या नदींतून मोठालीं जाहाजें चालतात, तिचा प्रवाह, तिच्या पात्रांतून काढून दुसरीकडे वाहीसा करणें, हें कृत्य मनुष्यास असाध्य आहे. तें आजपर्यंत कोणाही माणसास करितां आलें नाहीं. आणि, त्या नदीचा

पूर्वींचा प्रवाह अमक्या ठिकाणीं होता, असेंही कोणी सांगूं शकत नाहीं. तेव्हां ही सगळी गोष्ट कल्पित दिसते; तरी, आलफ्रेदानें, ह्या प्रसंगीं देन्स लोकांचा पराभव केला, ह्यांत कांहीं संशय नाहीं.

हा प्रकार पुष्कळ दिवसपर्यंत चालला होता. देन्स लोक पराभव पावत, तरी, नवनवें सैन्य आणून पुनःपुनः नवी तयारी करीत. त्यामुळें आलफ्रेदास ते आटपेनात. त्यानें आज येथें त्यांचा मोड करावा, तों दुसऱ्या ठिकाणीं उद्यां त्यांनीं दंगा माजवावा. तरी, आलफ्रेदानें त्यांचा पिच्छा सोडिला नाहीं. त्यामुळें शेवटीं असें झालें कीं, त्यांचीं छावण्यांचीं सर्व ठिकाणें साक्सन लोकांच्या हातीं लागलीं, आणि त्यांस स्वस्थ राहाण्यास त्यांच्या गलबतांवांचून दुसरा थारा नाहींसा झाला. ते आपल्या जाहाजांवर जाऊन बसल्यावर त्या किनाऱ्यापर्यंत आलफ्रेद ह्यानें सगळा प्रांत आपल्या ताब्यांत घेतला, आणि तेथें नवीं गलबतें बांधून आरमार उभारण्याचा उद्योग मोठ्या सपाट्यानें चालविला. ह्यांत त्याचा हेतु असा होता कीं, त्या आरमाराच्या साह्यानें देन्स लोकांस समुद्रावरूनही हांकून लावावें. त्याप्रमाणें, फार परिश्रम करून, त्यानें तेथें आरमार तयार केलें. त्याचीं गलबतें देन्स लोकांच्या गलबतांच्या दुप्पट मोठीं होतीं. त्यामुळें त्यांत, लोक, अन्नसामुग्री, आणि लढाईचें साहित्य हीं पुष्कळ न्यावयास सांपडत असत.

आलफ्रेदाचें आरमार तयार झालें. तें पाहून हेस्तिंग ह्याच्या आरमाराची हिंमत खचली. आणि तें पुढें येऊन लढण्यास उभें राहाण्याचा रंग दिसेना. तेव्हां, आपल्या आरमाराची तयारी कितपत झाली आहे, ह्याचा अजमास

करण्यास तें पात्र नाहीं, असें आलफ्रेदास वाटलें. ह्मणून, तो, दुसऱ्या एखाद्या आरमाराची वाट पाहत होता. इतक्यांत आईल आफ्‌वाईत ह्या बेटाजवळ, नार्थमन ह्या नांवाचा कोणी देन्स सरदार, बरोबर मोठें आरमार घेऊन आला आहे, असें त्याला कळलें. त्याबरोबर, आपलें आरमार त्याजवर पाठविण्याचा निश्चय आलफ्रेदानें केला. त्याप्रमाणें आरमार निघालें. त्या वेळीं त्याच्या मुख्य अधिकाऱ्यास आलफ्रेदानें असें सांगितलें कीं, "जे लोक हातीं लागतील, त्यांस धरून बंदोबस्तानें इकडे घेऊन या. कोणाच्या जीवास ढका लावूं नका." शूरांतही भूतदया असते, ती ही अशी.

आइल आफ्‌वाइत ह्यावर जाण्यास आलफ्रेदाचीं नऊ गलबतें निघालीं. तीं सुरक्षितपणें तेथें पोहोंचलीं; आणि पाहूं लागले तों तेथच्या बंदरांत अवघीं साहा गलबतें देन्स लोकांचीं होतीं, असें त्यांस दिसून आलें. ह्या साहांपैकीं तीन गलबतें किनाऱ्यावर नांगरलीं होतीं; तीं भरतीचें पाणी चढल्यावांचून जाग्यावरून हालण्यासारखीं नव्हतीं. आणि तीन मात्र समुद्रावर तरतीं होतीं. त्यांतील लोकांनीं आलफ्रेदाचें आरमार येतांना पाहिल्यावर, मोठ्या वेगानें त्यावर चाल केली. उभय पक्षांची चांगली झुंपली. पण ती लढाई फार वेळ चालली नाहीं. कां कीं, थोडक्याच अवकाशांत आलफ्रेदाच्या आरमाराची सरशी होऊन, देन्स आरमाराचा पराभव झाला. त्या तीन गलबतांपैकीं दोन गलबतें आंग्लोसाक्सन आरमारानें धरिलीं, आणि त्यांतील लोकांस कैद केलें. राहिलें तिसरें गलबत. त्याचीही दुर्दशा झाली. त्यांतले अवघे पांच असामी जीवंत राहिले. त्यांनीं तें हांकारून दूर पळविलें. ह्या तीन गलबतांची अशी वाताहात

केल्यावर, आलफ्रेदाचें आरमार किनाऱ्याकडे वळलें. कां कीं, तेथें नांगरून पडलेल्या तीन गलबतांचा समाचार त्यास घ्यावयाचा होता. त्या तयार जाहाजांचा नाश आपण सहज करून टाकिला आहे, तेव्हां ह्या बसक्या, विनतयारीच्या जाहाजांचा फडशा उडविण्यास अगदीं देखील अवकाश लागावयाचा नाहीं, अशी उमेद आंग्लोसाक्सन लोकांस फार होती. परंतु, त्यांचा तो अजमास अगदीं फसला. तो असा. त्यांचीं गलबतें किनाऱ्यावर शत्रूंच्या गलबतांशीं आलीं, तेव्हां समुद्रास भरती आली होती. परंतु, थोड्या वेळानें ती कमी झाली. तेव्हां, त्यांच्यांतलीं तीन गलबतें तेथल्या वाळूंत रुतलीं; आणि बाकीचीं, पाण्याच्या वेगाबरोबर समुद्रांत गेलीं. अशी फुटाफूट झालेली पाहून देन्स लोकांनीं त्यांजवर हल्ला केला. उभय पक्षांकडचे वीर मोठ्या निकरानें लढले. त्यांत उभयपक्षांचाही पुष्कळ नाश झाला. शेवटीं देन्स लोक अगदीं पराभव पावले, आणि थोडी सवड सांपडल्याबरोबर गलबतांत बसून पळून गेले. (इ० स० ८९७.)

ह्याप्रमाणें इकडे झालेलें वर्तमान आलफ्रेदास कळलें, तेव्हां त्याला फार आनंद झाला. हेस्तिंग ह्यास आणि त्याच्या लोकांस ह्या वर्तमानाच्या योगानें फार वाईट वाटलें; आणि पुढें थोडक्या वेळानें तो आपल्या अवशिष्ट लोकांसहवर्तमान इंग्लंदांतून निघून गेला, तो फ्रान्सांत जाऊन राहिला. तेथें, त्यानें पूर्वीं जिंकलेला कांहीं प्रदेश त्याच्या ताब्यांत होता, त्याचा उपभोग घेऊन, त्यानें आपलें राहिलेलें सगळें आयुष्य घालविलें. (इ० स० ८९७.)

अशा प्रकारें करून आलफ्रेदाचें राज्य देन्स लोकांच्या

त्रासांपासून मोकळें झालें. तेव्हां आपल्या राज्याच्या आणि लोकांच्या सुधारणेकडे लक्ष देण्यास त्याला बराच अवकाश सांपडला. पण, त्यापुढें तो फार दिवस वांचला नाहीं. हेस्टिंग हा इ० स० ८९७ त इंग्लंदांतून निघून गेला, आणि आलफ्रेद हा इ० स० ९०१ त मरण पावला. हीं मधलीं तीन चार वर्षें त्यानें उद्योगांत घालविलीं. ते उद्योग त्याच्या स्वतःच्या सुखार्थ नव्हते; तर, त्या सगळ्यांचा रोख, लोकांची सुधारणा आणि देशाची व्यवस्था ह्यांजकडे होता. तो अहोरात्र परिश्रम करीत असे. आपल्या देशाचें हित साधणें हेंच आपल्या जन्माचें मुख्य सार्थक्य आहे, असें त्याला वाटत असे. आपल्या राज्यांतील न्यायाधीशांच्या हातून न्यायाचीं कामें बरोबर रीतीनें व्हावीं, आणि इतर सर्व नौकरांनीं आपापल्या व्यवसायांत चोख राहावें, ह्याविषयीं तो फार जपत असे; आणि त्यांत कोणाची लबाडी आढळल्यास त्याला कडक शिक्षा केल्यावांचून तो राहात नसे. पाठशाळा आणि मठ ह्यांमध्यें फार प्राचीन काळापासून ज्या कांहीं वाईट वाईट वहिवाटी चालत होत्या, त्या सगळ्या ह्यानें, कडक नियम करून नाहींतशा करून टाकिल्या, आणि त्यांचीं कामें चांगल्या निर्मळ रीतीनें चालावीं, अशी तजवीज त्यानें लावून दिली. त्यांत कितीएक गोष्टी कितीएक लोकांस न आवडण्यासारख्या झाल्या; तरी, आलफ्रेदाच्या व्यवस्थेस कोणीं हरकत केली नव्हीं. कां कीं, त्याचे जे प्रयत्न होते, ते सगळे देशाच्या हितासाठीं होते, हें सर्व लोकांस ठाऊक होतें. परमेश्वराचे ठायीं त्याची दृढभक्ति होती; आणि तो जें काय करी तें त्याला भिऊन करी. त्यामुळें त्याचें करणें सर्वांस मान्य होई, आणि सिद्धीस जाई.

अशा प्रकारें राज्यकारभार आणि लोकसुधारणा हीं कामें आलफ्रेदानें मोठ्या आस्थेनें आणि स्वतः पुष्कळ संकटें सोसून केलीं. त्यांच्या योगानें त्याच्या राष्ट्राचें पुष्कळ हित झालें. सर्व लोक त्याला आपल्या प्रत्यक्ष बापाप्रमाणें मान देत. आणि, त्यानें ज्या कांहीं गोष्टी तेव्हां करून ठेविल्या आहेत, त्यांची वृद्धि होऊन, आज त्यांचीं फळें सांप्रतच्या प्रजेच्या उपयोगीं पडत आहेत, आणि तीं पुढें कितीएक पिढ्यांस उपयोगीं पडतील, असें शोधक आणि विचारी पुरुष सांगतात. तेव्हां ह्याला "ग्रेट" ह्मणजे थोर असें ह्मटलें हें अगदीं योग्य होय.

आलफ्रेदाचें बाहेरचें आचरण जसें शुद्ध होतें, तसें घरचें वागणेंही अगदीं निर्मळ होतें. त्याच्या वागण्यांत पडदा कसा तो मुळींच नव्हता. तोच कित्ता त्याच्या मुलांनीं उचलिला. तीं त्याच्याप्रमाणेंच उद्योगी, धर्मशील आणि सुशील निपजलीं. त्याला एक मुलगी होती. तिचें नांव इथल फ्लीदा असें होतें. तिचें लग्न मर्सिआ येथील एका राजपुत्राशीं करून दिलें होतें. ती मोठी चतुर, सभ्य, नीतिमान् आणि धार्मिक होती, अशी तिची आख्या सर्व इंग्लंदभर होती. त्याच्या पुत्राचें नांव एदमंद असें होतें. तोही आपल्या बहिणीसारखा सद्गुणी असून, राज्यकारभार चालविण्यास जे गुण अवश्यक असतात, ते त्यानें संपादिले होते. तो राजपदारूढ होण्यास योग्य झाला होता तें पाहून आलफ्रेदाला अत्यानंद झाला. ठीकच आहे. आपलें काम करण्यास आपल्या मुलांनीं योग्य व्हावें, ह्याहून पित्यास दुसरी कोणती इच्छा असावयाची आहे?

आलफ्रेद आजारी पडला; आणि त्याचें दुखणें जसजसें वाढत गेलें, तसतसें त्याला असें वाटूं लागलें कीं, ह्यांतून आपण वांचत नाहीं. तेव्हां, एकाद्या महा साधूप्रमाणें तो मरायास तयार झाला. त्यानें इतर मनुष्यांस जें काय सांगावयाचें होतें तें सांगितलें, आणि शेवटीं आपल्या मुलास आपल्या बिछान्याजवळ बोलाविलें. तो येऊन बसल्यावर, त्याजकडे पाहून, आणि त्याचा हात आपल्या हातांत धरून तो ह्मणाला, "बाबा, आतां माझ्या मृत्यूची वेळ अगदीं संनिध आली आहे; ह्मणून तुला जे शेवटचे दोन शब्द सांगावयाचे आहेत, ते मी तुला सांगतों. ते लक्ष लावून ऐक. बाबा, माझी सगळी शक्ति गेली आहे. माझें तोंड सुकून अगदीं फिकट झालें आहे. माझी आयुर्मर्यादा अगदीं सरत आली आहे. आतां मी लवकरच परलोकास जाणार, आणि जें राज्य आजपर्यंत मीं चालविलें, तें आतां तुला चालवायाचें आहे. मुला, तुजपाशीं माझें एक मागणें आहे. तें हेंच कीं, तूं आपल्या राष्ट्रांचें पालन आपल्या पोटच्या मुलाप्रमाणें कर. पोरक्या पोरांस पिता आणि अनाथ विधवांस आधार, असा तूं हो. दुःखितांस सुख दे, आणि निराश्रितांस आश्रय दे. जें कांहीं अमार्गी चालत असेल, तें सुमार्गानें चाले असें कर. आणि माझ्या बाळा, तूं स्वतः नीतीनें वाग. अशा प्रकारें तूं वर्तलास ह्मणजे, तुझ्या सर्व उद्योगांत परमेश्वर तुला साह्य करील. संकटसमयीं परमेश्वराची प्रार्थना कर, आणि त्यापाशीं सुबुद्धि माग. तो तुला सन्मार्ग दाखवील; आणि त्या मार्गानें तूं गेलास ह्मणजे तुझे सर्व हेतु सिद्धीस जातील."

आलफ्रेद मरण पावला, तेव्हां तो बावन वर्षांचा होता. तो निवर्तल्याचें वर्तमान ऐकून सर्व प्रजेस पराकाष्ठेचें दुःख झालें. त्याचें प्रेत विंचेस्तर येथील थोरल्या भजनालयाच्या आवारांत पुरिलें. नंतर, त्याचा पुत्र सिंहासनावर बसून राज्यकारभार चालवूं लागला. आलफ्रेदानें ज्या कांहीं व्यवस्था लावून ठेविल्या होत्या, त्यांचें उत्तम फल ह्याच्या कारकीर्दींत स्पष्ट दिसून आलें. राज्यव्यवस्थेची जी रीति त्यानें स्थापित केली, ती, इतर वस्तूंप्रमाणें, कालचक्राच्या योगानें बिघडली किंवा दुखवली नाहीं, एवढेंच नव्हे; तर, ती तेव्हांपासून अधिक अधिक बळकट होत चालली आहे; आणि तिचा हा क्रम असाच पुढें चालेल, असें दिसत आहे.

आलफ्रेदाच्या हातून ज्या गोष्टी घडल्या, त्यांतील बहुतेक सर्वांचें कथन झालें आहे. त्यांवरून त्याचा स्वभाव कसा होता, तें स्पष्ट कळून येण्यासारखें आहे. तो मोठा दयाळू होता. ह्याविषयीं त्याच्या अनेक गोष्टी लोकांत प्रसिद्ध आहेत. त्यांत एक अशी आहे कीं, एके वेळीं तो शिकारीस अरण्यांत गेला असतां, एका उंच झाडावरच्या घरट्यांतून, लहान मुलाचें रडणें त्याच्या कानीं आलें. तेव्हां त्यानें त्या झाडावर मनुष्य चढवून, तें अर्भक खालीं काढविलें. तें तेथें गरुडपक्ष्यानें खावयाकरितां नेऊन ठेविलें होतें, असें दिसलें. तो मुलगा होता. तो कोणाचा, ह्याविषयीं त्यानें पुष्कळ शोध केला; परंतु, त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्या मुलाचें लालनपालन त्यानें आपल्या पोटच्या मुलाप्रमाणें उत्तम प्रकारें करून, त्याजकडून चां-

गला विद्याभ्यास करविला, आणि, त्याचें सर्व प्रकारें चां-
गलें चालावें, अशी तजवीज केली.

अशा गोष्टीवरून त्याचें दयालुत्व दिसतें; स्वत: संकटांत असतां गरीबास अन्न दिल्याच्या गोष्टीवरून त्याचें धार्मिकत्व दिसतें; प्रथम, हाडवैरी असून, तो हातीं लागल्यावर त्याला मित्राप्रमाणें वागवून त्याला राजाकडून ठेविलें, ह्या गोष्टीवरून त्याचें औदार्य दिसतें; धनगराच्या बायकोचें उणें बोलणें त्यानें शांतपणें सोसून घेतलें, त्यावरून त्याचा सोशीकपणा दिसतो; राजपदभ्रष्ट होऊन सर्वस्व गेलें होतें, तरी, स्वपद परत मिळविण्याकरितां त्यानें एकसारखे परिश्रम केले, त्यांवरून त्याची उद्योगनिष्ठा दिसते; आणि आपल्या सुखाकडे दृष्टि न देतां, आपल्या प्रजेच्या हिताकरितां, त्यानें कायावाचामनेंकरून जे लोकोत्तर उद्योग केले, त्यांवरून, स्वकर्तव्य कर्माविषयींची त्याची पराकाष्ठेची आस्था दिसतें; हे अनुपमेय आणि अवर्णनीय गुण त्या पुरुषाचे ठायीं होते. भर्तृहरीचा एक श्लोक आहे—

विपत्कालीं धैर्य प्रभुपणिं सहिष्णुत्व बरवें
सभे पांडित्याचा प्रसर समरीं शौर्य मिरवे
स्वकीर्तींच्या ठायीं प्रचुर रति विद्याव्यसन जे
तयांचे हे स्वाभाविक गुण सहा सत्पुरुष जे.

वामन.

हे सर्व, किंवा निदान ह्यांतले बहुतेक आणि दुसरे कि-
तीएक चांगले गुण आलफ्रेदाचे ठायीं होते; त्यांवरून त्यांस
इतिहासकारांनीं आणि इतर विचारी पुरुषांनीं थोरांत गणिलें
आहे, तें अगदीं यथार्थ आहे. जगाच्या कल्याणास जे पु-
रुष आजपावेतों उत्पन्न झाले, त्यांतील उत्तमांत आलफ्रेद

हा उत्तम होय. कितीएकांचें मत तर असें आहे कीं, त्या वेळीं, परमेश्वरकृपेनें, आलफ्रेद हा इंग्लंदांत उत्पन्न झाला, ह्मणूनच तो देश देन्स लोकांच्या दाढेखालून निघाला; एऱ्हवीं, निघाला नसता. हें खरें दिसतें. तेव्हां ह्या पुरुषाची जितकी स्तुति करावी, तितकी थोडीच वाटते.

**समाप्त.**